खिलाफत - रहस्य

ले-रामचंद्र माधव फडके

ॐ

खिलाफत-रहस्य.

अर्थात्

खिलाफतीचा पूर्वेतिहास.

लेखक रामचंद्र माधव फडके-राजापूर.

रत्नागिरी सत्यशोधक छा० छा०

जुलई १९२२

किंमत १२ आणे.

ॐ

खिलाफत-रहस्य.

लेखक.

रामचंद्र माधव फडके.

मु० राजापूर.

प्रथम आवृत्ति (१०००)

रत्नागिरी– "सत्यशोधक" छा० छा०.

...कः– दत्तात्रय हरि लिमये, बी. ए. एल्एल. बी.

माहे जुलई सन १९२२.

किंमत बारा आणे.

विषयानुक्रमणिका.

प्रस्तावना.

मराठी वाङ्मयामध्यें निरनिराळ्या विषयांवर पुस्तकें आहेत; हल्लीं जी राष्ट्रीयचळवळ सर्व देशभर सुरू आहे, त्याच्या मुळाशीं पंजाब प्रकरण व खिलाफत हीं प्रामुख्यानें आहेत. त्यांत पंजाब प्रकरणासंबंधीं माहिती देणारीं पुस्तकें आहेत. परंतु इतक्या दिवसांनंतरहि खिलाफतीसंबंधीं माहिती देणारें स्वतंत्र पुस्तक मराठी भाषेंत नाहीं. खिलाफतीसंबंधें मराठी भाषेंत एक कादंबरी प्रसिद्ध झाल्याचें समजतें. निरनिराळ्या मासिकांतून वगैरे यासंबंधींचे लहान-लहान निबंधहि छापले आहेत; परंतु स्वतंत्र पुस्तक नाहीं. यामुळें, उशिरानें कां होईना, पण या विषयाची माहिती देणारें पुस्तक मराठी भषेंत असावें असें वाटून हें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकांत सध्यां चालू असलेल्या खिलाफतीच्या चळवळीसंबंधें माहिती मुळींच नसून फक्त खिलाफत ह्मणजे काय, तिची स्थापना कोणत्या तत्वांवर झाली, तिचें स्थित्यं-तर व स्थलांतर कसें कसें झालें, खिलाफतीच्या गादीवर बसणाऱ्या खलिफांची योग्यता कशी असावी लागते, वगैरे गोष्टींचें विवरण या पुस्तकांत केलेलें आहे. सुप्रसिद्ध वंगलेखक श्रीयुत तिनकडि मुखोपाध्याय यांच्या बंगाली भाषेंतील 'खेलाफत्-समस्या' या पुस्तकाचें हें मराठी रूपांतर आहे. रूपांतर कसें साधलें आहे हें ठरविण्याचें काम वाचकांचें आहे. हें पुस्तक तयार करतांना आमच्या हातून बरींच दोषस्थलें राहिलीं आहेत हें आमच्या ध्यानांत आहे. आपल्या इकडील हिंदु व मुसलमान बांधवांमध्यें या विषयाबद्दल बरेंच अज्ञान व तज्जनित उदासीनता आढळून येते; तरी ती दूर होऊन, खिलाफतीचीं तत्वें व इस्लामधर्माचे नियम-निर्बंध यांविषयीं गैरमाहितगार लोकांचा या पुस्तक-वाचनापासून दूषित पूर्वग्रह दूर होऊन त्यांच्या मनांत जरी इस्लामसंबंधीं श्रद्धा व सहानुभूती उत्पन्न झाली, तरीहि आमच्या या प्रयत्नाचें सार्थक झालें असेंच आह्मांस वाटेल. पुस्तकांत जीं कांहीं दोषस्थलें असतील, तीं जर वाचक आह्मांला साधार कळविण्याची मेहेरबानी करतील, तर आह्मीं त्यांचे आभारी होऊं; व पुनः आवृत्ति काढण्याचा योग आल्यास त्यावेळीं योग्य त्या सुधारणा करण्याचा प्रयत्न करूं. ज्यांच्या 'बंगाली शिक्षक' या पुस्तकामुळें लेखकाला बंगाली भाषा शिकतां येऊन हें रूपांतर करतां आलें, त्या श्री.

वासुदेव गोविंद आपटे बी. ए. संपादक 'आनंद मासिक' पुणें यांचे आभार मानावे तितके थोडेच होणार आहेत. श्री. तिनकडि मुखोपाध्याय यांच्या पुस्तकावरून हें मराठी भाषेंत लिहिलें असल्यामुळें या पुस्तकाचें श्रेय तेवढें त्यांस आहे. दोषांना जबाबदार लेखक आहे. पुस्तक छापणें, प्रसिद्ध करणें, वगैरे वगैरे बाबतींत लेखकाला मुळींच माहिती नव्हती, त्यामुळें पुस्तक कसें छापलें जाईल ही विवंचना होतीच. परंतु मूळ प्रतींतील शुद्धाशुद्ध करणें, प्रुफें तपासणें, वगैरे कामें करून पुस्तक वेळेवर छापून दिल्याबद्दल श्री. दत्तात्रय हरि लिमये बी. ए, एल्. एल्. बी, संपादक 'सत्यशोधक' व रत्नागिरी 'सत्यशोधक' छापखान्याचे मालक यांचे आह्मीं अत्यंत आभारी आहों. हंस-क्षीर न्यायानें ग्राह्यांश तेवढा घेऊन, दोषांकडे वाचक वर्ग सहानुभूतीनें पहातील अशी आशा आहे. लेखकाचा हा पुस्तक-लेखनाचा प्रथम प्रयत्न असून तो स्फूर्ति देऊन तडीस नेल्याबद्दल त्या जगन्नियंत्याचे आभार मानून व हिंदवासियांना या विषयाचें महत्व कळावें, त्यांजकडून याबाबतींत योग्य ते प्रयत्न व्हावे व त्याला जगदीशानें यश देऊन खिलाफतीचें ग्रहण सोडावें अशी त्या चराचर व्यापकाला प्रार्थना करून ही प्रस्तावना येथेंच पुरी करितों.

मिति जेष्ठ शु. ५ सौम्यवासर शके १८४४

राजापूर

रामचंद्र माधव फडके.

शब्दचित्र.

मोठ्या कळवळ्यानें एक हिंदुकवि वर्णन करितोः—

" महीतलावर जे आज दीन दिसतात, ते उद्यां केवढें कल्पनातीत कार्य करूं शकतील ! व त्यावेळीं आरबांच्या अद्भुत कथेप्रमाणें आजचा इतिहास स्वप्नवत् भासेल. "

वास्तविक ज्या इस्लामच्याप्रभावाचा विस्तार एक दिवस " पश्चिमे हिस्पानीशेष, पूर्वे सिंधु हिंदुदेश " पर्यंत झाला होता, ज्या इस्लामच्या ज्ञान-विज्ञान, साहित्य, दर्शन, व्यवहारशास्त्र, शिल्पकला इत्यदिकांचा सुधारलेल्या जगांत आणि विशेषतः पाश्चात्य देशांत एक दिवस आदरसन्मान होत होता; आणि पाश्चात्य ज्ञान-विज्ञान संस्कृतीच्या मुळाशीं ज्याचा प्रभाव अद्यापहि स्पष्ट-पणानें दृग्गोचर होतो, त्या इस्लामाच्या वर्तमान शोचनीय स्थितीचें मनन केलें असतां कोणाच्या हृदयांत धडकी भरणार नाहीं? कोणाच्या डोळ्यांत अश्रुबिंदु चमकणार नाहींत? कालचक्राच्या फेऱ्याच्या नियमानेंच हें परिवर्तन अनिवार्य आहे. आज जे या कालचक्राच्या मस्तकावर आरूढ झालेले दिसतात, ते उद्यां त्या कालचक्राच्या तळीं पडून भरडून जातील; आज जे प्रबल ते उद्यां दुर्बल होणार; आज ज्यांची सद्दी जोरावर, त्यांचें दैव उद्यां खचित पालटणार; या कालचक्राच्या गतीचा विरोध करण्याला आजपर्यंत कोणीहि समर्थ झाला नाहीं. परंतु इस्लामला आज दुर्दिन प्राप्त झाला असला तरी इस्लाम खचित दुर्बल नाहीं. इस्लाम-धर्मीयांची संघशक्ति, त्यांची धर्मनिष्ठा आणि कर्तव्यपराय-णता आणि या सर्वांपेक्षां त्यांचा आपल्या मनावरील ताबा, हीं इस्लामच्या शक्तीचा व सजीवतेचा परिचय करून देण्यास पुरेशीं आहेत. इस्लामच्या या शक्तीचें व सजीवतेचें मूळ त्यांच्या धार्मिक व सामाजिक निर्बंधनांत आहे. तेराव्या शतकाच्यापूर्वीं इस्लामधर्म ज्या धार्मिक, नैतिक, व राजकीय तत्वांवर (निर्बंधांवर) स्थापला गेला, ते त्यांचे निर्बंध अद्यापहि अभंग आहेत. कारण काबुलच्या अमिराचा पुत्र अजूनसुद्धां रस्त्यावर फिरणाऱ्या हमालाबरोबर एकत्र नमाज पढण्यांत मुळींच हीनत्व मानीत नाहीं. आरबस्थान सारख्या उजाड-प्रदेशांतील कुसंस्कारांनीं हिरवट बनलेल्या आणि उन्मत्त प्रवृत्तीविशिष्ट जातींत, एका पितृमातृहीन निरक्षर बालकानें अवतीर्ण होऊन कोणच्या शक्तीच्या सहाय्यानें एवढ्या सार्वजनीन व प्रजातंत्रविशिष्ट धर्माचा प्रसार केला,

आणि धर्म व राज्यतंत्र हीं एकरूप करून जगतांत एक नूतन शासनपद्धति निर्माण केली, याचा विचार केला असतां, महंमदाला जें "प्रेरित महापुरुष" समजलें जाई, त्यांत शंका घेण्याचें मुळींच कारण दिसत नाहीं. प्रेरित महापुरुष महम्मद आणि त्यांचा शिष्यवर्ग यांच्या हयातींत ते एकसमयावच्छेदें करून राष्ट्रपति व धर्मनायक असतांना त्यांच्या ठिकाणीं जे सद्‌गुण दिसून आले, त्यांचें अनुकरण जर त्यांच्या वारसांनीं केलें नसतें तर, वर्तमान कालीं दिसून येणारें त्यांच्यांतील चैतन्य शिल्लक राहिलें असतें कीं काय, या विषयीं शंकाच आहे. हजरत मोहम्मदांचें अलौकिक चरित्र वर्णन करण्याचा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश नाहीं. ज्या खिलाफत-समस्येनें आज समग्र मुसलमानी जगांत खळबळ उडवून दिली आहे, त्या खिलाफतीचें महत्व काय, ती कशानें निर्माण झाली, आणि ती सुरक्षित रहाण्याकरितां मुसलमानांना इतकी कळकळ कां वाटत आहे, आणि खिलाफतीचा गौरव अभङ्ग रहाण्या करितां ते इतके दृढनिश्चयानें प्रयत्न कां करित आहेत, त्याचें या पुस्तकांत विवेचन करणार आहों. खिलाफतीचें स्वरूप समजून द्यावयाचें असल्यास खलिफांच्या चरित्राचें निरीक्षण करणें जरूर आहे. यासाठीं पहिल्या चार खलिफांचीं चरित्रें देऊन आणि त्याबरोबरच हजरत महम्मदांच्या आदर्शवत् चरित्राचें छायाचित्र दाखवून खिलाफतीचें स्वरूप रेखाटलेलें आहे.

"हिंदुमुसलमानांचें ऐक्य चिरकाल टिको."

'वंदेमातरम्'

'अल्लाहो अकबर.' 'परमेश्वर सर्व श्रेष्ठ आहे.'

ॐ

खिलाफत-रहस्य.

प्रकरण पहिलें.

हजरत महम्मदांचें राष्ट्र-संघटन.

इसवी सनाच्या ६३२ व्या वर्षी तारीख ८ माहे जून रोजीं व हिजरी सनाच्या ११ व्या वर्षी, इस्लाम-धर्म-प्रवर्तक व अरब लोकांचे गौरव-सूर्य, हजरत महम्मद हे वयाच्या ६३ व्या वर्षी आपला पंचमहाभूतात्मक देह विसर्जन करून परमेश्वराशीं तादात्म्य पावले. आपल्या निर्वाणसमयापर्यंत त्यांनीं केवळ धर्मानुयायीच निर्माण केले असें नव्हे, तर सु-विस्तीर्ण व नियमबद्ध अशी राष्ट्र-संघटनाहि त्यांनीं केली. जगाच्या इतिहासांतील कोणत्याहि धर्म-प्रवर्तक-महापुरुषानें धर्म-प्रचाराचें कार्य करते वेळीं अशा तऱ्हेची राष्ट्र-घटना केली नाहीं किंवा तसें करण्याला त्यांना कारण अगर संधि मिळाली नाहीं. धर्मप्रचाराला प्रवृत्त होते वेळीं राष्ट्र-संस्थापनेचा विचार हजरत महम्मदांच्या मनांत नव्हता. भगवंताचे सान्निध्यानें जो प्रत्यादेशलाभ त्यांना झाला, त्या आदेशानुसार स्वदेशबांधवांना सत्य-धर्माचें कथन हजरत महम्मदांनीं केलें, हें कार्य करतांना त्यांना असंख्य यातना सोसाव्या लागल्या; तरीहि एकचित्तानें स्वीकृतकार्य करीत असतांनाच त्यांनीं देह ठेविला; परंतु विधात्याच्या अचिंत्य इच्छेनुरूप, धर्मप्रचाराच्या वेळींच, प्रचारकाच्या अलौकिक माहात्म्यामुळें, एका विशाल राष्ट्राचा पाया घातला जात होता. क्रमाक्रमानें थोड्याच काळांत एका साधारण-शासन-पद्धतीची प्रतिष्ठापनाहि झाली. हें सर्व कसें घडलें, याचें आम्ही पुढें सारांशरूपानें विवरण करीत आहों.

हजरत महम्मदांच्या जन्मकालीं अरबस्थानांत कोणत्याहि विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति विद्यमान नव्हती. अरबस्थानांतील लोक आपआपल्या वंशा-

नुसार निरनिराळ्या गोटांत समुदायरूपानें रहात. प्रत्येक गोटांत एक अधिपति असे. हे अधिपति आपआपल्या गोटांतील लोकांना बरोबर घेऊन परस्परांशीं युद्ध करीत व दास्यवृत्तीनें उपजीविका करीत. क्वचित् कोणी वाणिज्य-व्यवसायहि करीत असत; परंतु देशांत कोणत्याहि प्रकारानें शान्ति अगर बंधारण नसल्यामुळें प्रत्येकजण संकटांविषयीं सारांक असे. अर्थात्, सर्वजण आपापल्या स्वार्थसिद्धीसाठीं चिंतामग्न असत. धर्मविषयक आस्था कोणाच्याहि मनांत असल्याचें दिसत नव्हतें. यामुळें पापकार्याविषयीं त्यांच्या मनांत तिरस्कार किंवा भय असण्याला कारणच नव्हतें. महम्मदाच्या जन्मकालापूर्वीं, त्या ठिकाणीं येशूख्रिस्त-प्रवर्तित-धर्माचा प्रचार झाला होता हें सत्य आहे; परंतु त्याप्रमाणें वागणुक ठेवणारे अल्पसंख्याक फकीर (पाद्री-महंत) मात्र होते. सर्वसाधारण रहिवासी काबा-मंदिराला प्रदक्षिणा घालणें वगैरे बाह्यअनुष्ठानें करूनच स्वस्थ असत. भगवद्भक्ति किंवा तज्जनित शमदमादि सद्गुण कोठेंहि विशेष रीतीनें आढळून येत नव्हते. अतएव अरब लोकांच्या देशांत जन्म झाल्यामुळें हजरत महम्मद ईश्वरप्राप्तीविषयीं अतिशय व्याकुळ झाले. मक्केच्या निकटवर्ति असलेल्या हीरा पर्वतावर जाऊन तपस्या व ध्यान-धारणादि कर्मांत ते निमग्न झाले. यथाकालीं प्रत्यादेश प्राप्त झाल्यानंतर अरब लोकांना या धर्माची दीक्षा देण्याकरितां त्यांनीं आपली सर्व शक्ति खर्च केली. या घटनेंत विधात्याची लीला स्पष्टपणें निदर्शनास येते. अरब लोकांना धर्मदीक्षा देऊन समाजबंधारण करण्याकरितां विधात्यानें क्रमशः कशी योजना केली, हें हजरत महम्मदांचें चरित्र निरीक्षण केलें असतां सहज लक्षांत येतें. “ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ” या भगवदुक्तीची सत्यता या उदाहरणानें स्पष्टपणें नजरेस येते. भगवत्सान्निध्यानें जो प्रत्यादेशलाभ झाला, त्यामुळेंच सर्वसाधारण लोकांमध्यें नव-धर्म-प्रचार करण्याला हजरत महम्मद प्रवृत्त झाले. त्यांनीं आपल्या स्वदेशस्थ अरब लोकांना असा उपदेश केला कीं, काबा-मंदिरामध्यें असलेल्या सर्व देवदेवींची चाललेली पूजा ही प्रकृत-ईश्वरधर्माला अनुसरून नाहीं व एक ईश्वराशिवाय दुसरी कोणतीहि देवता उपासनायोग्य नव्हे; “ त्या ईश्वराच्या प्रेरणेनें मी तुम्हांला असें सांगतों कीं, तुम्हीं फक्त एक ईश्वराची पूजा करा. ” येणेंप्रमाणें अधिकारयुक्त वाणीनें स्वजनांना व देशबांधवांना या धर्माची दीक्षा घेण्याकरितां जेव्हां महम्मद आव्हान करूं लागले, त्या वेळीं अनेकांचें चित्त त्यांजकडे आकृष्ट होऊं

लागलें; आणि कोणी उघड, तर कोणीं गुप्तपणें त्याजकडे जाऊन या नूतन धर्माची दीक्षा घेऊं लागले. इकडे दुसऱ्या बाजूनें बहुत लोक त्यांला विरोध करण्याला सज्ज झाले व त्यांला आणि त्यांच्या शिष्यवर्गाला नानाप्रकारांनीं पीडा देऊं लागले. क्रमाक्रमानें महम्मदाची शिष्यसंख्या ज्यामानानें वृद्धिंगत होऊं लागली, त्यामानानें त्यांना होणाऱ्या त्रासाचें प्रमाणहि वाढत गेलें व शेवटीं येथपर्यंत मजल आली कीं, त्यांचा प्राणसंहार होण्याचीहि भीति वाटूं लागली. संकटावस्था जाणून महम्मदाच्या स्नेहबांधवांनीं त्यांला असा उपदेश केला कीं, त्यानें सशिष्य मक्कानगरीचा त्याग करून स्थानांतर करावें; परंतु ईश्वरवाणी श्रवण करून तिच्या प्रचारार्थ जो प्रवृत्त झाला, तो आपलें व्रत प्राणभयानें सोडील हें शक्यच नव्हतें; परंतु घटना-परंपरेनें असा प्रसंग आला कीं, प्रथम त्यांच्या शिष्यवर्गाला व नंतर प्रिय शिष्य अबूबकरसहित त्यांना स्वतःला आपली जन्मभूमि जी मक्का तिचा त्याग करून मदिनेला जावें लागलें. हजरतांचा मक्का-परित्याग व मदिनेला पलायन यासंबंधींच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां त्यांचा ईश्वरावरील दृढविश्वास व त्यांचें अलौकिक सत्साहस यांचा परिचय होतो. तारीख १६ जुलै सन ६२२ इसवी या दिवशीं, आपल्या ईश्वर प्रत्यादेश-लाभाच्या तेराव्या वर्षानंतर ते मदिनेला जाते झाले. या तारखेपासूनच विख्यात हिजरीसनाच्या गणनेला सुरुवात झाली.

हजरतांची मदिनायात्रा ज्या भगवदिच्छेनें झाली, त्याच परवर्ती घटने-मुळें विशेषरूपानें त्यांच्या कार्याचीही वाढ झाली. मदिनेला गेल्यानंतर दिवसें दिवस त्यांची शिष्यसंख्या झपाट्यानें वाढतच गेली. मक्केचे रहिवासी तर त्यांचा इतका तीव्र विरोध करूं लागले कीं, ते जर तेथेंच (मक्केंत) रहाते, तर त्यांचें (हजरतांचें) प्राणसंरक्षण होणें सुद्धां कठीण होतें. "ईश्वर तारी त्याला कोण मारूं शकणार?" हेंच सत्य. याचकारणानें भगवंतांनीं त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध मदिनेला जाण्याची बुद्धी दिली. मदिनेच्या लोकांनीं त्यांचा परमादरानें स्वीकार केला. प्रत्येक रहिवासी त्यांना आपल्याच घरीं येऊन रहाण्याविषयीं अत्यंत आग्रह करूं लागला. कोणीहि दुःखी मनुष्य पाहिला कीं, हजरतांनां अत्यंत मानसिक यातना होत असत. सर्वांच्या घरीं जाऊन सर्वत्रांनां आपण केव्हां संतुष्ट करूं याच उत्कट भावनेनें त्यांना अधीर केलें होतें. अन्य उपाय न दिसल्यामुळें शेवटीं त्यांनीं सर्वत्रांनां असें सांगितलें कीं,

आपल्याला एक इसमाकडेच रहातां येईल; रोज प्रत्येकाच्या घरीं रहाणें असंभवनीय आहे; कोठेंहि राहिल्यानें आपल्याला त्रास होणार नाहीं;' यासाठीं त्यानीं असा निश्चय जाहीर केला कीं, आपला उंट ज्या ठिकाणीं आपल्याला घेऊन जाईल, त्याठिकाणीं आपण वास करूं. असें सांगतात कीं, त्यांचा तो काळेय नांवाचा उंट अगदीं एका बाजूला अशा गांवढे गांथांतील एका निर्जन उघड्या मैदानांत जाऊन ढोपरें टेकून बसला; तेव्हां त्यांनीं त्याच ठिकाणीं आपलें नमाज-मंदिर (मशीद) व रहाण्याकरितां घर हीं तयार केलीं.

मक्केप्रमाणेंच मदिना येथील रहिवासी यांचे भिन्न वंश असल्यामुळें त्यांचीं पथकें भिन्न होतीं; यामुळें मदिना येथील हीं परस्पर पथकें (गोटांतील समुचित लोक) परस्परांचा तिरस्कार करीत व हजरतांमुळें तर या तिरस्काराला अत्यंत उग्ररूप प्राप्त झालें होतें. उभयपक्षांतील लोक अनेक समयीं आपल्या वादाचा निर्णय करण्याकरितां काबामंदिरांतील काजीनां शरण जात; परंतु काजीकडून निर्णय अशा तऱ्हेनें दिला जात असेकीं, त्यायोगें त्यांचें मुळींच समाधान होत नसे. महंमद मदिनाला आल्यानंतर, कां तें कोण जाणें, हे सर्व वादविवाद मिटविण्याचा भार त्यांजकडेच सोंपिवला जात असे व ते त्याचा अशारीतीनें निकाल लावीत कीं, कोणत्याहि पक्षाला असंतोषाचें कारणच रहात नसे. या वेळे पासून त्यांच्या विषयीं लोकांची श्रद्धा इतकी वाढत गेली कीं, हे कोणी ईश्वरावतारी महापुरुष आहेत असें शेवटीं प्रत्येकाला मनःपूर्वक वाटूं लागलें; अर्थातच मदिनावासी प्रत्येक मनुष्य हजरतांच्या इस्लाम-धर्माची दीक्षा घेऊं लागला. हजरत महंमदांचे विचार सर्वजण अवनत मस्तक होऊन ग्रहण करीत; याचें कारण एकच होतें; तें हें कीं, ते जें कांहीं करीत किंवा बोलत असत, तें सर्व ईश्वरादेशानुसारच केलें जात असे. अशा तऱ्हेनें समस्त मदिनावासीयांनीं क्रमाक्रमानें महंमदाच्या नेतृत्वाचा स्वीकार केला. जे पूर्वीप्रमाणेंच वादाचे निकाल करून घेण्याकरितां काजीकडे जात, ते अविश्वासू नास्तिक समजले जाऊन त्यांचा तिरस्कार केला जाई. शेवटीं, थोड्याच दिवसांत, अशातऱ्हेनें, हिजरी सनाच्या पहिल्या वर्षींच हजरत महंमद हे मदिना येथील "हाकीम बियामर अल्ला" म्हणजे ईश्वरनियुक्त न्यायाधीश या सन्मानाला पावले; व त्यांच्या नांवानें मदिनावासीयांत असा आदेश जाहीर झाला कीं, "तुम्हां परस्परांत जे वादविवाद उपस्थित होतील, ते ईश्वर अथवा तत्प्रेरित महंमदाकडेच निर्णयाकरितां आणावे."

हजरत महम्मदांच्या विचारसरणीनें मदिनावासियांतील वादविवादांचा क्रमश: ऱ्हास होऊं लागला व यामुळें परस्परांत मित्रभाव व आपलेपणा वाढूं लागला. यानंतर सर्वांनीं त्या धर्माची दीक्षा घेतल्यामुळें त्यांचे परस्पर संबंध या सूत्रानें निगडित झाले. मदिनाचे मूळ रहिवासी व महम्मदांचे पळून आलेले अनुचर यांमध्येंहि अतिशय मित्रभाव उत्पन्न झाला, व सर्व मदिना-वासियांचा महम्मद हा हर्ता, कर्ता व विधाता होऊन बसला, यांत आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ? मदिनाचे मूळ रहिवासी व मक्केहून रहावयाला आलेले लोक यांना भिन्न सांप्रदायिक नांवानें संबोधिलें जात असे. मदिना-वासियांना "आन्सार" किंवा आश्रयदाता आणि मक्केहून आलेल्यांना "मोहाज्जेर" किंवा औपनिवेशिक अतिथी या नांवानें ओळखिलें जात असे. या उभयपक्षांच्या संमीलनानें मक्केतील महम्मदांचा शत्रुपक्ष जास्तच उत्तेजित झाला. इतकेंच काय, पण महम्मद त्यांचे दलपति किंवा राष्ट्रपति झालेले पाहून त्यांच्या रागाला सीमा राहिली नाहीं. विशेषत: त्यांना असें वाटलें कीं, आन्सार लोकांनीं जर महम्मदाला व त्याच्या शिष्यवर्गाला आश्रय दिला नसता, तर महम्मदाची इतकी प्रतिष्ठा वाढणें शक्यच नव्हतें. अर्थातच आन्सार लोकांशीं युद्ध करण्याची एकादी सुसंधी ते पाहूं लागले. महम्मदांनीं पाहिलें कीं, यांचें दमन करणें आवश्यक आहे; परंतु आपल्या शिष्यवर्गाकडून मक्का-वासियांची आगळिक प्रथम होणार नाहीं, अशी सावधगिरी त्यांनीं ठेविली. असें सांगण्यांत येतें कीं, याच वेळीं ईश्वरसन्निध राहून त्यांना पुढील प्रत्या-देश झाला. "शत्रूपासून आपलें रक्षण करण्याकरितां धर्मयुद्ध कर. परंतु शत्रूवर प्रथम आपण होऊन चाल करून जाऊं नको. कारण जो प्रथम चाल करून जाईल, त्याजवर ईश्वराचा कोप होईल" हजरत महम्मदांनीं आपल्या शिष्यवर्गाला हा प्रत्यादेश सांगून त्यांना केवळ आत्मरक्षण करण्या-विषयीं तयार रहावें असा हुकूम दिला. यामुळें मक्कावासियांचा हिरमोड झाला. मदिना येथील मुसलमानांना प्रथम युद्धाला प्रवृत्त करण्यांत त्यांना कोणत्याहि तऱ्हेनें यश आलें नाहीं. त्यांच्या आत्मसंरक्षणार्थ हालचालींनीं मक्कावासीयानां, पाठ दाखवून पळून जावें लागलें. या बारिकसारिक चकमकींनंतर क्रमानें महा-युद्धाला प्रारंभ झाला; व त्या सर्वांत प्रायश: महम्मद व त्यांचा शिष्यवर्ग यांचाच जय होत गेला. क्रमानें, युद्ध धर्मप्रचाराच्या निमित्तानेंच होऊं लागलें; युद्धांत पराजित झालेले लोक इस्लाम धर्माची दीक्षा घेत व यामुळें

हजरतांची प्रतिष्ठा जास्तच वाढूं लागली. ज्या मक्केतून कोरेश संप्रदायाच्या त्रासामुळें व असूयेमुळें त्यांना मदिनेला पळून जावें लागलें, त्या मक्केतील कोरेश-संप्रदायानें इस्लामी धर्माची दीक्षा घेऊन हजरत महंमद हे ईश्वरप्रेरित महापुरुष असल्याचें कबूल केलें; व त्याचप्रमाणें काबामंदिरांतील नाना देवदेवतांची उपासना सुटून महामहिमान्वित ईश्वराच्या पूजेचा सर्वत्र प्रचार पडला. याप्रमाणें क्रमानें सर्व अरब देशांत महंमदाचा अधिकार प्रस्थापित झाला; व यहुदी व ख्रिश्चन लोकांपैकीं बहुतांनीं त्यांच्या धर्माची दीक्षा घेऊन त्यांला ते ईश्वर-प्रेरित महापुरुष समजूं लागले. सारांश, मदिना येथील धर्मप्रचाराच्या वेळींच राष्ट्रस्थापनेचा पाया घातला जाऊन, यवेळीं सर्व अरब देशांचें विशाळ राष्ट्रांत रूपांतर झालें, आणि हजरत महंमद राष्ट्रपतीच्या आसनावर विराजमान झाले.

राष्ट्रपति झाल्यावर सुद्धां हजरत महम्मदांचा पेहेराव, खाणें-पिणें, किंवा नित्याची वागणूक यांत कसलेंहि परिवर्तन झालें नाहीं; परंतु त्यांचे बरेचसे शिष्य मात्र त्यांच्यापेक्षां अर्थदृष्टीनें उन्नत होऊन सुख-समृद्धीनें कालक्रमणा करीत. परंतु हजरत पूर्वीप्रमाणेंच सामान्य जनोचित कालक्रमणा करीत असत; हजारों शिष्य भोंवतालीं असून किंवा हजारों लोकांना दंड करण्याचें किंवा त्यांचें पालन करण्याचें कर्तृत्व आंगीं असूनहि ते अगदीं दीनभावानें अनासक्तचित्त होऊन आपलें कर्तव्य-पालन करीत असत. अर्थसंचय, किंवा सुखोपभोग या विषयींची लालसा त्यांचे ठिकाणीं कधींहि प्रत्ययास येत नसे. आपल्या परिवारवर्गाचें पुढें कसें होईल याविषयीं ते कधींहि व्याकुळ झाले नाहींत. ज्या विशाल राष्ट्राची स्थापना त्यांनीं केली, त्याचा ईश्वरच धर्मराजा आहे, असा मनांत विश्वास बाळगून व त्या ईश्वराचे आपण प्रतिनिधि आहों, असें मानूनच, ते लोकांचें कल्याण व रक्षण याविषयीं चिंता बाळगीत असत. अर्थात् त्यांनीं जी राष्ट्रसंघटना केली, ती कोणत्याहि एका विशेष व्यक्तीच्या अगर स्वोद्देशानें केली आहे ही भावना कधींहि त्यांच्या मनांत उदित झाली नाहीं. हें धर्मराज्य केवळ धर्मबलानेंच प्रस्थापित असून त्याचें शासनहि धर्मानुरोधानेंच चालत होतें. ते जीं धर्मयुद्धें करीत, तीं केवळ या धर्मराज्याच्या विस्ताराकरितां; आणि ह्मणूनच सर्वदा आपल्या शिष्यानां, दुसऱ्यावर प्रथम आपण होऊन आघात करणें अगर रक्तपात करणें याबाबतींत त्यांच्यावर करडी नजर ठेऊन या कामीं त्यांचा निषेध करीत असत. त्यांच्या या आज्ञे-

नुसारच नेहमीं कार्य होत होतीं कीं काय, हें सांगतां येणार नाहीं, परंतु यापासूनच आह्मांला त्यांचा स्वभाव-परिचय होतो. जो धर्मलाभ झाल्यामुळें ते स्वतःला धन्य मानीत होते, व ज्यामुळें त्यानां आनंदातिशयाचा उपभोग घेतां आला, तेंच धर्मामृत सर्वांना पाजण्याची तीव्र आकांक्षा त्यांच्या मनांत इतकी उदित झाली कीं, ज्या उपायांनीं आपलें ध्येय साध्य होईल असें वाटे, ते करण्याला त्यानां मुळींच दिक्कत वाटत नसे. काय केलें असतां सर्व पृथ्वीवर एकसुद्धां मनुष्य अविश्वासू अगर काफर रहाणार नाहीं, या विषयींच्या उपायचिंतनांत ते रात्रंदिवस गढलेले असत; व यासाठींच निरनिराळ्या राजांकडे ते धर्मदूत पाठवून त्यांना या धर्माची दीक्षा घेण्याविषयीं प्रार्थना करीत असत; धर्मावर त्यांचा एवढा विश्वास व दृढभक्ति होती कीं, कोणी त्यांच्या प्रार्थनेचा अवमान केला, तर त्यायोगें ते आपला धर्म व ईश्वर यांचाच अपमान झाला असें मानीत, आणि त्याला स्वप्रचारित सत्य-धर्मांत आणण्याचा प्रथम प्रयत्न करीत आणि एवढ्यानें भागलें नाहीं, तर त्याजबरोबर युद्ध करण्याला प्रवृत्त होत असत. धर्मप्रचारार्थ त्यांनीं जीं युद्धें केलीं, त्याबद्दल महम्मदांचे जीवनचरित्रलेखक केव्हां केव्हां त्यांजवर दोषारोप करितात; परंतु त्यावेळीं देश, काल, आचार व व्यवहार याबाबतींत जी परिस्थिति होती, तिकडे लक्ष देऊन जर त्यानीं महम्मदांसंबंधीं विचार केला असता, तर ते आश्चर्यचकित झाले असते. केवळ १०।११ वर्षांच्या अवधींत एका उच्छृंखल धर्मज्ञानशून्य जातीला धर्मबंधनानें निगडित करून त्यांचें सुयंत्र राष्ट्रतंत्र स्थापन करण्याला या सर्व उपायांचें अवलंबन करणें आवश्यक होतें, याकरितां वर्तमान शतकांतील नीतिगाथांच्या कसोटीला लावून त्यांची संमालोचना करणें हें सुसंगत नाहीं. विशेषतः आह्मांला हें माहित आहे कीं, हजरत जें कार्य करीत, तें करण्यापूर्वीं प्रस्तुत कार्याविषयीं ईश्वरादेश काय आहे, हें जाणण्याच्या इच्छेनें ते उपासना करून ईश्वरसान्निध्यांत रहात आणि जो प्रत्यादेश प्राप्त होई, त्याला अनुसरूनच कार्य करीत; असें असतां त्यांच्या विषयीं चर्चा करणें हा खरोखर अपराधच होतो. ज्या मुसलमानी सुधारणेचा एक दिवस सर्व दिगंतरीं विस्तार होऊन जिचे सर्व जगतावर किती तरी उपकार झाले आहेत, तिचें बीज जर हजरत महम्मदांनीं पेरिलें नसतें, तर उपयुक्त सुधारणा होणें संभवनीय होतें काय? श्रद्धेनें जर विचार केला तर असें स्पष्ट दिसून येईल कीं, हजरतांच्या प्रत्येक कार्यांत भगवन्ताचा मंगलहस्त होता. आपल्या

स्वतःच्या अगर मुलांबाळांच्या इष्टलाभाकरितां हजरत महम्मदांनीं राज्य-विस्तार केला नाहीं, हें त्यांच्या आयुष्यांतील उत्तरचरित्रावरून स्पष्ट होतें. त्यांची जीवन-यात्रा संपण्यापूर्वीं बरेच दिवस, ते एकदां आजारी पडले व त्यांना नमाजाकरितां मशिदींत जातां आलें नाहीं; त्यावेळीं त्यांचा शिष्य अबूबकर त्यांचा प्रतिनिधि होऊन जुम्माचा नमाज पढण्याकरितां गेला, ही बातमी ज्यावेळीं लोकांना कळली, तेव्हां त्यांचा अंतकाळ समीप आला असें समजून त्यांचे शिष्य आक्रोश करूं लागले. हजरतानां हें ज्यावेळीं समजलें, त्यावेळीं शिष्यांना संतुष्ट करण्याकरितां ते मशिदींत गेले व प्रार्थने नंतर शिष्यांना त्यानीं असें समजाविलें कीं, यापूर्वीं जे जे धर्मप्रचारक झाले, ते चिरंजीवि नव्हते, अर्थात् आपणहि चिरंजीवि कसे असणार? खरोखरच आपला अंतकाल समीप आला आहे व आपण लवकरच तुमचा त्याग करून जाणार असें त्यांनीं सर्वांना सांगितलें, आणि सर्वांनीं एकदिलानें धर्मप्रचाराचे कामीं उद्युक्त असावें असा उपदेश केला; परंतु त्यांनीं ज्या विशालराष्ट्राची स्थापना केली, तें पुढें कसें चालवावें यासंबंधीं कांहींहि सांगितलें नाहीं. याबाबतींत आपलें मत जाहीर करण्याविषयीं बऱ्याच लोकांनीं त्यांना अत्याग्रह केला; परंतु त्यांनीं स्पष्ट असें कांहींच सांगितलें नाहीं. ईश्वर व त्याचे प्रत्यादेश यांना अनुसरूनच सर्वांनीं कार्य करावीं असा त्यांनीं उपदेश केला. यावरून हें स्पष्ट आहे कीं, राजवंश निर्माण करण्याचा विचार त्यांच्या मनाला कधींहि शिवला नाहीं. धर्माकरितांच त्यांनीं राष्ट्रस्थापना केली; अतएव, जेव्हां त्यानीं या धर्माचें रक्षण करणें योग्य आहे असें सांगितलें, त्याचवेळीं हें राष्ट्र कसें चालवावें याबद्दलचा विचार त्यांतच समाविष्ट आहे, असा त्यांचा अभिप्राय होता. निस्वार्थ, धर्माला प्राणाहून अधिक समजणाऱ्या, या महापुरुषाचें नांव भगवंताच्या नांवाबरोबरच कायमचें संयुक्त होऊन राहिलें, हें स्वाभाविक व सुसंगतच होय.

हजरत महम्मदांच्या स्वर्गारोहणानंतर राष्ट्ररक्षणाचा भार ज्यांच्यावर पडला, त्या पुरुषांना खलिफा असें नामाभिधान आहे. पदाभिषिक्त नेता असा या खलिफा शब्दाचा अर्थ आहे. धर्मप्रवर्तक रसूल व राष्ट्र-पति महम्मद यांच्या जागेवर जे विराजमान होतात, त्या खलिफांना धर्मगुरु समजून सर्व मुसलमान त्यांना अत्यंत मान देतात. हजरतांनंतर एकापाठीमागून एक असे जे चार खलिफा झाले, त्यांचीं चरित्रें यथाक्रमानें पुढें देत आहों.

प्रकरण दुसरें.

खलिफा अबूबकर.

हजरत महम्मदांचें देहान्तर झाल्यानंतर त्यांच्या जागेवर कोणी बसावें याबद्दल वाद उपस्थित झाला; तो अशा तऱ्हेनें कीं, हजरतांचा मृतदेह समाधिस्थ होण्यापूर्वींच मदिना येथील आन्सार लोकांनीं पुढारीपणा आपल्याकडे घेण्याचें ठरविलें आणि आपल्यापैकींच एकानें हजरतांच्या गादीवर बसावें असा अभिप्राय जाहिर केला. हें ऐकून अबूबकरला मोठी चिंता वाटूं लागली. कारण अयोग्य व्यक्तीला जर नव-सांप्रदायाचें नेतृत्व दिलें तर शेवटीं धर्मप्रचाराचे कामीं विघ्न उत्पन्न होईल; आणि यासाठींच तो अत्यंत व्याकूळ झाला; आणि त्वरित आन्सार लोकांकडे जाऊन त्यानें विचारलें कीं, खरोखरच आपल्या गोटींतील एकाला हजरतांचें आसनाधिष्ठित करण्याचें त्यांचे मनांत आहे काय? उत्तरादाखल त्यांपैकीं एकजण ह्मणाला, आन्सार लोकांनीं हजरतांना आश्रय दिला व धर्मप्रचाराचे कामीं त्यांना सहाय्य केलें ह्मणूनच त्यांचा व त्यांच्या धर्माचा बोलबाला होत आहे; अर्थात्च तुह्मी आन्सार लोकांपैकीं एकाला त्यांचे नेतृत्वाचे जागीं ताबडतोब नेमणें हेंच उचित आहे." त्यावर अबूबकर ह्मणाले, "तुमचें ह्मणणें सत्य आहे, परंतु जर मक्केतील कोरेशवंशीय लोकांना प्रथमच त्यांच्या धर्माची दीक्षा घेतली असती व त्रास दिला नसता आणि जन्मभूमि व गृहसंपत्ति यांचा परित्याग करून मदिनेला येण्याचा व धर्मरक्षण करण्याचा महम्मदांना दृष्टांत झाला नसता, तर आन्सार लोकांनीं या धर्माची दीक्षा घेतली असती किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं; शिवाय मक्केतील कोरेश लोक, वंश व पदमर्यादा (योग्यता) याबाबतींत अरबदेशांतील कोणत्याहि लोकांपेक्षां कमी दर्जाचे नाहींत; या सर्व गोष्टींचा विचार करून जें श्रेयस्कर ठरेल, तदनुसार कार्य करणें हें वर्तमान प्रसंगीं उचित होय." अबूबकरचें विनयान्वित व युक्तिपूर्ण भाषण श्रवण करून आन्सार लोक त्याला ह्मणाले, "तर मग हा कार्यभार तुह्मीच आपल्याकडे घ्या, तुमच्या इतका योग्य दुसरा मनुष्य आमच्या सांप्रदायांत सांपडणार नाहीं." कांहीं लोक असें बोलूं लागले कीं, आन्सार लोकांत कांहीं वाद उपस्थित झाला असून त्याकारणानें त्यांच्यांत दोन तट उत्पन्न झाले आहेत. एका

तटाकडे नेतृत्व सोंपविलें तर दुसऱ्या तटांतील लोक नाखुष होऊन गोंधळ माजवितील याचा विचार करून, आन्सार लोकांतील एबादाऱचा पुत्र साद, धार्मिक व लोकप्रिय अबूबकरकडे नेतृत्व देण्यास कबूल झाला; कारण याला हरकत घेण्याला त्याला कांहीं कारण नव्हतें. परंतु अबूबकरनें सांगितलें कीं, आपल्याकडे नेतृत्व येण्याकरितां मीं हें सर्व सांगितलें नाहीं, तर योग्य मनुष्याची नेमणूक व्हावी एवढाच हेतु आहे. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें ओमर (उम्मर) व आबुओबयदा हे दोन असामी या जाग्याला पूर्ण लायक होते, अतएव सर्वांनीं मिळून या दोहोंपैकीं एकाला पसंत करणें योग्य. वास्तविक मदिना येथील महम्मदांच्या सर्व शिष्यांमध्यें उम्मर हाच सर्वांत जास्त कीर्तिमान् होता; परंतु अबुबकर हजरतांना किती प्रिय होता हें तो जाणत होता, व याच साठीं अबुबकरला सदर अधिकार स्वीकारण्याविषयीं तो आग्रह करूं लागला, त्याच्या विनंतीला मान देऊन अबुबकरनें ती जागा स्वीकारण्याचें कबूल केलें; आणि थोड्याच अवधींत मुसलमानांचा प्रथम खलिफा ह्मणून त्याचें नांव समग्र अरब लोकांत प्रसिद्ध झालें.

खलिफाच्या जाग्यावर आरूढ झाल्यानंतर अबूबकरनें काय कामगिरी केली, याचें विवेचन करण्यापूर्वी तो स्वभावानें, आचारानें, धर्मसंबंधीं प्रेमाच्या बाबतींत, भक्तिमार्गांत व हजरतांचा एकांतांतील अनुचर या नात्यानें तो कसा होता, याचा परिचय प्रथम करून घेणें आवश्यक आहे. हजरत महम्मद व अबुबकर एकाच वंशांतील होते. अबुबकर तमिमवंशोद्भव असल्याचें जरी इतिहासकार प्रतिपादन करीत आले आहेत; तरी वंशावळी पाहिली असतां असें निदर्शनास येईल कीं, अबुबकरच्या पूर्वीचा सहावा पुरुष व हजरतांचा सातवा पुरुष ही एकच व्यक्ति होय. अर्थातच हजरतांप्रमाणें अबूबकर हा कोरेशवंशीय होय. त्याच्या सत्यपरायणतेमुळें तो "सेद्दिकी" या नांवानें सर्वांच्या परिचयाचा होता. मक्का शहरीं ज्या लहानशा पथकानें महंमदांकडून त्यांच्या धर्माची दीक्षा घेऊन मुसलमान सांप्रदायाचा पाया घातला गेला; त्या पथकांतीलच अबूबकर हा एक होता; एवढेंच नव्हे, तर त्यांच्याच उत्तेजनामुळें हजरत महम्मद पहिल्यानें उघड रीतीनें इस्लाम-धर्म-प्रचार करण्याला प्रवृत्त झाले; आणि काबा मंदिराच्या पटांगणांत निर्भयपणें उभा राहून इस्लाम धर्माचें गुणवर्णन करणारा हाच पहिला इसम होय. याप्रमाणें उघड रीतीनें परंपरागत धर्माच्या विरुद्ध आचरण करून त्यानें स्वजन बांधवांकडून झालेल

सर्व दारुण छळ सहन केला; त्या छळाची सर्व कहाणी ऐकिली असतां नेत्र अश्रूंनीं भरून येतात. परंतु या छळामुळें अबुबकर मात्र केव्हांहि व कोठेंहि डगमगला नाहीं व स्वीकृत कार्यापासून विचलित झाला नाहीं. एकदां कांहीं लोकांनीं महम्मद व त्याचे शिष्य यानां वाटेंत पाहिलें, त्याबरोबर या लोकांनीं त्यांजवर एकदम निकराचा हल्ला केला आणि त्यांतील एकानें पाद-त्राण-प्रहारांनीं अबूबकरचें तोंड फोडून काढिलें, त्या योगें त्याचा घोणा फुटून रक्तस्राव होऊं लागला व त्याला इतकी इजा झाली कीं, तो एक अहोरात्र बेशुद्ध स्थितींत होता. परंतु जेव्हां तो शुद्धीवर आला, त्यावेळीं प्रथम महम्मद कुठें आहेत, कसे आहेत हें जाणण्याविषयीं तो अतिशय व्याकुल झाला. व हजरतानां कांहींहि इजा झाली नाहीं हें स्वनेत्रांनीं पाहीपर्यंत त्यानें पाण्याचा एक थेंबसुद्धां पोटांत घेतला नाहीं. अबुबकर इतका दयार्द्रचित्त व परोपकारी होता कीं, एकदां एका इसमाचा काफ्रि-गुलाम आपण इस्लामधर्मानुसार ईश्वरोपासना करतों असें ह्मणाला; त्यावेळीं त्याच्या मालकाला राग येऊन त्यानें त्या गुलामाला तापलेल्या वाळूंत पडून रहाण्याची शिक्षा दिली. व याप्रमाणें त्या गुलामानें केलें असतां त्याच्या उरावर एक मोठा थोरला दगड आणून ठेवून त्याला दाबून धरिला; अबुबकरनें हें पाहिलें त्यावेळीं प्रथम त्याच्या मनांत त्या मालकाविषयीं तिरस्कार उत्पन्न झाला आणि त्यानें त्या मालकाला सांगितलें कीं, या गुलामाला या शिक्षे-पासून मुक्त कर; परंतु मालक अबुबकरचें ह्मणणें मुळींच ऐकेना; तेव्हां आपला एक गौरवर्ण खिस्ती गुलाम व दहा सुवर्ण मुद्रा अबुबकरनें त्या मालकाला देऊन मोबदल्यांत त्या काफ्री गुलामाला सोडवून घेतलें. काफ्रि गुलामाकरितां अबुबकरनें इतका मौल्यवान् मोबदला दिलेला पाहून त्या मालकाला हसूं आवरेना व त्यानें अबुबकरचा उपहास केला; तेव्हां महानुभव अबुबकरनें त्याला उत्तर दिलें, "तुमच्यासारख्या माणसाच्या जाचांतून या गुलामाची मुक्तता करण्याकरितां मला जरि माझी सर्व संपत्ति द्यावी लागती, तरि ती सुद्धां मी क्षणमात्र डरल्याशिवाय दिली असती."

श‍्रूपासून आपलें रक्षण व्हावें ह्मणून मक्का सोडून जेव्हां हजरत महम्मद मदिनाला गेले, तेव्हां त्यांचें संरक्षण करण्याला त्यांच्याबरोबर एकटा अबुबकरच मात्र गेला होता. वाट चालत असतां, पाठीमागून कोणी शत्रू येऊन हजरतानां आघात करील या भीतीनें अबुबकर केव्हां त्यांच्या डाव्या बाजूला, केव्हां पाठीमागें, केव्हां उजव्या बाजूला, केव्हां पुढें असा दौडत असे

व अशा रीतीनें हजरतांविषयीं अतिशय दक्ष असे. हजरतानीं विस्मित होऊन त्याला असें करण्याचें कारण काय असें विचारिलें, तेव्हां त्यानें उत्तर केलें, "ईश्वरावतारी महानुभाव, शत्रुपक्षांतील लोक आपल्यावर कोणत्या बाजूनें चाल करून येतील याचा नियम नसल्यामुळें, त्या भीतीनेंच मला असें करावें लागत आहे; कारण कोणत्याहि बाजूनें शत्रु आला तरी प्रथम माझा विनाश झाला पाहिजे." आपल्यावर अबुबकरचें अशा तऱ्हेचें प्रेम पाहून ते मुग्ध झाले. वाट चालतां चालतां अबुबकरनें ज्या वेळीं पाहिलें कीं, दगडाची ठोकर लागून हजरतांच्या चरणांतून रुधिरस्राव होत आहे, त्या वेळीं त्यानें त्यांना आपल्या खांद्यावर उचलून घेतलें व त्यांना घेऊन तो एका गिरि-गुहेजवळ आला आणि हजरतांना बाहेर ठेऊन गुरुभक्त अबुबकरनें गुहेंत प्रवेश केला आणि आपल्या मूल्यवान् उपरण्यानें गुहा झाडून स्वच्छ केली व आपलें उपरणें हजरतांना बसण्याकरितां पसरिलें; आणि नंतर गुहेला बरींच छिद्रें आहेत असें जेव्हां त्यानें पाहिलें, त्या वेळीं स्वतः विवस्त्र होऊन त्या वस्त्राचे तुकडे केले व त्या बोळ्यांनीं छिद्रें बंद केलीं व नंतर हजरतांना आंत घेऊन आला. वाटेच्या श्रमांनीं क्लान्त झालेल्या हजरतांना आंत आल्यानंतर थोड्याच वेळांत झोंप येऊं लागली; आणि अबुबकरच्या मांडीवर मस्तक ठेऊन ते निद्रावश झाले. इतक्यांत त्या गुहेंत आणखीं एक छिद्र अबुबकरच्या नजरेस पडलें; परंतु तें बंद करण्याला त्याजवळ कांहींहि कापडाचा तुकडा शिल्लक नसल्यामुळें, त्यानें आपला एक पाय लांब करून पायाच्या आंगठ्यानें तें छिद्र बंद केलें व स्वस्थ राहिला. परंतु दुर्भाग्यवशात् त्याच छिद्रांत एक विषारी सर्प होता; त्या सर्पानें अबुबकरच्या पायाला दंश केला. दंशाच्या ज्वालांनीं त्याच्या आंगाचा भडका उडाला. परंतु आपल्या प्रियतम धर्मगुरूचा निद्राभंग होईल, या भीतीनें हालचाल न करतां तो तसाच स्वस्थ राहिला. क्रमाक्रमानें जेव्हां त्या दारुण वेदना त्याला असह्य झाल्या, त्या वेळीं त्याच्या नेत्रांतून अश्रुपात होऊं लागला व कांहीं अश्रुबिंदु हजरतांच्या मुखमंडलावर पडले; त्यामुळें निद्राभंग होऊन त्यांनीं अबुबकरला अश्रूंचें कारण विचारिलें. अबुबकरनें सविस्तर हकीकत सांगितली, त्या वेळीं त्याच्या प्रगाढश्रद्धेचा परिचय हजरतांना झाला व त्यांनीं अबुबकरसाठीं भगवंतांपाशीं आशिर्वादयाचना केली व त्या वेळीं अबुबकरच्या सर्व वेदना नाहींशा होऊन त्याला शांतिसुखाचा अनुभव आला. असें सांगतात कीं,

हजरतांनीं आपल्या तोंडांतील थुंकी अबुबकरच्या सर्पदष्ट आंगठ्याला लाविली आणि त्याच्या सर्व वेदना बंद झाल्या. याप्रमाणें अबुबकरनें गुहेंत हजरतांचें रक्षण केल्यामुळें त्याला "ईयारारि" अर्थात गिरिगव्हरस्थबंधु अशी संज्ञा प्राप्त झाली. मक्केहून निघून मदिनेला पोंचेपर्यंत वाटेंत नेहेमी हजरतांचें सर्व संकटांपासून रक्षण करण्याकरितां त्यानें जे शारीरिक क्लेश अम्लानचित्तानें सहन केले, त्याला दुसरीकडे तोड सांपडणें कठीण आहे.

हजरत महम्मदांच्या अवतारीपणाविषयीं अबुबकरचा केवढा दृढविश्वास होता, यांचा परिचय झाला असतां, हजरतांच्या शिष्यवर्गांत अबुबकरचा दर्जा किती उच्च प्रतीचा होता, हें सर्वांना समजून येईल. एकदां कांहीं व्रतसाधन करण्याच्या हेतूनें व स्वाभाविकच पुष्कळ दिवसांनीं जन्मभूमि दर्शनोत्सुख होऊन हजरत महम्मदांनीं शिष्यवर्ग व उंट बरोबर घेऊन मदिनेहून मक्का येथील काबा मंदिराला जाण्याकरितां प्रवासाला आरंभ केला. योग्य वेळीं ते मक्केच्या समीप येऊन पोंचले व त्यांच्या आगमनाची बातमी मक्केच्या लोकांना समजली; तेव्हां कोरेश लोकांनीं हजरतांच्या व्रतसाधनांत अडथळा करण्याचा निश्चय केला. हजरतांनीं आपला इकडे येण्याचा हेतु शांतचित्तानें त्यांना समजावून दिला; परंतु त्यांनीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. एवढेंच नव्हे, तर युद्ध करून हजरतांना पिटाळून लावावयाचें असा त्यांनीं बेत केला. परंतु युद्ध करावयाचें नाहीं, असा बेत हजरतांनीं ठरवून आपल्या शिष्यांना निःशस्त्र होण्याविषयीं सांगितलें. परंतु हजरतांच्या सद्व्यवहाराला कोरेश लोक जेव्हां असद्व्यवहारानें प्रत्युत्तर देऊं लागले, तेव्हां शिष्यवर्गानें हजरतांच्या इच्छेविरुद्ध लढाई करण्याचा निश्चय जाहीर केला. हजरतांचे १५०० शिष्य लढाईला उद्युक्त झालेले पाहून कोरेश लोकांचें धाबें दणाणलें व ते तह करण्यास कबूल झाले. या तहाचे प्रसंगीं कोरेश लोकांवर हजरतांनीं फारच मेहेरबानी केली; परंतु तहनाम्यांत हजरतांना "ईश्वराचे धर्मप्रचारक" असें विशेषण लावावयाला सुद्धां त्यांनीं विरोध केला. हजरत त्यालाहि कबूल झाले; या तऱ्हेनें दोघांत ज्या ज्या बाबतींत विरोध येईल, त्या त्या बाबतींत हजरतांनीं प्रतिपक्षाला गयच केली, परंतु यांत कोरेशवंशियांच्या दृष्टीनें आपल्या शिष्यवर्गाची किती मानहानि होत आहे, इकडेहि त्यांनीं दुर्लक्ष केलें; त्या वेळीं त्यांच्या शिष्यवर्गाला इतकें वाईट वाटलें कीं, उमर नांवाचा एक मुख्य शिष्य हजरतांना असत्याला आश्रय दिला जात आहे असें ह्मणून हजरतांवरच

रागावला. ईश्वरादेशाला अनुसरूनच आपण असें करीत आहों, असें सांगून हजरतांनीं त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यानेंहि उमरचें समाधान न झाल्यामुळें त्यानें अबुबकरकडे जाऊन त्याजवळ हजरतांच्या अन्यायाचरणाबद्दल कुरकुर केली. तेव्हां हजरतांच्या अवतारित्वाविषयीं अगाध विश्वास असलेल्या अबुबकरनें त्याची निर्भर्त्सना केली व ह्मणाला, "लक्षांत ठेव, महापुरुष महम्मद ईश्वरप्रेरित आहेत. ईश्वराचा आदेश घेतल्यावांचून ते कोणतेंही कार्य करीत नाहींत. अतएव त्यांच्या कार्यांत व्यत्यय आणणें किंवा त्यांविषयीं संशय प्रदर्शित करणें, हें तुमच्यासारख्या शिष्यप्रवराचें कर्तव्य नव्हे." अबुबकरच्या या भाषणानें उमरच्या मनावरचें भ्रमपटल दूर झालें, आणि त्याच्या हृदयांत दारुण वेदना होऊं लागल्या. अखेरीस हजरतांकडे जाऊन जेव्हां त्यानें क्षमेची याचना केली, त्या वेळीं त्याचें मन शांत झालें. अबुबकरचें चारित्र जसें जसें जास्त अवलोकन करावें, तसें तसें त्याचें गंभीर धर्मप्रेम व हजरतांविषयीं अकृत्रिम भक्ति यांचा अधिकाधिक परिचय होत जातो.

अबुबकर महम्मदांपेक्षां दोन वर्षांनीं लहान होता. यामुळें उभयतानांहि समवयस्क समजलें जात असे. परंतु अबुबकरनें हें केव्हांहि मनांत आणिलें नाहीं. हजरतांविषयीं चिरदिन गुरुभक्ति प्रगट करण्यांतच तो स्वतःला धन्य मानीत असे, त्याचें वर्णन कोठपर्यंत करावें! कालवशात् हजरतांची प्रथम पत्नी व त्यांची पहिली शिष्यीण खदिजाति देवी मृत्यु पावल्यानंतर, त्यांनीं ईश्वरी आदेशानुसार अबुबकरची परम रूपवती व गुणवती कन्या आयेषा हिचें पाणिग्रहण केलें; यामुळें वास्तविक अबुबकर हजरतांच्या गुरुजनस्थानीं झाला; परंतु तिकडे कधींहि लक्ष न देतां तो हजरतानांच नेहमीं श्रेष्ठ समजत असे उलटपक्षीं आपण आपल्या शिष्यवर्गापेक्षां श्रेष्ठ आहों अशा समजुतीनें हजरत कधींहि शिष्यांबरोबर वागले नाहींत. ते आपल्या शिष्यवर्गापैकीं सर्वांबरोबर बंधुभावानें वागत असत, आणि यामुळेंच त्यांना " ईषार " ह्मणजे बंधु या शब्दानें संबोधिलें जात असे.

या मुसलमान लोकांचा प्रथम खलिफा, अबुबकरच कां झाला या विषयीं एक गोष्ट आहे. मागाहून ही गोष्ट स्वतः अबुबकरनेंच सांगितली असा कित्येक ग्रंथांत आधार सांपडतो. आपण प्रेरितपुरुष आहों असें सांगून हजरत महम्मदांनीं धर्मप्रचारास सुरुवात करण्यापूर्वीं बरेच वर्षांची

गोष्ट. अबुबकर निद्रावश असतां एकदां त्यानें एक स्वप्न पाहिलें कीं, स्वर्गांतून एक अपूर्व ज्योति खालीं येऊन काबामन्दिराच्या कळसा (शिखरा) वर कांहीं वेळ स्थित झाली आणि क्रमानें तीच ज्योति मोठी होऊन समग्र मक्का शहरांत पसरली. शेवटीं ती ज्योति घनीभूत (साकार) होऊन अबुबकरच्या घरांत जाऊन स्थिर झाली. हें स्वप्न पाहिल्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो एका यहुदी पंडिताकडे जाऊन सर्व हकीकत सांगून त्याला या स्वप्नाचें मर्म सांगण्याविषयीं विनंति करिता झाला. त्या पंडितमन्यांनीं त्याला सांगितलें कीं, हें स्वप्न ह्मणजे एक मेंदुजनित निद्रावस्थेंतील विकार आहे, याशिवाय दुसरें कांहीं नाहीं. परंतु अबुबकरचें या निर्णयानें समाधान होईना. कांहीं वर्षें गेल्यानंतर अबुबकर व्यापार करण्याकरितां बसरा शहरीं गेल्यावेळीं एका प्रसिद्ध संन्यासी भविष्यवाद्याला भेटला आणि त्याला या स्वप्नाची हकीगत सांगितली, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, "लवकरच परमेश्वराच्या इच्छेनें मक्का नगरांत एक धर्मप्रवर्तक महापुरुष अवतीर्ण होईल, तो एका नूतन धर्मतेजानें हें शहर प्रकाशमान करील आणि तो तुह्मांस सदर धर्मप्रचाराचे कामीं सहकार्य करण्याकरितां घेईल. तो परलोकीं गेल्यावर तुह्मी त्याचे खलिफा किंवा स्थलाभिषिक्त प्रतिनिधि व्हाल." अबुबकरनें ही गोष्ट कोणाजवळहि प्रकट केली नाहीं. नंतर हजरत महम्मद ज्यावेळीं आपण प्रत्यादिष्ट पुरुष आहों अशी घोषणा करूं लागले व अबुबकरला आपल्या धर्माची दीक्षा घेण्याविषयीं उपदेश केला, त्यावेळीं अबुबकरनें त्यानां आपल्या ईश्वरप्रेरितत्वाबद्दल प्रमाणें दाखविण्याला सांगितलें; त्यावेळीं हजरत ह्मणाले, "बसऱ्याच्या संन्याशानें तुह्मांला स्वप्नाविषयीं जी व्याख्या सांगितली, तेंच प्रमाण." अबुबकर विस्मित झाला आणि हजरतानां हें कसें कळलें अशी जिज्ञासा केली, तेव्हां हजरत ह्मणाले, स्वर्गीय दूतांकडून हें आह्मांला कळलें. तेव्हां अबुबकरला आणखीं जास्त संशयाला कारणच राहिलें नाहीं. त्यानें हजरतांकडून नूतन धर्माची दीक्षा घेतली.

अबुबकरचें चरित्र व शक्तिसामर्थ्य यांविषयीं उमरला जितकी माहिती होती, तितकी दुसऱ्या कोणालहि नव्हती; वास्तव हजरतांचे पश्चात् इस्लामच्या कर्णधारहीन नाविकेचें चालकत्व अबुबकरकडे सोंपविण्यांत त्याची विशेष अनुकूलता होती. अबुबकरनें ईश्वरी इच्छा असें ह्मणून खलिफाच्या जागेचा स्वीकार केला. परंतु या पदमर्यादा-गौरवाचा निष्कंटक उपभोग घेण्याचें

त्याच्या नशिबीं नव्हतें. खलिफाचा कार्यभार ग्रहण केल्यानंतर दुसरे दिवशीं त्यानें मशिदींत जाऊन वेदीवर आरोहण करून इस्लामाचें कर्तव्य केलें. अर्थात् प्रार्थना व उपदेश केला; परंतु यामुळें अनेकांच्या मनांत त्याच्याविषयीं असूया उत्पन्न झाली, आणि त्याचें नेतृत्व स्वीकारण्याला ते नाकबूल झाले; आणि शेवटीं हजरतांचे जामात आलि (अलि) यांना आपले इमाम व खलिफा मानून ते त्याचे अनुचर बनले, असा मजकूर कांहीं इतिहासकारांनीं लिहून ठेविला आहे. परंतु कांहीं ग्रंथकार ही गोष्ट खरी असल्याचें नाकबूल करितात; त्यांचें म्हणणें असें कीं, हजरतांच्या सहचरांनीं अबुबकरच्या नेतृत्वाचा अंगिकार केला असें दिसल्यानंतर अलिनें त्याचें अनुचरत्व पत्करिलें. त्यापूर्वी अबुसुफियान या नांवाचा मनुष्य अलीकडे जाऊन म्हणाला कीं, "आपण हजरतांचे जामात असून अबुबकरचा अनुचर होणें बरें काय? आपण एकवार जाहिर रीतीनें हुकूम मात्र करा, कीं हें मदिना शहर घोडेस्वार व पायदळ सैन्यानें भरून टाकतों." हें त्याचें भाषण ऐकून अलीनें अतिशय असंतोष प्रदर्शित करून म्हटलें कीं, "इस्लाम धर्म ग्रहण करण्यापूर्वी तुम्हीं जोंपर्यंत नाना देवदेवींची पूजा करीत होतेत, तोंपर्यंत लोकांबरोबर विवाद-विसंवाद करण्यांत आनंद होत होता; परंतु या पवित्र इस्लाम-धर्माची दीक्षा घेऊन तुम्हीं अशा नीच प्रवृत्तीचें प्रदर्शन कसें करूं शकतां?" महात्मा अलिचें हें भाषण ऐकून तो लज्जित होत्साता ज्यास्त कांहीं बोलूं शकला नाहीं. वास्तविक मदिना, मक्का व तायेफा येथील रहिवासी अविचलित चित्तानें अबुबकरचें नेतृत्व पत्करितें झाले, परंतु इतर ठिकाणच्या कांहीं अरबांनीं असें न करितां लवकरच अन्य तऱ्हेचा परिचय दिला असें दिसतें. प्रथमतः असें दिसून येतें कीं, नमाज व अन्य धर्मानुष्ठान व्यवस्थितपणें करणें, आणि राष्ट्रसंरक्षण करण्याकरितां लोकांकडून जिजिया कर घेण्याची जी पद्धत हजरत महम्मदांनीं अमलांत आणिली होती, त्या गोष्टींना त्यांनीं असम्मति दर्शविली. अन्यत्र कोठें कोठें कांहीं लोक आपण इमाम आहों असें जाहीर करूं लागले व आपली अधिकारमर्यादा विस्तृत करण्याची खटपटहि त्यांनीं चालविली. असओद नांवाचा एक पुरुष एयमन प्रदेशांतील अधिपतीचा खून करून आपण त्याच्या स्थानावर आरूढ झाला व स्वतःला हजरतांचा स्वयंभिषिक्त प्रतिनिधी म्हणवूं लागला. थोड्या दिवसांनंतर दुसरा एकजण असओदचा खून करून स्वतः त्याच्या जागेवर आरूढ होऊन आपला अधिकार

चालवूं लागला. अन्यत्र कांहीं यायावर आरबहि विद्रोह करूं लागले. परंतु या सर्व घोंटाळयामुळें अबुबकर किंचिन्मात्र विचलित झाला नाहीं. हजरत महम्मदाच्या प्राणवियोगानंतर लवकरच ग्रीकांबरोबर युद्धाला प्रारंभ झाला होता, त्याचा शेवट कसा लावावा या विचाराला तो प्रथम लागला. त्यांच्या-बरोबर युद्ध करून त्यांना पिटाळून लावण्याच्या भानगडींत न पडतां त्यानें ग्रीकांना मदिनेवर चाल करणें कसें अशक्य होईल याचाच विचार चालविला. सैन्य ग्रीकांबरोबर लढण्यांत गुंतलें होतें, त्याला सहाय्य करावयाचें त्यानें ठर-विलें व शत्रुदमन करण्याच्या खटपटीला लागला. धर्मराज्यरक्षणाच्या इच्छेनें प्रणोदित झालेले मुसलमानसैनिक प्राणाचीही पर्वा न करितां शत्रूंवर शस्त्र चालवूं लागले, परंतु शत्रुसैन्यांत धर्मभावनेसारख्या उच्च भावना नसल्यामुळें लढण्यांतील त्यांची मनोभावना तीव्र नव्हती; अर्थात थोड्याच वेळांत त्यांचा पराभव झाला. परंतु पराभूत शत्रुसैन्यांत मुसलमानी धर्माची दीक्षा घेण्याची इच्छा ज्यांनीं प्रकट केली, त्यांना अबुबकरनें क्षमा केली व आपल्या सैन्यांत दाखल करून घेतलें. अशा तऱ्हेनें बहुत शत्रुसैनिकांना दंड होऊन त्यांना आपल्या सुटकेकरितां मुसलमानी धर्माचें वर्चस्व कबूल करावें लागलें.

खलिफाच्या पदावर आरूढ झाल्यानंतर अबुबकर आणखी एका कर्तव्य-पालनांत गढून गेला होता. हजरतांच्या ओसामा नांवाच्या एका छात्राच्या बापाचा शाम देशांती (सुरिया) ल लोकांनीं वध केला होता. या वधानंतर लवकरच त्यांना शासन करावें, म्हणून हजरतांनीं त्यांच्यावर चाल करून जाण्याविषयीं ओसामाला आज्ञा केली. परंतु कांहीं विशेष कारणामुळें ओसा-माच्या हातून सदर आज्ञा पाळली गेली नाहीं. गुरूच्या आज्ञेचें पालन व्हावें म्हणून अबुबकरनें या वेळीं ओसामाला सुरिया अथवा शाम देशावर पाठविलें. त्यानें त्याप्रमाणें जाऊन पितृहन्त्याला शिक्षा केली व स्वस्थानीं परत आला.

हिजरीच्या बाराव्या वर्षी युफ्रेटीस नदीच्या निम्न प्रदेशांत तीन व्यक्ति आपण ईश्वरावतारी आहों असें उघड प्रतिपादन करूं लागल्या व मुसलमा-नांवर नानातऱ्हेचे अत्याचार करण्याचा उपक्रम त्यांनीं केला; यामुळें खलिफा अबुबकर यांनीं त्यांचें दमन करण्याकरितां आलओयालीचा पुत्र खलिद याला सेनापति करून उक्त प्रदेशांत रवाना केलें. खलिदच्या शौर्यामुळें सदर बंड-खोरांचा विध्वंस होऊन ते सिरिया प्रांताकडे पळाले व तेथील अधिकाऱ्यांच्या

आश्रयाचा त्यांनीं स्वीकार केला; परंतु खलिदनें सीरिया प्रांतावरहि चाल केली व घोर युद्ध करून शेवटीं तेथील रहिवाशांचा पराभव केला व त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा दिली.

उपरोक्त युद्धाशिवाय धर्मद्रोह्यांना शासन करण्याकरितां अबुबकरला आणखीं कांहीं लढाया कराव्या लागल्या व त्यांत त्याला जय प्राप्त झाला; नंतर सदर विधर्मियांना त्यानें स्वधर्मांत घेतलें. लढाया करण्यापूर्वी तो स्वकीयांचा सल्ला घेत असे व त्यांच्या साहाय्यानेंच युद्ध करीत असे. जेव्हां युद्धप्रसंगीं सर्व सैनिक सुसज्ज होऊन अबुबकरच्या भोंवतीं जमत व त्याचेविषयीं पूज्यभाव प्रकट करीत, तेव्हां नानातऱ्हेच्या उपदेशदानानें तो त्यांना उत्साहित करीत असे. त्याच्या सर्व उपदेशांमध्यें, एका बाजूनें त्याचें रणपांडित्य व दुसऱ्या बाजूनें त्याची नीतिमत्ता यांचा परिचय होतो. आपल्या उपदेशानें सेनापतीवर्गाला तो विस्मित करीत असे. सैनिकांना पुढें पिटाळून आपण पाठीमागें न रहातां आपण नेहेमीं सैन्याबरोबरच असलें पाहिजे; कोणत्याही कारणासाठीं सैन्यापासून दूर न रहाण्याविषयीं विशेष दक्ष असावें, असें त्यांचें म्हणणें असे. आपल्याच मिजासींत न रहातां, सर्व काळ सैनिकांचा परामर्ष घेण्यांत घालवावा; सर्वांशीं न्यायमार्गाचें अनुसरण करावें आणि अत्याचार व सूड यांपासून दूर रहावें असा त्याचा नेहेमीचा उपदेश असे. त्याचें असेंहि सांगणें असे कीं, अत्याचारी माणसाचें कधींहि कल्याण होत नाहीं व त्याला शत्रूवरहि जय मिळवितां येत नाहीं." कुराणांतील वचनें उद्धृत करून युद्धांत पराक्रमप्रदर्शन करण्याविषयीं सैनिकांत उत्साह उत्पन्न करी व तसेंच त्याच ग्रंथांतील वचनाधारें असाहि उपदेश करी कीं, "जयानें उन्मत्त होऊन शिशु, अल्पवयस्क, वृद्ध व स्त्रिया यांचा वध कधींहि करूं नये." एवढेंच नव्हे, तर सर्वसाधारण लोकांना क्लेश देणें हा युद्धाचा हेतु नव्हे; फलवान् (लागता) वृक्ष तोडूं नये किंवा धान्यक्षेत्रें अग्नीनें दग्ध करूं नये, अशी त्याची स्पष्ट ताकीद असे. सूड किंवा हिंसा याच्या इच्छेनें अगर अर्थ किंवा कीर्ति यांच्या लालसेनें, खलिफा अबुबकर या कोणत्याहि युद्धांत पडला नाहीं. उलटपक्षीं धर्मप्रचार व धर्मराज्यस्थापना हेंच त्याचें उद्दिष्ट होतें व हें त्याच्या उपरोक्त उपदेशावरून स्पष्ट नजरेस येतें. त्या काळीं बाहुबलावरच आपलें संरक्षण करणें शक्य होतें व त्या काळींहि दुर्दान्त अरब लोकांशीं व्यवहार करतांना अबुबकर कधींहि नीतिमार्गच्युत झाला नाहीं. आपल्या सेनापति-

वर्गाला तो नेहमी बजावीत असे कीं, "धर्मद्रोह्यांबरोबर जे वचनबद्ध झाले असतील, त्यांना जिंकावें व त्यांजबरोबर तह करावा, परंतु त्यांना प्रतिज्ञाभंग करण्याला लावूं नये व त्यांच्या दमनाविषयीं व तसेंच रक्षणाविषयीं दक्ष असावें." ह्या प्रकारचें नीतिज्ञान व धर्मज्ञान हल्लींच्या सुधारलेल्या युगांतहि दुर्लभ आहे. राज्य-पिपासा-लालसेनें किती तरी सुधारलेल्या जाति (देश) सत्य, नीति व धर्म यांना पद-दलित करतांना किंचिन्मात्र कुंठित होत नाहींत, हें इतिहासाचीं पृष्ठें चाळलीं असतां स्पष्ट निदर्शनास येईल.

रोम साम्राज्यांतील सीरिया प्रांतांतील ख्रिश्चन लोकांबरोबर अबुबकरच्या नेतृत्वाखालीं जें युद्ध झालें, त्याचा उल्लेख करणें विशेष जरूर आहे. एक एक लक्ष रोमीय ख्रिश्चन लोक जिवावर उदार होऊन मुसलमान सैन्याला विरोध करीत, परंतु धर्मोन्मत्त मुसलमान सैन्याच्या पराक्रमानें त्यांच्या पाठीचा कणा खिळखिळा होऊन जाई. सिंहासमोर कोल्ह्यांच्या कळपाची जी स्थिति होते, तशीच स्थिति फक्त ३५ हजार मुसलमानांपुढें एक एक लक्ष रोमीय ख्रिश्चन लोकांची होत असे. त्यांचा पराभव झाला ह्मणजे ते ख्रिश्चनधर्माचा त्याग करून इस्लामी धर्माची दीक्षा घेत असत. अशा रीतीनें अबुबकरनें थोड्याच अवधींत बरेच प्रांत इस्लामी राज्यांत सामील केले आणि हजारों लोकांना इस्लाम धर्माची दीक्षा देऊन मुसलमानांची शक्ति व कीर्ति वाढविली. सवा-दोन वर्षांपेक्षां किंचित अधिक काळ त्यानें खलिफापदाचा उपभोग घेतला. त्या अवधींत त्या वेळच्या समस्त इस्लामधर्मावलंबी लोकांच्या श्रद्धेला व सन्मानाला तो पात्र झाला. त्यानें सर्व कार्यांत आपल्या धर्म-गुरु-प्रेरित पुरुषाच्या उपदेशानुसार वर्तन ठेविलें होतें. हजरतांच्या गादीवर अधिष्ठित होऊन व विशाल राष्ट्राचा अधिपति होऊन सुद्धां त्यागी संन्याशाप्रमाणें तो आपलें जीवन व्यतीत करीत असे. त्याच्या जीवनचरित्र लेखकांनीं कोठें कोठें त्याच्या विषय-वैराग्यासंबंधीं ज्या गोष्टी लिहून ठेविल्या आहेत, त्या वाचीत असतां वाचक थक्क होऊन जातो. खलिफापदावर नियुक्त झाल्याच्या दुसऱ्या दिवशींच त्यानें आपल्याकरितां एक मोठी चादर पांघरण्याकरितां घेतली; ती घेऊन तो नित्य स्वतःला लागणाऱ्या जिनसा आणण्याकरितां स्वतः बाजारांत जात असे. एके दिवशीं या वेशांत त्याला पाहून एक नातलग त्याला ह्मणाला कीं, या पोशाखांत तुह्मीं कोठपर्यंत जात आहां ? अबुबकरनें सरळपणें उत्तर केलें कीं, नित्यक्रमाप्रमाणें बाजारांत जातो. यावर तो नातलग ह्मणाला,

"जो मुसलमान लोकांचा राजा, त्यानें असलें काम करणें अयोग्य आहे." असलें काम करण्यापासून त्यानें परावृत्त व्हावें, अशाबद्दल त्या नातलगानें बरीच रदबदली केली. यावर सरळ स्वभावाचा अबुबकर ह्मणतो, "मी खलिफा झालों हें सत्य आहे; परंतु माझा परिवारवर्ग आहे, त्याच्याबद्दलचें माझें कर्तव्य मला केलेंच पाहिजे. त्याच्या पोटाची कांहीं तरी तजवीज केलीच पाहिजे. अर्थातच मी खलिफा झालों, त्यामुळें त्यांचें पोट कसें भरणार ?" नातलग ह्मणतो, "सार्वजनिक कोठींतून आपलें व आपल्या कुटुंबाचें भरण-पोषण होऊं शकेल." उत्तरादाखल अबुबकर ह्मणतो, "धर्माची चाकरी केल्याबद्दल वेतन कसें घेतां येईल" ? त्या वेळीं नातलग ह्मणाला कीं, "तुह्मीं जो कार्यभार आंगावर घेतला आहे, तो नीट रीतीनें सांभाळतांना स्वतःचें खासगी काम करण्याला फुरसत कशी सांपडेल ? अतएव सार्वजनिक कोशागारांतून भरण-पोषणाला लागणारें द्रव्य घेणें, हा कोणत्याहि प्रकारें अपराध होत नाहीं." हा विषय त्या नातलगानें इतर धर्मबांधवांसमोर विचाराकरितां मांडिला. त्यांनीं जेव्हां अनुकूल अभिप्राय दिला, त्या वेळीं नित्य अर्ध्या बकरीचें मांस व कांहीं खजूर इतकें स्वीकारण्याचें अबुबकरनें कबूल केलें. याशिवाय वस्त्राभरणाकरितां वर्षाला दोन साधे पोषाख तो घेत असे. अबुबकर कोणत्या प्रकारें विवेकबुद्धीला अनुसरून वागत असे, हें त्याचें सर्व चरित्र वाचलें असतां समजून येईल.

हिजरी सनाच्या तेराव्या वर्षी व इसवी (खिस्ती) सन ६३४ च्या आगस्ट महिन्यांत पहिला खलिफा अबुबकर मानवदेह सोडून जाता झाला. हजरत महंमदांच्या समाधीच्या पाठीमागें आपली समाधी (थडगें) असावी, अशी इच्छा त्यानें मृत्यूपूर्वी प्रदर्शित केली होती. त्यांची ती इच्छा पूर्ण करण्यांत आली. मृत्यूसमयीं आपल्या जाग्यावर कोणाला अभिषेक करावा, हें त्यानें सांगितलें नाहीं. अर्थात हजरतांच्या पश्चात खलिफाच्या जाग्यावर ज्या उमरला नेमण्याविषयीं त्यानें सर्वांस सुचविलें होतें, तो उमर अबुबकरच्या पश्चात् द्वितीय खलिफा ह्मणून अभिषिक्त झाला.

प्रकरण तिसरें.

द्वितीय खलिफा उमर.

खलिफा उमर मक्का शहरांत " ओमरबेन-अल खेताब " अर्थात् खेताबचा पुत्र उमर या नांवानें प्रसिद्ध होते. खलिफा अबुबकर व हजरत महम्मद ज्या कोरेशवंशांत जन्म ग्रहण करिते झाले, त्याच वंशांत उमर हे जन्म पावले. हजरत महम्मदांच्या पूर्वीचा जो आठवा पुरुष, तो उमरचा नववा पुरुष होय. हजरत महम्मद हे अवतारी पुरुष असल्याचें जाहीर झाल्यानंतर पांच वर्षांनीं व आपल्या वयाच्या सव्विसाव्या वर्षी उमरनीं इस्लामीधर्माची दीक्षा घेतली. त्यावेळीं हजरतांची शिष्यसंख्या फक्त चाळीस होती. इस्लाम-धर्माची दीक्षा घेण्यापूर्वी उमर हा हजरत महम्मद व त्यांचा शिष्य वर्ग यांचा कट्टा शत्रु होता. ख्रिश्चनधर्म प्रचारक सेंट पॉल हे सदर धर्माची दीक्षा घेण्यापूर्वी ख्रिश्चन लोकांना अतिशय त्रास देत असत; त्यापेक्षां पुष्कळ जास्त प्रमाणानें उमर मुसलमानानां छळीत असे. पॉलचें विचारपरिवर्तन व ख्रिश्चन-धर्म-ग्रहण यांच्या इतिहासापेक्षां उमरच्या इस्लामधर्म दीक्षाग्रहणाचा इतिहास अपूर्व आहे. तो इतिहास आम्हीं यापुढें देत आहों.

हजरत महम्मदांचा शिष्यवर्ग ज्या मानानें वाढूं लागला, त्या मानानें मक्केतील कोरेश लोकांचा त्यांच्या विषयींचा विरोधहि तीव्रतर होऊं लागला. नूतन धर्म सांप्रदाय व त्यांचा नेता यांचें दमन कोणत्याप्रकारानें करावें, हें ठरविण्याकरितां कोरेश लोकांतील दहा पुढारी नित्य एकत्र जमून या विषयाची चर्चा करीत असत. एकदां काबामंदिरांत नित्यक्रमाप्रमाणें मंडळी जमली असतां, उमरचा चुलता अबुजहल सर्वांनां उद्देशून ह्मणाला कीं, महम्मदासंबंधीं यापुढें उदासीन राहाणें अयोग्य होईल; आपल्या पूर्वजांच्या धर्माची तो पायमल्ली करीत आहे, व आपल्या सर्व देवतांसंबंधीं अपमानसूचक भाषा वापरीत आहे, या करितां त्याला जबरदस्त शिक्षा केल्यावांचून यापुढें कोरेश लोकांची मानमर्यादा रहाणें कठीण आहे; असें बोलतां बोलतां अबुजहल क्रमानें जास्त उत्तेजित होऊन बोलूं लागला, " मीं आज शपथपूर्वक प्रतिज्ञा करितों कीं, महम्मदाचें मस्तक छेदन करून जो मजकडे आणील, त्याला शंभर लोहितवर्णाचे उंट आणि पांचशें सुवर्णमुद्रा मी आनंदानें देईन." उमर

त्या मंडळींत होताच; तो अबुजहलचें भाषण श्रवण करून त्याला ह्मणाला कीं, तुह्मीं आतां जें बोललां, तें खरोखर मनापासून आहे काय ? अबुजहल त्याला ह्मणाला, " मीं अगदीं शपथ घेऊन सत्य सांगतों कीं, जें मीं एकदां बोललों तें फिरवणार नाहीं. " उमरला तें खरें न वाटल्यामुळें त्यानें त्याला काबामंदिरांतील देवतांची शपथ घेण्यास सांगितलें. अबुजहलनें त्याप्रमाणें, केलें, तेव्हां उमर ह्मणाला, " मीच महम्मदाचा शिरच्छेद करून त्याचें मस्तक घेऊन येतों." इतकें बोलून, व अबुजहलचा हात आपल्या हातांत घेऊन तो काबामंदिरांत गेला व तेथील प्रधान देवता हबल देव यास साक्षी ठेऊन आपल्या हातांत खड्ग घेऊन तो हजरतांचा शिरच्छेद करण्याकरितां निघाला. परंतु विधात्याची घटना आश्चर्यकारक व अतर्क्य आहे; उमरनें आपलेंच मस्तक हजरतांचें चरणकमलीं नमविलें. हें परिवर्तन कसें झालें हें समजलें असतां लीलामय भगवंताचा महिमा पाहून मन आश्चर्यचकित होतें.

उमर जेव्हां क्रोधोन्मत्त होऊन हातांत तरवार घेऊन महम्मदाच्या घरासमोर येऊन उभा राहिला, तेव्हां वाटेंत एक प्रच्छन्न इस्लाम धर्मानुयायी त्याला भेटला. त्याची मनापासून इस्लामधर्मावर श्रद्धा होती, परंतु लोकभयानें तो तत्संबंधीं उपासनादि गुप्तपणें करीत असे. त्यानें उमरची उग्र मूर्ति पाहून तो अशा तऱ्हेनें कोठें जात आहे अशाबद्दल उम्मरजवळ जिज्ञासा केली. उमरनें सर्व हकीकत सांगितली, तेव्हां तो उमरला ह्मणाला, "तूं भलतेंच साहस करीत आहेस; एका लहानग्या बकऱ्याला माझ्याकडे धरून आण पाहूं? तुझी शक्ति किती आहे तें तरि मला पाहूं दे." असें ह्मणून समोरच्या पटांगणांत असलेल्या एका अज-शावकाकडे त्यानें बोट दाखविलें. उमर त्या अज-शावकाला धरावयास गेला, तेव्हां तें बकरें इतक्या द्रुतवेगानें पळालें कीं, उमरला तें कांहीं केल्या धरतां येईना. तेव्हां ती प्रच्छन्न व्यक्ति ह्मणाली, "या लहानशा बकऱ्याला धरण्याचें काम तुमच्यानें होत नाहीं, मग पुरुषसिंह महम्मदाची हत्या करण्याचें भलतेंच साहस तुह्मीं उगाच करीत आहां." हें त्याचें भाषण ऐकून उमरचा क्रोधाग्नि प्रज्वलित झाला, व त्या प्रच्छन्न व्यक्तीला तो कठोर स्वरानें ह्मणाला, "तुह्मीं त्याच्याच धर्माचें अवलंबन केल्याचें दिसत आहे." तेव्हां त्यानें उमरचें ह्मणणें नाकारलें व ह्मणाला, "मीं आपल्या वडिलांच्या धर्मांतच आहें, परंतु तुह्मांला सावध करण्याकरितां असें बोलिलों." तेव्हां त्याजवळ बोलण्यांत अधिक वेळ न दवडतां आपलें उद्दिष्ट साधण्या-

करितां, उमर द्रुतवेगानें पुढें गेला. थोड्या अंतरावर गेला असेल नसेल इतक्यांत, आणखी एक व्यक्ति त्याजसमोर आली. उमरचा अभिप्राय जाणून उमरला त्या दुष्ट पापकार्यापासून निवृत्त होण्याविषयीं त्या व्यक्तीनें त्याला उपदेश केला. ही व्यक्तिहि महम्मदाच्या नवधर्माची अनुयायी असली पाहिजे असा विचार करून त्याला मारण्याकरितां उमरनें आपली तरवार उगारली. तेव्हां तो मनुष्य ह्मणतो, "मीं स्वधर्माचा त्याग केलेला नसून सुद्धां तुह्मीं मजवर रागावलां आहां! प्रथम आपल्या घरांत काय चाललें आहे याची खबर घ्या, आणि नंतर दुसऱ्याच्या कार्यांत हात घाला." अमरची समजूत मुळींच न पटल्यामुळें त्याला उमर ह्मणाला, "तुह्मीं ह्मणतां तरी काय? आमच्या घरीं काय चाललें आहे?" तेव्हां ती व्यक्ति ह्मणाली, "कां, तुमची बहीण फातिमा व भगिनीपति सैद यानीं कुलधर्माचा त्याग करून महम्मदांच्या धर्माची दीक्षा घेतली आहे, हें तुह्मांला माहित नाहीं काय?" या समयीं वज्रपात झाला असता तरी उमरला इतकें आश्चर्य वाटलें नसतें, परंतु आपली बहीण व मेव्हणा यानीं धर्मांतर केल्याचें ऐकून तो अतिशय विस्मित झाला. क्षणमात्र विचार करून तो ह्मणतो, "तुझ्या ह्मणण्यावर आह्मीं विश्वास काय ह्मणून ठेवावा?" तेव्हां ती व्यक्ति ह्मणते, "मीं काय ह्मणतों, याची प्रचीति घेऊनच माझ्या ह्मणण्याची सत्यासत्यता तुह्मांला समजेल. तुह्मीं देवासमोर जाऊन पशु बळी द्या, त्या बलीचें मांस स्वहस्तानें शिजवा, आणि तें मांस आपल्या भगिनीला व तिच्या पतीला खावयाला द्या; कांहीं केलेंत तरि तें ते खाणार नाहींत. देवमूर्ति समोर बलिदान केलेल्या पशूंचें मांस मुसलमान अपवित्र मानतात, हें तुह्मांला माहित नाहीं काय?" बहीण व मेव्हणा यांच्या धर्मांतराची कथा ऐकून उमरचा क्रोधाग्नि जास्तच भडकला; त्यानें महम्मदाच्या शिरच्छेदाचा विचार बाजूस सारिला; आणि प्रथम भगिनी व भगिनीपति यांना योग्य शासन करण्याकरितां त्यांच्या घराकडे धांवला; आणि तेथें जाऊन वर लिहिल्याप्रमाणें त्यांची परीक्षा पहावयाचें त्यानें ठरविलें. उमर त्यांच्या घरीं गेला तेव्हां त्याच्या मेव्हण्यानें उमरला संतुष्ट करण्याकरितां एक सुंदर बकरा नजर केला. उमरनें लगेच तो बकरा काबा-मंदिरांत नेऊन तेथील देवाला त्याचा बळी दिला व तो बलिदत्त पशु घरीं आणून त्याचें मांस स्वहस्तानें शिजवून, तें आपल्या फातिमा बहिणीला व मेव्हण्याला खाण्याचा आग्रह करूं लागला; तेव्हां तीं उभयतां त्याला ह्मणालीं

कीं, त्यानीं एका विशेष व्रताला आरंभ केला आहे, व त्यांत या प्रकारचें मांस निषिद्ध आहे. हें ऐकून उन्मत्त सिंहाप्रमाणें गर्जना करून उमर बहिणीच्या व मेव्हण्याच्या आंगावर धांवला व त्यानां ह्मणाला, " खरो-खर तुह्मीं महम्मदीधर्माची दीक्षा घेतली असली पाहिजे, आणि त्याकरितां तुह्मांला योग्य शिक्षाहि करितों. " असें बोलून नारसिंहाप्रमाणें उग्रतर होऊन उमर फातिमावर प्रहार करूं लागला; तेव्हां फातिमाचा स्वामी तिच्या रक्षणा-करितां पुढें झाला. त्याच्यावरहि उमरनें गुरुतर प्रहार केले व त्या योगें त्यांच्या शरीरांतून शोणित-धारा-प्रवाह सुरू झाला. परंतु धर्म-विश्वासाच्या दुर्भेद्य चिलखतानें त्यांचीं हृदयें प्रछन्न असल्यामुळें, शरीरयातनांनीं तीं भ्यालीं नाहीं. फतिमा उच्चस्वरानें भावाला हांक मारून ह्मणाली, "खरोखरच आह्मीं पवित्र इस्लामधर्माची दीक्षा घेतली आहे. आणि महापुरुष महम्मदाला ईश्वर-प्रेरित पैगंबर असें आह्मीं मानतों तुझ्या हातांतल्या तरवारीनें तू जरी आमच्या देहांचे खंडशः तुकडे केलेस, तरी आमचा हा आत्मविश्वास ढळणार नाहीं. " असें बोलून फतिमा " ला इलाहा इल्लल्ला हो मोहम्मदुर्रसूलिल्लाहो " (ईश्वरावांचून आणखीं दुसरें कोणींहि उपासनायोग्य नाहीं व महंमद ईश्वरावतार आहे.) या बीजमंत्राचा पाठ अशा तऱ्हेनें करूं लागली कीं, उमर स्तंभित होत्साता किंकर्तव्य मूढाप्रमाणें निश्चळ राहिला. भगिनी मुखानें उच्चारले जात असलेले ते " ला इलाहा इल्लल्लाहो " शब्द उमरच्या हृदयांत क्रमाक्रमानें प्रतिध्वनित होऊं लागले; आणि यामुळें महम्मदाच्या वध-संकल्पाची त्याला विस्मृति झाली. त्या दिवशीं तो आपल्या घरीं परत न येतां, हतबुद्ध होऊन भगिनीच्या घरींच राहिला. रात्रौ झोंपण्याकरितां शय्ये-वर पडला; परंतु ती शय्या त्याला कांट्याप्रमाणें टोंचूं लागली, व कांहीं केल्या झोंप येईना; फक्त भगिनी व भगिनीपति यांच्या अचल धर्मविश्वासा-बद्दलचे विचार एकसारखे त्याच्या मनांत येऊं लागले. त्या गंभीर रात्रीं फति-मा व तिचा स्वामी उभयतां मिळून मधुर स्वरानें कुर-आनूसरिफांतील खालीं लिहिलेला अमृतमय पाठ करूं लागलीं; " स्वर्ग, मृत्यू व पाताळ यांचा सृष्टिकर्ता तोच एक ईश्वर, तोच सर्वांचा अधिपति व पालनकर्ता होय; त्याच्याशिवाय आणखीं कोणींहि उपासना योग्य नाहीं." हें ऐकून उमरच्या हृदयांत एक नूतन किरण प्रकाशमान झाला. त्याच्या मनांत एकच विचार घोळूं लागला कीं, "ईश्वर एकच आहे आणि तोच एकमात्र उपासना योग्य

आहे आणि स्वर्ग, मृत्यु, पातालादि त्रिलोकाचा जर तोच अधिपति आहे, तर काबामंदिरांतील शेंकडों देवता निर्बळी असल्या पाहिजेत." शय्या त्यागकरून तो उठला; ज्या जागीं भगिनी व भगिनीपति कुराणसराफ पठन करीत होतीं, तेथें जाऊन यथानियमानें त्यांच्याबरोबर कुराणसरिफांतील ईश्वरवाणी पठन करूं लागला, आणि शेवटीं ह्मणूं लागला कीं, "सत्य, सत्य, ईश्वर एकच आहे, आणि याच तत्वाचा प्रचार महम्मद करीत आहे, आणि निश्चयानें तो ईश्वरावतारीच असला पाहिजे." उमरच्या मनाची केविलवाणी स्थिति झाली, हजरत महम्मदांकडे जाण्याविषयीं तो अतिशय व्याकुल झाला, आणि दुसऱ्या दिवशीं पहाटे भगिनीपतीसह हजरतांच्या घरीं गेला. उमरला दुरून पाहून हजरतांचा शिष्यवृंद चिंताकुल झाला; त्यांना असें वाटलें कीं, उमर हजरतांचा वध करण्याकरितां येत आहे; यासाठीं त्यांचें रक्षण कोणत्या तऱ्हेनें होईल तें योजून त्याप्रमाणें दक्षतेनें करण्यांत ते गढून गेले. परंतु ज्यावेळीं उमर दरवाज्याजवळ येऊन उभा राहिला, त्यावेळीं हजरतांनीं त्याजवळ जाऊन त्याचा हात आपल्या हातांत धरिला. हजरतांना पाहून उमर उच्च स्वरानें ह्मणूं लागला— "लाइलाहा इल्लल्लाहो मोहम्मदुर्रसुलिल्लाहो" उमरच्या मुखांतून अशा तऱ्हेचे शब्द बाहेर पडलेले ऐकून, त्यांना अतिशय आनंद झाला व त्यांनीं उमरला प्रेमानें आलिंगन देऊन ईश्वराच्या नांवाचा जयजयकार केला. तेव्हां हजरतांच्या शिष्यवर्गानेंहि हा शुभयोग जाणून ईश्वराच्या नांवानें पुनः पुनः जयजयकार केला व उमरचें स्वागत केलें. त्यानंतर ईश्वरभक्तीनें उमर इतका बेहोष झाला कीं, काबामंदिरांत जाऊन त्यानें आपला सदर धर्मावरील विश्वास जाहिरपणें सर्वांस सांगून इतर लोकांनाही तो याच धर्माची दीक्षा देण्यांत गढून गेला. तो हजरतांना ह्मणतो " जर लोक उघडपणें मूर्तिपूजा करूं शकतात, तर सकलभुवनाधिपती अशा सर्वव्यापी निराकार परमेश्वराची भक्ति आह्मी काय ह्मणून गुप्तपणें करावी ? चला; काबामंदिरांत जाऊन आपणही भगवन्ताची आराधना करूं. " त्यावेळीं अबुबकर प्रभृति शिष्यमंडळीला बरोबर घेऊन हजरत काबामंदिराकडे निघाले. हातांत तरवार घेऊन उमर सर्वांच्या अग्रभागीं चालला होता. आपण महम्मदाचें छिन्न मस्तक घेऊन येत आहों अशा भावनेनें जे लोक त्याची अपेक्षा करीत होते, त्यानां त्यानें संबोधनपूर्वक मुक्तकंठानें सांगितलें कीं, " मीं इस्लाम धर्माची दीक्षा घेऊन अवतारी पुरुष महम्मदाचा शिष्य झालों आहें; व तुह्मींहि माझ्याप्रमाणेंच य

धर्माची दीक्षा घ्या. आणि तुह्मीं या धर्माचा स्वीकार केला तर ठीकच आहे, नाहींतर तुमचीं मस्तकें धडा वेगळीं करून टाकीन. मीं एकाहि काफराला जिवंत ठेवणार नाहीं." असें बोलून काबामन्दिरांत जमलेल्या मंडळी बरोबर युद्ध करण्याला उमर प्रवृत्त झाला. भीमपराक्रमशाली उमरचा पराभव करणें असंभवनीय वाटून तेथून सर्व मंडळी क्रमाक्रमानें पळून गेली; नंतर शिष्य-वर्गासमवेत हजरत महम्मद तेथें नमाज पढले. काबामंदिरांत पवित्र-इस्लाम-धर्मप्रणालीला अनुसरून अशी हीच सर्वांत पहिली जाहिर उपासना होती. याप्रसंगानें मक्कावासी नर-नारी-गण अत्यंत विस्मयापन्न होऊन व महम्मदाचा प्रभाव पाहून आश्चर्य चकित झाला. जो उमर त्यांचा शिरच्छेद करण्याकरितां गेला, तो त्यांच्या शिष्यमंडळींत सामील झाला हें पाहून सुद्धां त्यांनीं या नव-धर्माची दीक्षा घेतली नाहीं आणि मुसलमान लोकांना त्रास द्यावयाचेंहि त्यांनीं थांबविलें नाहीं. आतां तर त्यांच्या अत्याचाराची मात्रा प्रति दिवशीं वृद्धिंगत होऊं लागली, आणि यामुळें मुसलमान लोक क्रमाक्रमानें मक्का परित्याग करून मदिना शहरांत जाऊन राहाण्याविषयीं विचार करूं लागले.

उमर इस्लामधर्मग्रहणापूर्वी जितका धीट व तेजस्वी होता, तितकाच धीट व तेजस्वी, या धर्माचें अवलंबन केल्यानंतरहि होता. इतर मुसलमान लोक कोरेश लोकांच्या त्रासाच्या भीतीनें स्वधर्मानुसार आचार व अनुष्ठान सर्वदा लोकदृष्टीआड व गुप्तपणानें करीत असत, परंतु उमरनें याप्रमाणें कधींहि केलें नाहीं; तो कोरेश लोकांसमक्षच त्यांच्या धर्माची निंदा करी व इस्लामधर्माचा गौरव करीत असे. उमरच्या उग्र प्रकृतीमुळें त्याचे स्वधर्माव-लंबी लोकहि त्याला भीत असत; कारण सांप्रदायिक प्रेमानें तो इतका अंध झाला होता कीं, स्वधर्मानुयायी लोकांच्या दोषांचीहि तो कधीं उपेक्षा करीत नसे. व्यक्तिविषयक अपराधामुळें जर कोणीं इस्लाम धर्मावर आरोप करूं लागला, तर तें त्याला सहन होत नसे. परंतु त्याचा बाह्य व्यवहार कितीहि तुटक दिसला, तरी त्याच्या हृदयांतील प्रेम, भक्ति व वैराग्य हीं उज्वल होतीं. यासाठींच तो हजरत महम्मदांना जास्त प्रिय होता. हजरत ह्मणत असत कीं, उमरचें चरित्र जरी कोमलताशून्य असलें, तरी पवित्र असतें; आणि यामुळेंच रस्त्यामध्यें कधींहि जरी त्याची प्रत्यक्ष सैतानाशीं गांठ पडली, तरी त्याला भिऊन स्वत: सैतानच दुसऱ्या वाटेनें पळून जाईल. ज्यावेळीं मूठभर मुसलमान लोकांनीं कोरेश लोकांच्या भयानें

मक्का शहर सोडून जाणें चांगलें असा विचार केला, आणि गुप्तपणें पळण्याची तयारी चालविली, त्यावेळीं उमर त्यांच्याबरोबर जावयास कबूल झाला; परंतु गुप्तपणें पळून जाण्याचें त्यानें नाकारिलें. मदिनेला जाण्याकरितां निघण्यापूर्वी सशस्त्र होऊन काबामंदिरांत गेला आणि यथारीति काबामंदिराला सात प्रदक्षिणा करून तेथेंच दोन वेळ नमाज पढला; त्यानंतर त्या मंदिरांत जमलेल्या कोरेश लोकांना उद्देशून दर्पोक्तीनें ह्मणाला कीं, " स्वमातेला पुत्रशोकानें व्याकुळ करण्याची ज्याची इच्छा असेल, ज्याला आपल्या मुलाला पितृहीन करण्याची इच्छा असेल, आणि ज्याला आपल्या स्त्रीला विधवा करण्याची इच्छा असेल, त्यानें आह्मांला अडथळा करण्याकरितां समोर यावें. " त्याच्या या निर्भय व स्पर्धासूचक आव्हानानुसार कोरेश लोकांपैकीं कोणींहि पुढें येण्याचें साहस केलें नाहीं. पुढें येण्याचें साहस कोणीं केलें नाहींच, पण नुसतें विरुद्ध बोलण्याचीहि कोणाला छाती होईना. अर्थातच विरोध झाल्याशिवाय तो मदिनेला गेला आणि हजरतांची मार्गप्रतीक्षा करीत राहिला.

जो उमर एक दिवस हज़रत महम्मदांचा प्राणसंहार करण्याला उद्युक्त झाला होता, तोच उमर परवर्तिकालांत त्यांच्यावर इतका अनुरक्त झाला कीं, कांटा टोंचावा हजरतांच्या पायांला, आणि वेदना होत उमरच्या हृदयाला. हजरत महम्मद नेहमीं स्वशरीरसुख व ऐश्वर्यभोग यांविषयीं उदासीन असत. जेवण काय, वस्त्रप्रावरण काय अथवा विश्रांति करितां शय्या काय, कोणत्याहि बाबतींत त्यांची आसक्ति किंवा प्रेम नव्हतें. खोर्मा-तरूच्या तंतुजालापासून झालेल्या दोऱ्यांनीं तयार केलेल्या खाटेवर ते शयन करीत असत; त्यावर कसलेंहि आस्तरण पसरीत नसत. एकदां तसल्या खाटेवर हजरत निजले असतां त्यांच्या अंगावर दोऱ्या रुतून वळ उठले व ते रक्तवर्ण दिसूं लागले; तें पाहून उमरला इतकें दुःख झालें कीं, तो त्या खाटे पलीकडे बसून अश्रुपात करूं लागला. हजरत जागे होऊन उमरची ती अवस्था पाहून त्याला दुःखाचें कारण विचारूं लागले; तेव्हां उमरनें रडत रडत उत्तर केलें कीं, "अहो महाभाग (ईश्वर), विश्वासहीन अशा रोम व पारसिक वगैरे देशच्या राजांच्या सुखोपभोगाला सीमा नाहीं, आणि दृढश्रद्ध व ईश्वराश्रित महापुरुषाच्या वांट्याला असे क्लेश आलेले पाहून कोणाचे नेत्र अश्रुपूर्ण होणार नाहींत?" त्याचें भक्तिपूर्ण भाषण ऐकून हजरत किंचित हंसून ह्मणाले, 'उमर! पार्थिवसुखसंपत्तीपेक्षां स्वर्गीय संपदा स्पृहणीय होय. अतएव शारीरिक

सुखासाठीं खटपट न करितां त्या नित्यसुखाचा लाभ जेणेंकरून होईल, अशा तऱ्हेची दृष्टि ठेऊन खटपट करणें हें जास्त श्रेयस्कर नाहीं काय?" या प्रसंगानें हजरतांविषयींची उमरची निःसीम भक्ति, अगाध प्रेम यांचा प्रत्यक्ष परिचय होतो. अवतारी पुरुषाविषयीं ज्याची एवढी श्रद्धा व भक्ति आणि सत्यावर ज्याचें प्रगाढ प्रेम, त्यालाच त्या अवतारी पुरुषाच्या शिष्य-मंडळीचें नेतृपद प्राप्त व्हावें, हें योग्य होय यांत संदेह नाहीं.

उमर खलिफा पदावर अभिषिक्त झाल्यानंतर त्याला त्याच्या पूर्वीचा खलिपा जो अबुबकर त्याचें "खलिफतोररसूल" हें नांव धारण करणें आवडलें नाहीं व तशी त्यानें आपली इच्छाहि प्रगट केली. "खलिफतोररसूल" या शब्दाचा अर्थ रसूल किंवा प्रेरितपुरुषाच्या गादीवर अभिषिक्त झालेला असा आहे. आपल्याला स्थलाभिषिक्ताचा स्थलाभिषिक्त असें ह्मणवून घेण्याची इच्छा होती, परंतु अशा तऱ्हेचें लांबलचक नांव धारण करणें गैरसोईचें असल्यामुळें त्यानें आपल्या गोटांतील लोकांना सांगितलें कीं, उपरिनिर्दिष्ट नांवापेक्षां "आमिरोल् मुमेनिन्" ह्मणजे 'श्रद्धावान् लोकांचा अधिपति असें आपल्याला ह्मणावें; अर्थांतच तो खलिफा होता, त्या अवधींत या नवीन सोप्या व साध्या नांवानेंच त्याला संबोधिलें जात असे. हेंच त्याच्या नम्रता, विनय व निरभिमानीपणाचें लक्षण होय. खलिफा पदारूढ होऊन अबुबकरनें ज्या साध्या पद्धतीनें आपली जीवनयात्रा चालविली, त्याच तऱ्हेनें उमरनेंहि आपला नित्यक्रम ठेविला होता. स्वसुखाकरितां सार्वजनिक पैशांतून खर्च करणें, हें त्याला महत्पाप आहे असें वाटे. सार्वजनिक कोशागारांतून तो दर-साल आपल्याकरितां मध्यम प्रतीचे दोन पोषाक घेत असे व परिवर्गाच्या पोषणाला जरूर इतका पैसा घेई; या व्यतिरिक्त सार्वजनिक खजिन्यांतील एका कवडीलाहि तो शिवत नसे. त्याची गृहव्यवस्था फारच साधी होती; त्याचें वर्णन थोडें येथें देतां येईल. अबुबकर ज्या पात्रांत भोजन करीत असे, व जी चादर पांघरीत असे, ती सामग्री त्यानें सार्वजनिक खजिन्यांत ठेविली व आपल्या मृत्युकालीं आपली मुलगी आयेषा हिला असें सांगून ठेविलें कीं, जो त्याच्या जाग्यावर बसेल, त्याला ती द्यावी. शिवाय तो ज्या सांडणीचें दूध पीत असे, त्या सांडणीचीहि तशीच व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याच्या कन्येनेंहि त्याचा हुकूम बरोबर पाळिला. अबुबकरची हीच मुलगी हजरत महम्मदांची द्वितीय पत्नी होय. अबुबकरनें मागें ठेविलेल्या या सामग्रीचा

उमरनें आनंदानें स्वीकार केला. खलिफापदावर अभिषिक्त झाल्यानंतर उमरनें आपली रहाणी कोणत्या तऱ्हेची ठेविली होती, हें पाहिलें असतां प्रथम पूर्वीचे यूनार खलिफा किती वैराग्यशील व त्यागी पुरुष होते हें दिसून येतें. ज्या दिवशीं उमर खलिफापदावर अधिष्ठित झाले, त्याच्या दुसऱ्या दिव-शीं नमाजाच्या वेळीं त्यांनीं तीन प्रार्थना केल्या त्या:—मनाची कठोरता दृढ व्हावी आणि हृदयाची कोमलता वृद्धिंगत व्हावी, आपली दुर्बलता व कृपण-पणा दूर व्हावा. लोकपालकाच्या जागीं अधिष्ठित होऊन कोणी अशा तऱ्हे-चा निष्कपट परिचय देईल काय? जेवण व प्रावरण यांशिवाय इतर कामां-करितां जर उमराला कधीं पैशाची जरूर पडली, तर ते सार्वजनिक खजि-न्यांतून उसने घेत व यथाकालीं परत देत असत. कदाचित परत देण्याचें विस्मरण होईल, ह्मणून ते कोशाधिपतीला सांगून ठेवीत कीं, ठरलेली वेळ चुकतांच त्यानें जोराचा तगादा करण्यास चुकूं नये. उमर आपल्या हाता-खालील मंडळीविषयीं किती सहानुभूति बाळगीत, त्याचें पुढें उदाहरण देतों त्यावरून नीट लक्षांत येईल. एकदां देशांत अनावृष्टि होऊन अन्नाचा दुष्काळ पडला, त्या वेळीं उमरनें तूप व मांस खाण्याचें सोडून दिलें. ते ह्मणत कीं, "जें अन्न देशांतील साधारण लोकांना खावयाला मिळत नाहीं, तें अन्न आह्मीं खलिफा झालों, तरी आह्मांला कसें खातां येईल?" आजकाल किती शासनकर्ते आपल्या प्रजेविषयीं इतकी सहानुभूति बाळगितात? केवळ मनु-ष्यांची नव्हे, तर पाळलेल्या पशूंबद्दलहि त्यांना अतिशय दया उत्पन्न होत असे. असें सांगतात कीं. एकदां त्यांना ताजा मासा खाण्याची इच्छा झाली, व ती इच्छा त्यांनीं प्रगट केली; तेव्हां एकजण उंटावर बसून बहुत दूर अंतरावर मासे आणण्याकरितां गेला. उंट परत आल्यानंतर अत्यंत श्रांत झालेला दिसला. तेव्हां उमर त्याच्याजवळ गेले व त्याला घामानें डब-डबलेला पाहून त्यांनीं उद्गार काढिले कीं, "आमच्या जिव्हातृप्तीकरितां उंटा-ला इतके श्रम झाले, तेव्हां यापुढें आपण ताजा मासा खाणार नाहीं." उम-रचें जीवन-चरित्र-लेखक व इतर समकालीन लोक या सर्वांनीं त्याच्या वस्त्राभरणांच्या टापटिपीबद्दल व उदासीनतेविषयीं उल्लेख केला आहे. ते उंटाच्या केंसाच्या कांबळ्यावर पडून विश्रांति घेत. एकदां ते हजची यात्रा करण्याकरितां गेले; ते खलिफा होते ह्मणून बरोबर जामानिमा किंवा इतर अधिकारदर्शक परिवार नेला नाहीं; फक्त त्यांच्याबरोबर

दुसरा एक यात्रेकरू होता; इतर लोकांप्रमाणेंच तीर्थस्थानाचे ठिकाणीं एक कपडा वर टांगून त्याच्याखालीं झोंपत असत; "आमिरोल् मुमेनिन्" उमरनीं सर्व यात्रा अशाच प्रकारें केली. खलिफा पदावर आरूढ झाल्यानंतर पहिल्या पहिल्यानें ते स्वतःच्या भरणपोषणाला लागणारा पैसाहि सार्वजनिक खजिन्यांतून घेत असत. वाणिज्य-व्यवसाय करून जें त्यांना मिळत असे, त्यावरच ते आपला व परिवारवर्गाचा निर्वाह करीत असत. परंतु ज्यावेळीं खलिफाचें कार्य संभाळून व्यापाराला फुरसत मिळेनाशी झाली, तेव्हां त्यांनीं व्यापार बंद केला, व एक दिवस प्रमुख मुसलमान मंडळीच्या सभेंत आपली स्थिति सांगितली, तेव्हां त्यांची त्यांनीं व्यवस्था करून दिली कीं, त्यांनीं भोजनखर्चाला लागणारे जिन्नस व प्रतिवर्षी दोन चादर सार्वजनिक कोठींतून घ्यावे. यापूर्वी त्यांनीं कोठींतून कांहीं घेतलें नव्हतें व यानंतरहि वरील ठरावापेक्षां जास्त कांहीं त्यांनीं घेतलें नाहीं. एकदां त्यांना कांहीं विकृति जडली, तेव्हां हकीमांनीं त्यांना कांहीं औषध मधांतून घेण्याकरितां दिलें. त्यावेळीं त्यांच्या घरांत मध शिल्लक नव्हता, तरी सार्वजनिक कोठींत होता. परंतु सार्वजनिक संपत्ति आपल्या खाजगी कामाकडे उपयोगांत आणण्यास ते तयार होत ना; प्रमुख मंडळीला ही गोष्ट जेव्हां समजली, त्यावेळीं त्यांनीं सार्वजनिक कोठींतील मधाचा उपयोग करण्यास सांगितलें व शेवटीं उमरना तो ध्यावयास भाग पाडिलें. अशा प्रकारचे अनेक प्रसंग आढळतील कीं, ज्या योगें, खलिफा हे आपल्याला सर्वसाधारण लोकांचे अधिपति आहों असें न समजतां, ते स्वतःला लोकांचे सेवक आहों असें समजत असत अशी आपली खात्री होईल. उमरच्या मनांत एकदां असा प्रश्न उद्भवला कीं, खलिफा व बादशाह यांत फरक काय? हा प्रश्न इतर सभासदांपुढें त्यांनीं मांडला असतां, एका मुत्सद्दी सभासदानें उत्तर दिलें कीं, "मुसलमान प्रजाजनांकडून धर्मनियमापेक्षां जे जास्त कर वसूल करितात, आणि त्याचा विनियोग अकर्तव्यांत (दुष्कर्मांत) करितात, त्यांना बादशहा असें समजावें, आणि जे धर्मनियमानुसार कर घेऊन तो सत्कार्यी खर्च करितात ते खलिफा समजावे." यावरून खलिफांचें पद किती उच्च व त्यांचें कर्तव्य किती कठीण असतें, हें सर्वांना समजून येईल. उमर किती रागीट होता, याचें विवेचन आह्मीं यापूर्वीच केलें आहे. मुसलमान धर्माची दीक्षा घेतल्यानंतर, त्याच्या स्वभावांत फारसा फरक पडला नाहीं; परंतु आश्चर्य हें

कीं, जेव्हां ते कुराणसरिफाचा पाठ करीत असत, तेव्हां त्यांचा राग पार नाहींसा होई. क्रोधदमनाचा अभ्यास त्यांनीं हरएक प्रसंगीं केला होता; एकदां ते एकटेच धामड्याची मोट पाण्यानें भरून आणण्याकरितां गेले; पुष्कळ मुसलमान लोकांनीं हें पाहून त्यानां स्वतःला असें पाणी आणावयाला जाण्याचें कारण काय? असें विचारलें; तेव्हां उमरनीं उत्तर दिलें कीं, "आपल्या मनांत अहंकार उत्पन्न झाला आहे, व त्याचें दमन करण्याकरितां आपण असलें हलकें काम करावयास लागलों आहों." खलिफांचा आत्मत्याग, निरहंकारिता आणि सेवापरायणता इत्यादि सद्गुणांचा परिचय करून देणाऱ्या अनेक गोष्टी मुसलमान लेखकांनीं विस्तारानें लिहून ठेविल्या आहेत; त्या सर्व वाचल्या असतां असें प्रत्ययाला येईल कीं, खलिफा लोकनायक असूनहि त्यानीं राजाचें स्थान अगर ऐश्वर्य उपभोगिलें नाहीं; आणि खिलाफत् किंवा मुसलमान शासनसमिति ही एक नियमबद्ध अशी साधारण समिति होती; त्यांत गरीब किंवा श्रीमंत मुसलमान या सर्वांना सारखाच अधिकार होता. खिलाफत् स्थापन होण्यापूर्वी अशा तऱ्हेची जन-साधारण-नियंत्रित शासन-समिति जगांत कोठेंहि अस्तित्वांत नव्हती.

उमर खलिफा पदावर आरूढ झाल्यानंतर त्यानीं सर्वांना असें जाहिर केलें कीं, धर्मानें वागणारा मनुष्य कितीहि अशक्त असला, तरी आपण त्याला प्रथम योग्य न्याय देऊं व जो सशक्त असूनहि धर्माप्रमाणें चालत नाहीं, त्याला बलहीन वा दुर्बल समजण्यांत येईल व त्याला कडक शासन होईल. वास्तविक, धनी, निर्धन, ज्ञानी, मूर्ख, उच्च, नीच या सर्वांना ते सारख्याच तऱ्हेनें वागवित असत. ते जितके न्यायपरायण होते, तितकेच समदर्शीहि होते. एकच गोष्ट सांगून त्यांच्या या सद्गुणाचा परिचय वाचकानां करून देतां येईल.

एकदां ते मक्केला जाऊन 'हज' नांवाच्या व्रताचें समापन करण्याच्या उद्देशानें मदिनेहून निघाले. मक्का येथें काबामंदिराजवळ जेव्हां ते जाऊन पोंचले, त्यावेळीं काबा मंदिरांत लोकांची फार गर्दी होती, व त्यामुळें आंत प्रवेश होणें कठीण होतें. इस्लाम धर्माची नवीनच दीक्षा घेतलेला एक मोठ्या दर्जाचा श्रीमान् मनुष्य जरा ऐटीनें मंदिराला प्रदक्षिणा घालित होता; त्याच वेळीं दुसरा एक बाजारांतील सामान्य मनुष्यहि मंदिराला प्रदक्षिणा घालित होता. परंतु गर्दी अतिशय असल्यामुळें त्याचा स्पर्श त्या उच्चपदस्थ

व्यक्तीच्या वस्त्राला झाला; याचा त्या श्रीमान् माणसाला अतिशय राग येऊन त्यानें त्या गरीब माणसाच्या नाकावर इतक्या जोरानें ठोसा मारिला कीं, तत्काळ त्याच्या नाकांतून रक्तप्रवाह सुरू झाला; आणि त्या वेदनांनीं तो विव्हल होऊन ओरडूं लागला. नंतर खलिफा उमरकडे जाऊन त्यानें ही सर्व हकीगत त्यांच्या कानावर घातली; तेव्हां उमरनीं त्या श्रीमानाला बोलावून आणून या माणसाजवळ इतकें निष्ठूरपणें वागण्याचें कारण काय? अशी जिज्ञासा प्रदर्शित केली; परंतु समाधानकारक रीतीनें त्याला आत्मसमर्थन करितां न आल्यामुळें उमरनें त्याला शिक्षा करण्याचें ठरविलें; याचें त्या उच्चदर्जाच्या मनुष्याला आश्चर्य वाटून तो ह्मणाला कीं, तुमच्यासारख्याच एखाद्या उच्च दर्जाच्या मनुष्यानें जर कोणा सामान्य मनुष्याला प्रहार केला, व त्यामुळें त्याला तुह्मीं दंड करूं लागलां, तर उच्चनीच हा भेद नाहींसा होऊन, मोठ्या दर्जाच्या माणसांच्या मानाचें रक्षण कसें होईल? तेव्हां उमर त्याला ह्मणाले कीं, "इस्लामधर्म हा समतेच्या तत्वाचा धर्म आहे हें तुह्मांला माहित नाहीं काय? या धर्मांत कोणत्याहि दोन मनुष्यांमध्यें भेद केला जात नाहीं; जसें भगवन्ताच्या दृष्टीनें राजा व प्रजा हीं सारखींच आहेत, उच्चनीच सगळे-सारखेच आहेत, तद्वतच भगवन्ताच्या प्रेरित–पुरुषांच्या गादीवर बसणाऱ्या व्यक्तींनांहि सर्व सारखेच आहेत, यासाठीं तुह्मांला झालेला दंड कोणत्याहि कारणानें कमी होणार नाहीं." त्यावेळीं त्या श्रीमान् मनुष्याचा निरुपाय होऊन, त्यानें एकवेळ भिक्षा मागण्याचें कबूल केलें व उमरनेंहि त्याला संमति दिली. परंतु त्या बडे साहेबांनीं त्याच दिवशीं मक्केला मजुरा ठोकून रोमदेशच्या बादशा-हाच्या हद्दींत पलायन केलें आणि नंतर इस्लाम धर्माचा त्याग करून खिस्ती धर्माचा स्वीकार त्यांनीं केला. पुढें कांहीं काळानंतर त्या इसमाला रोम-सम्राटानें सेनापतीच्या जाग्यावर नेमून त्याला मुसलमान लोकांबरोबर युद्ध करण्याकरितां पाठविलें.

उमरनीं दहा वर्षेपर्यंत खलिफा पदाचा उपभोग घेतला. या दहा वर्षां-मध्यें त्यानीं इस्लाम धर्माची प्रतिष्ठा वाढवून, इस्लाम साधारणतंत्र-समिती धर्मनियमांनीं बद्ध करून इस्लाम राज्याला बळकटी आणिली. त्यांच्या अम-दानींत रोम-सम्राट व मिसर आणि पारसिक वगैरे देशच्या राजां बरोबर मुसलमानांचीं फार निकराचीं युद्धें झालीं. धार्मिक भावनांनीं उद्दीपित होऊन मुसलमान लोकानीं अल्पसंख्याक असूनहि, विधर्मी सैन्याचा विध्वंस करून

आपली विजय-पताका फडकावयाला लाविली; आणि अशा रीतीनें रोमसाम्राज्य व पारसिकप्रभृति देशांमध्यें इस्लाम धर्माचा विस्तार होऊन, त्या देशांत प्रचलित असलेला, कुसंस्कारांचीं पुटें चढलेला प्राचीन धर्म विलुप्त झाला, आणि एका ईश्वराचें नांव मात्र सर्वांत श्रेष्ठत्व पावलें. उमरच्या कारकीर्दींत अनेक धर्मयुद्धें झालीं; परंतु कोणत्याहि युद्धांत त्यानें स्वतः युद्धक्षेत्रांत जाऊन सैन्याच्या हालचालींत भाग घेतला नाहीं. मदिना येथें राहून तो सर्व कारभार चालवित असे. त्याचा दरारा असा होता कीं, सेनापति लोकांना कोणत्याहि बाबतींत त्याचे इच्छे विरुद्ध वर्तन करण्याची छाती होत नसे. असें सांगतात कीं, ख्रिश्चन लोकांचें मुख्य पवित्रतीर्थ जेरुसलेम हें उमर खलिफा असतानां त्यांच्या ताब्यांत होतें; हें शहर ताब्यांत घेण्यापूर्वी, मुसलमान सेनापतीनें त्या शहराच्या नगराध्यक्षाला निरोप पाठविला कीं, तुह्मीं इस्लाम धर्माची दीक्षा घ्या, ह्मणजे इस्लाम धर्मांतील सर्व अधिकार तुह्मांला उपभोगितां येतील, नाहींतर आमच्या स्वाधीन होऊन कर द्यावा लागेल. हें जर तुह्मांला कबूल नसेल, तर तुह्मांला युद्ध करावें लागेल. युद्ध करणेंच श्रेयस्कर वाटून नगराध्यक्ष युद्धाला प्रवृत्त झाला. पुष्कळ दिवसपर्यंत उभयपक्षांचें युद्ध चाललें होतें; मुसलमान सैन्यानें नगराला वेढा दिल्यामुळें कांही दिवसांनंतर जेरुसलेम येथील लोकांना अन्नाचा तुटवडा पडला; जेव्हां शहराबाहेरून आंत खाद्यवस्तू नेण्याला मुळींच मार्ग राहिला नाहीं, तेव्हां ते आपल्या धर्मगुरूंना शरण गेले व या प्रसंगीं आपलें कर्तव्य कोणतें याची पृच्छा केली. मुसलमान ग्रंथकार लिहितात कीं, त्या ख्रिश्चन याजकानें त्यांना असें सांगितलें कीं, "आरब देशांत धर्म-प्रचारक होऊन तो जेरुसलेमवर आपला ताबा चालवील, असा उल्लेख शास्त्रांत (धर्मग्रंथांत) आहे. अतएव तोच धर्मप्रचारक जर अवतीर्ण झाला असेल, तर त्याच्याकडेच आपला रक्षणाचा भार सोंपवावा" असें सांगून त्यानें त्या धर्मप्रचारकाला कसा ओळखावा, त्याचीं सर्व लक्षणें शास्त्राधारानें लोकांना सांगितलीं. मुसलमान सेनापतीला जेव्हां हें कळलें, तेव्हां त्यानें हें वर्तमान उमरला कळवून त्याला युद्धक्षेत्रांत येण्याविषयीं कळकळीची विनंति केली. उमरला तें मान्य होऊन तो तिकडे जाण्याकरितां निघाला. त्याचा पोशाख साधाच असून बरोबर एकच अनुचर होता. प्रवासांत आहाराकरितां फक्त सातू व खोमीफळें बरोबर घेतलीं होतीं. यथासमयीं ते जेव्हां जेरुसलेम नजिक गेले, तेव्हां मुसलमान सैनिकांनीं जयध्वनीनें आकाश दुमदुमून टाकि-

लें. त्यांचा हा जयध्वनि ऐकून खिश्चन लोकांना शंका येऊन भीति वाटूं लागली. थोड्याच वेळांत मुसलमान सेनापतीनें आपल्या धर्माचार्यांच्या आगमनाची बातमी जेरुसलेमच्या नगराध्यक्षाकडे पाठविली व त्याला असें कळविलें कीं, "तुह्मीं त्यांचें दर्शन घेऊन आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें शहराच्या वेशी उघडून आमच्या हवालीं व्हा." परंतु उमर ज्या वेषांत तेथें गेला होता, त्या वेषामध्यें त्याला पाहून हा मुसलमानसंप्रदायाचा नेता किंवा खलिफा आहे, असें जेरुसलेम येथील लोकांना खरें वाटणार नाहीं, ह्मणून सेनापतीनें त्यांना फकिरीचा वेष टाकून मूल्यवान् वस्त्रें परिधान करण्यास सांगितलें; आणि उंटाऐवजीं सजविलेल्या घोड्यावर आरोहण करण्याची विनंति केली. सेनापतीनें अत्यंत आग्रहपूर्वक विनंति केल्यावरून उमरनीं त्याप्रमाणें केलें; परंतु अल्पकालांतच तो वेष त्यांना असह्य होऊं लागला. अत्यंत व्याकुळ होऊन आपल्याला यांतून तात्काळतोब मोकळें करा असें त्यांनीं सांगितलें. ते ह्मणाले, "हा पोषाख आपल्या आंगांत कांट्याप्रमाणें बोंचत आहे. आणि अश्वारोहण केल्यामुळें आंगांत अहंकाराचा संचार होत आहे, अतएव आपण उंटांच्या केंसांचें कांबळेंच पांघरतों व पुनः उंटावरच आरोहण करणार आणि त्या वेषांतच मला विपक्षियांनीं पहावें." त्यांचा हट्टसंकल्प पाहून त्यांच्या ह्मणण्याला सेनापतीला कबूल व्हावेंच लागलें. नंतर नित्यवेष परिधान करून ज्या ठिकाणीं जेरुसलेमचे रहिवासी त्यांच्या दर्शनाची वाट पहात होते, त्या ठिकाणीं सेनापतींसह ते जाऊन दाखल झाले. परंतु यांचे धर्माचार्य उमरांना या वेषांत पाहून ह्मणाले, "धर्मग्रंथांत इस्लाम-धर्माच्या नेत्याचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं सर्व लक्षणें यांच्या ठिकाणीं आहेत; अर्थात् शहर त्यांच्या स्वाधीन करून युद्ध थांबवावें." त्या वेळीं जेरुसलेम नगरचा दरवाजा खुला झाला; सैन्यासहवर्तमान खलिफांनीं शहरांत प्रवेश करून मुख्य भागीं इस्लामी ध्वजपताका उभारण्यांत आली व जिकडे तिकडे शांतता प्रस्थापित झाली.

वैराग्यसंपन्न, अनासक्त संन्याशाप्रमाणें जरी उमरचा नित्यक्रम-व्यवहार चालत असे, तरी त्यांची बुद्धि सूक्ष्म व चौकस असून ते उत्तम राजनीतिकुशल पुरुष होते. राज्यतृष्णेनें मुसलमान लोक धर्मपथापासून भ्रष्ट होऊं नयेत याविषयीं ते फार जपत असत; व या हेतूनेंच मुसलमान राष्ट्राच्या मर्यादा ठरविण्याचे कामीं त्यांचा विचार सुरू असे; राष्ट्रांत सुव्यवस्था शांति व समाधान नांदूं लागल्यावर याच विषयाकडे त्यांनीं आपलें लक्ष लाविलें.

इस्लामची राष्ट्रनीति जेणेंकरून आरबी लोकांच्या आंगवळणीं पडेल, अशीहि दृष्टी त्यांनीं ठेविली होती. अर्थशास्त्रांतहि ते बरेच प्रवीण होते. जितलोकांकडून जमा झालेला कर ते त्यांच्याकरितांच खर्च करीत. जितांच्या संपत्तीची लूट हेंच मुसलमान लोकांच्या जयाचें दृश्यफल असतें; असें उमरच्या कारकीर्दींत कोणालाहि ह्मणण्याला संधी नव्हती. देशाचा शासनाधिकार ज्याच्याकडे दिला जात असे, तो प्रजापीडन किंवा अत्याचार करणार नाहीं; आणि विलासमग्न होऊन प्रजेचें अर्थशोषण करणार नाहीं अशाविषयीं ते दक्ष असत. शासनकर्त्यांची नेमणूक करते वेळीं त्याचा घोड्यावर बसणें व तलम वस्त्र परिधान करणें याबद्दल निषेध केला जात असे. अन्न कोणतें खावें याविषयीं उपदेश होई आणि संन्यासी लोकांना नेहेमी मुक्तद्वार ठेविण्याविषयीं ताकीद होई. या हुकुमांचें उलंघन करणारांस योग्य शासन करण्याला ते कधींच आळस करीत नसत.

उमरच्या कारकिर्दींत मुसलमानी धर्माचा व राज्याचा विस्तार किती झाला होता हें पुढील विवेचनावरून दिसून येईल. छत्तीस हजारांपेक्षां जास्त खेडीं व शहरें यांत इस्लामीलोकांची वस्ती होती; आणि चार हजार ख्रिश्चन प्रार्थना मंदिरांचें इस्लामच्या एकेश्वरवाद्यांच्या आराधना–मंदिरांत (मशिदींत) रूपांतर झालें होतें. त्या शिवाय इस्लामधर्म प्रचाराकरितां जवळ जवळ दोन हजार व्याख्यानपीठें अस्तित्वांत होतीं. आणि ज्याच्या प्रभावानें हें सर्व झालें, तो तर एक मुकुटविहीन प्रसादशून्य सम्राट (खलिफा) होता. असें सांगतात कीं, त्यांनीं जेव्हां खंडणी मागण्याकरितां रोमसम्राटाकडे निरोप पाठविला, तेव्हां यांचें (उमरचें) ऐश्वर्य व संपत्ति तरी केवढी आहे हें पाहाण्याकरितां रोमसम्राटानें एक गुप्त हेर पाठविला; परंतु त्या हेराच्या नजरेला काय पडलें? तर उमर आपला फाटका अंगरखा स्वतःच शिवीत होते; हें पाहून तो विस्मित झाला. त्यांना अशास्थितींत पाहून, हेच मुसलमानांचे खलिफा असतील हें त्याला खरें वाटेना. यासाठीं अनेक शहरवासीयांकडे त्यानें खलिफाचा वाडा कोठें आहे याबद्दल तपास केला; परंतु सर्वांकडून त्याला एकच उत्तर मिळालें कीं, "खलिफांचें पवित्र जीवन हाच त्यांचा प्रासाद; मशिदींत किंवा एकाद्या झाडाखालीं तुह्मीं शोध करा ह्मणजे त्यांचें दर्शन तुह्मांला होईल." एका झाडाखालीं सुप्तावस्थेंत उमरनां त्या गुप्तहेरानें पाहिलें; त्यांची झोंप झाल्यावर त्यांच्या बरोबर त्यानें संभाषण केलें

आणि तो इतका विस्मित व मोहित झाला कीं, त्यानें लगेच त्यांच्याजवळून इस्लाम धर्माची दीक्षा घेतली.

अशा महापुरुषांनी एकाद्या मारेकऱ्याकडून मृत्यू यावा हें अत्यंत शोचनीय होय; परंतु ईश्वर कोणत्या उपायानें आपल्या भाण्डारांत धान्य संग्रह करितो हें कोण सांगूं शकेल? कोणी इंग्रज लेखक असें ह्मणतात कीं, "उमरांच्या आर्थिक व्यवहारकाठिण्यामुळें त्यांचा अशा शोचनीय तऱ्हेनें अंत झाला." परंतु त्यांचें समस्त जीवन या ह्मणण्याविरुद्ध साक्ष देत आहे. मुसलमान लेखक ह्मणतात कीं; कोणी एक ख्रिस्ती गुलाम आपल्या मालकाच्या अत्याचारांनीं त्रस्त होऊन उमरांकडे सल्ला विचारण्याकरितां गेला. तो ह्मणाला कीं, माझा मालक मला जितके पैसे नित्य मिळविण्याविषयीं सांगतो, तितके मिळणें अशक्य आहे; यास्तव या जाचांतून आपली सुटका जेणेंकरून होईल अशी व्यवस्था खलिफांनीं करून द्यावी असें तो ह्मणाला. आपल्याला पीठ दळण्याचें यंत्र तयार करितां येतें, असें तो ह्मणाल्यावरून, राज (सार्वजनिक) भाण्डाराच्या (कोठीच्या) उपयोगाकरितां एक पीठ दळण्याचें यंत्र तयार करण्याबद्दल उमरनीं त्याला सांगितलें. अशा तऱ्हेनें त्या गुलामाला जास्त पैसे मिळण्याचे कामीं उपयोग होईल, अशा हेतूनेंच त्यांनीं हें सांगितलें हें उघड आहे. परंतु हें त्याला न समजल्यामुळें क्रोधाविष्ट होऊन तो ह्मणाला कीं, "तुमच्याकरितां असें एक यंत्र तयार करितों कीं, त्याचें स्मरण तुह्मांला पुनरुत्थानाच्या दिवसापर्यंत राहील." त्या इसमानें उमरना ठार मारण्याची भीति घातली, तरी त्यांनीं त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला; परंतु यापेक्षां त्यांनीं त्याच्या धमकीला जास्त महत्व दिलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नित्य नियमाप्रमाणें ते मशिदींत गेले व नित्याप्रमाणें नमाज पढण्यास लागले; इतक्यांत हातांत सुरी घेऊन तो ख्रिश्चन गुलाम त्वरेनें मशिदींत शिरला, आणि लागोपाठ सहा वेळ त्या तीक्ष्ण सुरीनें त्यानें उमरच्या आंगावर वार करून त्यानें त्यांच्या नश्वर देहाचा नाश केला. नंतर त्यानें सुरीनें इतर कांहीं इसमांस वार करून शेवटीं त्याच सुरीनें आपला कंठ चिरून आत्महत्या केली, आणि आपल्या भयंकर पापांपैकीं थोड्याशा पापाचें प्रायश्चित्त केलें.

परंतु त्यावेळीं खलिफा उमरचा प्राणवायु त्यांच्या देहांतून निघून गेला नव्हता; त्यांचे भाईबंद व अनुचर यांनीं त्यांना त्यांच्या घरीं नेलें व त्यांची

यथायोग्य शुश्रूषा करून शक्य तो औषधोपचार केला; परंतु खलिफांना गुण वाटण्याची आशा नाहीं, असें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां त्या सर्वांना अतिशय दुःख झालें; परंतु सर्वांनीं मिळून आपल्यापैकीं कोणाला तरी खलिफाच्या जाग्यावर अभिषेक करण्याविषयीं उमरना विनंति केली. त्यांना उत्तरादाखल उमर ह्मणाले, "जो कार्यभार इतके दिवस आह्मीं वाहिला, त्याच्या जबाबदारीचा व परिणामाचा अनुभव सध्यां मला येत आहे; ज्याच्या योगानें शेवटीं अशी दशा प्राप्त होते, तो भार कोणालाहि आंगावर घेण्याला मीं कसें सांगूं?" कोणी कोणी ह्मणाले कीं, उमरनीं जर आपल्या मुलाला आपल्या जाग्यावर नेमिलें, तर त्याला आपला पुढारी ह्मणून कबूल करण्याला ते तयार होते. परंतु इस्लामचें हित कसें होईल हीच ज्याला चिंता, ज्यानें इस्लामाकरितां आपल्या ऐश्वर्यसुखावर तिलांजलि दिली, अबुबकर हयात असतां खलिफापद स्वीकारण्याचें ज्यानें नाकारिलें, तो अपत्यस्नेहाला बळी पडून आपल्या मुलाला खलिफाच्या उच्च पदावर अभिषेक करण्यास कसा संमति देईल? त्यांनीं सर्वांना उघड उघड सांगितलें कीं, "आपल्या परिवारापैकीं कोणालाहि तरी या उच्च पदावर अभिषेक करावा असें आपल्या कधींहि मनांत आलें नाहीं; तशी इच्छा केल्यास आपल्याला भगवन्तासमोर लाजेनें मान खालीं घालावी लागेल." याचेंच नांव कर्तव्य परायणता व विवेकानुवर्तित्व! नंतर त्यांनीं हजरत महम्मदांच्या सहा पट्ट शिष्यांच्या नांवांचा उल्लेख करून त्यापैकीं प्रत्येकाच्या स्वभावांतील दोष आणि दुर्बलता यांचें विवेचन केलें आणि ह्मणाले कीं, "यापैकीं कोणाहि एकावर हा भार टाकण्यास मीं असमर्थ आहें. परंतु या सहां शिवाय जर दुसरा कोणीहि योग्य मनुष्य न आढळेल, तर नाइलाज ह्मणून या सहांपैकीं जो सर्वांस लायक व योग्य आहे असें वाटेल त्याला निवडावा." उमरनीं ज्या सहा इसमांचा उल्लेख केला, त्यांचीं नावें:— १ उस्मान, २ आलि, ३ सायाद, ४ तल्हा, ५ ओबेयार, आणि ६ अब्दुर रहमान. उमरनीं आणखीं असेंहि सांगितलें कीं, हजरतांच्या सहचरांना मंत्रिमंडळांत जर श्रेष्ठ जागा दिली, तर शासनाधिकाराचा जबाबदारीचा प्रश्न सहज सुटेल. आणि पूर्वोक्त सहाजणांपैकीं तिघांना मंत्रिमंडळांत दाखल करण्याबद्दल त्यांनीं उपदेश केला आणि ह्मणाले कीं, "आमचा ज्येष्ठ पुत्र अब्दुल्ला सुद्धां मंत्रिमंडळांत बसून कामकाज पाहूं शकेल." परंतु कोणत्याहि बाबतींत निर्णायक मत आपण देऊं इच्छित नाहीं, असें त्यांनीं सर्वांना

सांगितलें. अशा रीतीनें दहा वर्षें व सहा महिनेपर्यंत खलिफापदाचा उपभोग घेऊन 'अमिरोल् मुमेनिन्' उमर हे इहलोक सोडून परलोकची यात्रा करिते झाले. इसवीसनाच्या ६३४ व्या वर्षी आगष्ट महिन्यांत उमर खलिफापदावर आरूढ झाले व इसवी सन ६४४ च्या नोवेंबर महांत आपल्या वयाच्या त्रेसष्टाव्या वर्षी परलोकीं गमन करिते झाले. अबुबकरप्रमाणेंच उमरांचा देह हजरत महम्मदांच्या समाधीच्या पार्श्वभागीं पुरण्यांत आला. हे दोघेहि हजरतांचे प्रियतम शिष्य होते. हजरत आपल्या शिष्यवर्गाला सांगत असत कीं, ज्याप्रमाणें सर्व लोक गगनमंडलांतील तारकांचें दर्शन घेत असतात आणि स्वर्गस्थ लोक स्वर्गांतील महात्म्यांचें दर्शन घेतात; त्याप्रमाणें अबुबकर व उमर हे त्यांतील श्रेष्ठ दर्जाचे होत. हिजरीसन उमरनींच प्रचारांत आणला.

प्रकरण चवथें.

खलिफा उस्मान्.

हजरत महंमदांनीं इस्लामधर्मप्रचाराचें व्रत अंगिकारिल्यानंतर त्यांच्याजवळून प्रथम ज्यांनीं दीक्षा घेतली, त्यांपैकीं उस्मान् हा एक होता. हजरतांचा प्रथम शिष्य त्यांची धर्मपत्नी खतिजा ही होय. त्यानंतर त्यांचा चुलता अबुतालब यांचा पुत्र अली यानें दीक्षा घेतली. नंतर खतिजादेवीचा जरद नांवाचा दास दीक्षित झाला; हजरतांची सेवा करितां करितां त्यांच्याविषयीं त्याला इतकें प्रेम वाटूं लागलें कीं, त्यानें हजरतांजवळून दीक्षा घेतली; नंतर यथाकालीं त्याला दास्यत्वांतून मुक्त करण्यांत आलें, तरीहि तो आपल्या घरीं परत न जातां त्यांच्याजवळच राहिला. त्यानंतर देशमान्य, ज्ञानी व विचक्षण अशा अबुबकरनें इस्लामधर्म ग्रहण केला. त्याच्यापासून या धर्माचें मर्म समजल्यामुळें सायाद, जोबेयार, तलहा, अबदुर रहिमान आणि उस्मान् यांनीं दीक्षा घेतली. उस्मान् हा हजरतांच्याच वंशांतील असून त्यांचा आतेभाऊ होता. हजरतांचा चतुर्थ पूर्वपुरुष व उस्मानचा पांचवा पुरुष ही एकच व्यक्ति होती; आणि उस्मानची माता बयजादेवी ही हजरतांची आते होय. हजरतांचे पिता अबदुल्ला यांची ही जुळी बहीण होय. वयानें हजरत महंमदांपेक्षां उस्मान् सात वर्षांनीं लहान होता. उस्मानच्या इस्लामधर्मग्रहणासंबंधीं एक गोष्ट ऐकण्यांत येते. असें सांगतात कीं, त्याची मावशी सादी हिला भविष्य सांगण्याचें ज्ञान होतें. ज्याप्रकारानें हजरतांना सिद्धिलाभ झाला, त्यासंबंधाची सर्व माहिती तिला प्रथमपासूनच ठाऊक होती; आणि त्यांच्या धर्माची विजयपताका दिगंतरीं फडकणार हेंही तिला माहीत होतें. त्याच्या मावशीकडून हजरतांच्या दैवीशक्तीसंबंधानें त्यानें नानातऱ्हेच्या गोष्टी ऐकिल्या होत्या व त्यामुळें लहानपणापासून त्याच्या मनांत हजरतांविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती; नंतर भाई अबुबकर याच्या तोंडून इस्लाम धर्माचीं उदात्त तत्वें त्यानें ऐकिल्या.नंतर प्रचलित धर्मावरील त्याचा विश्वास क्रमानें नाहींसा झाला आणि इस्लाम धर्माची दीक्षा घेण्याविषयीं तो उत्सुक झाला. नवधर्माची दीक्षा घेतेवेळीं त्याचें वय ३८ वर्षांचें होतें. क्रमाक्रमानें हजरतांची मर्जी त्याच्यावर इतकी

प्रसन्न झाली कीं, 'रकिया' नांवाच्या आपल्या एका मुलीबरोबर हजरतांनीं त्याचा विवाह करून दिला. कांहीं दिवसांनीं रकिया मृत्यु पावल्यानंतर हजरतांनीं आपली 'कुलसुक्' नांवाची दुसरी गुणवती कन्या त्याला दिली. अर्थात् उस्मान् हा हजरतांचा जांवई होता. उस्मान्च्या गुणांवर ह-रत इतके लुब्ध झाले कीं, 'आपल्याला जर चाळिस ४० कन्या असत्या, तर त्या सर्वांचा उस्मानबरोबर मीं आनंदानें विवाह लावून दिला असता' असें एकदां त्यांनीं उघड बोलून दाखविलें. सर्वदा उस्मान् हजरतांबरोबर छायेप्रमाणें हजर असे. ज्यावेळीं हजरत उमरा-व्रताचें उद्यापन करण्याकरितां मक्केला गेले, आणि तेथें येण्याला मक्कावासीयांनीं त्यांना प्रतिबंध केला व युद्धाला तयार झाले, त्यावेळीं त्यांच्याबरोबर समेट करण्याच्या इच्छेनें त्यांच्याबरोबर वाटाघाट करण्याकरितां हजरतांनीं उस्मानला पाठविलें; परंतु त्यांच्याकडे गेल्यावर कोरेश लोकांनीं त्याला बंदींत ठेविलें. हजरतांचें कार्य करण्यांत कोणतेंहि क्लेश झाले तरी ते उत्साहानें सहन करणें हें त्यांचें व्रत होतें व त्याला त्याबद्दल अभिमानहि वाटत असे.

आपलें आचरण पवित्र रहाण्यासाठीं उस्मान् नेहेमीं दक्षतेनें वागत असत. केव्हांहि कोणतेंहि दुष्कृत्य आपल्या हातून होऊं नये म्हणून ते अतिशय काळजी घेत व हलक्या गोष्टी ऐकण्याचें नाकारित असत. ते अतिशय भिडस्त होते. कोणी कसलें अन्यायाचरण केल्यास, त्याच्या समक्ष त्या कृत्याबद्दल खुलासा करून घेण्याचा त्यांना संकोच वाटत असे. एकदां त्यांचा एक अनुचर त्यांच्याबरोबर वाटेनें चालला असतां त्या अनुचरानें एका स्त्रीकडे कुत्सित नजरेनें दृष्टिपात केला. हें समक्ष पाहूनहि उस्मान् यांस त्याला त्यावेळीं बोलण्याचा संकोच वाटला. परंतु घरीं पोंचल्यानंतर सर्व मंडळी ज्यावेळीं तेथें जमली, त्यावेळीं त्यांना उद्देशून ते म्हणाले कीं, "तुमच्यांत असा एक मनुष्य आहे कीं, ज्याच्या डोळ्यांत व्यभिचार लक्षणांची झांक मारीत आहे." याचा परिणाम असा झाला कीं, त्या अनुचराला आपल्या अपराधाचें स्मरण होऊन लाज वाटली व उस्मान्च्या सन्मुख उभा राहून तो म्हणाला, "खरोखरच आपणहि हजरत महम्मदांप्रमाणें ईश्वराच्या कृपेला पात्र झालेले आहां." उस्मानानीं उत्तर केलें कीं, "याला ईश्वरी कृपेचें प्रयोजन नाहीं. भगवंतांनीं मनुष्याला जें नैसर्गिक ज्ञान दिलेलें असतें, त्याचा उपयोग करून सुद्धां मनुष्य स्वभावाची पारख करितां येते."

उस्मान् यांजवळ धन पुष्कळ होतें; परंतु त्याच्याजवळ संपत्ति-मद नव्हता; आपल्या विपुल संपत्तीचा साधुकार्यांत व्यय करितांना त्यांना फार आनंद होत असे. अरबस्तानांत पिण्यायोग्य पाण्याचीं स्थानें फारच कमी असत. हजरत महम्मद मदिनेला गेले त्यावेळीं सुद्धां त्यांना जलदुर्भिक्षाचा कटु अनुभव आला होता. मदिना शहरीं 'रोमा' नांवाच्या विहिरीखेरीज इतर विहिरींचें पाणी चांगलें नव्हतें. याकरितां उस्मान्नीं हजरत व त्यांचा शिष्य-वृन्द यांची पाण्याची गैरसोय दूर व्हावी ह्मणून ती विहीर ३५ हजार मुद्रांना (जवळ जवळ १५ हजार रुपये) खरेदी करून त्यांना दिली. मदिना येथील नमाज-मंदिर लोकांना अपुरें होत असल्यामुळें त्यांनीं हजारों रुपये खर्च करून त्या मंदिराला विस्तृत आकार दिला. अशा तऱ्हेनें धार्मिक बाबतींत व लोकहिताचे कामीं ते स्वसंपत्तीचा व्यय करीत असत. त्यांच्या या सर्व सद्-गुणांमुळें ते जितके धर्मबांधवांना प्रिय होते, तितकेच सामान्य जनतेलाहि प्रिय होते आणि यामुळेंच उमरांच्या मृत्यूनंतर त्यांची खलिफापदावर योजना झाली.

उमरांच्या मृत्यूनंतर चवथ्या दिवशीं, हजरतांच्या शिष्यांपैकीं खलिफा-पदाला योग्य ह्मणून ज्या सहाजणांचीं नांवें त्यानीं सांगितलीं होतीं, त्यांच्या-पैकीं एकाची योजना करण्याकरितां मुख्य मुख्य मुसलमान लोक धर्ममंदिरांत एकत्र जमले होते. या सहाजणांपैकीं अबदुल रहिमान यानीं खलिफापद ग्रहण करण्याचें पूर्वींच नाकारिल्यामुळें, त्यांच्याशिवाय बाकी पांचांपैकीं एका-ला निवडण्याविषयीं जमलेल्या मंडळीचें एकमत होतें. तदनुसार 'अबदुल रहिमान' अलि यांस संबोधून ह्मणाला कीं, "पूर्वींच्या खलिफांप्रमाणें कुराण व हजरत महंमद यांच्या आदेशानुसार काम करण्याला तुह्मीं तयार आहां कीं नाहीं?" उत्तरादाखल अलि ह्मणाले कीं, "आपण शक्य तितकें त्याप्रमाणें काम करावयाला कबूल आहों; परंतु कांहीं बाबतींत आपल्याला स्वतंत्र धोर-णानें काम करण्याची इच्छा आहे." तेव्हां अबदुल रहिमान यांनीं उस्मान् यांस तोच प्रश्न केला, परंतु उस्मानांनीं त्याला मुळींच हरकत घेतली नाहीं. पूर्वी-च्या खलिफांचें अनुसरण करून कुराणाच्या आज्ञा व हजरत महंमदांचा उप-देश यांच्या अनुरोधानें आपलें स्वीकृत काम करण्याचें त्यांनीं कबूल केलें. अर्थात् त्यांचीच निवड कायम होऊन खलिफाच्या अधिकाराची माळ त्यांच्याच गळ्यांत पडली. त्या वेळीं जमलेल्यांपैकीं प्रत्येकजणानें उस्मानांचें अनुसरण

करण्याची प्रतिज्ञा केली. परंतु अलि मात्र स्वस्थ राहिला; तेव्हां अबदुल रहिमानांनीं त्याला स्वस्थ रहाण्याचें कारण विचारिलें; तेव्हां लज्जित होत्साता अलि शेवटीं इतरांप्रमाणें प्रतिज्ञाबद्ध होऊन उस्मान् यांस खलिफापदावर बसण्याविषयीं संमति देता झाला. परंतु यापूर्वीं 'तलहा' यानें एकदां 'अली' यांना खासगी रीतीनें असें विचारिलें होतें कीं, त्यांना जर खलिफापद मिळालें नाहीं, तर कोणाची निवड खलिफापदावर करण्याचा त्यांचा विचार होता; त्या वेळीं अलि यांनीं मनापासून उस्मान् यांचेंच नांव घेतलें होतें.

खलिफापदावर अधिष्ठित झाल्यानंतर, उस्मान् यांनीं कुराणांतील सर्व वचनें (आयेत्) एकत्र लिहून त्यांचा एकच ग्रंथ करण्याच्या कामीं प्रयत्न चालविला. हजरत महंमदांना ईश्वराचा अनुग्रह झाल्यानंतर त्यांनीं जे जे उपदेश सांगितले, ते कोणीं मुखोद्गत केले, कोणीं खजुरीच्या पानावर लिहुन ठेविले, तर कोणी आपल्या वक्षःस्थलावर गोंदून ठेविले; त्यांचीं हीं सर्व वचनें 'कुराण' ह्मणून प्रसिद्ध आहेत. परंतु त्या सर्व वचनांची सुरवात व शेवट कोणालाहि माहीत नव्हता. यासाठीं हजरत निजधामाला गेल्यानंतर अबुबकर व उमर यांनीं निरनिराळ्या ठिकाणचीं हीं सर्व प्रवचनें एकत्र करण्याकरितां स्वतंत्र मनुष्य नेमिले. सर्व वचनें उपलब्ध झाल्यानंतर, तीं लिहून काढून अबुबकर यांनीं आपल्याजवळ ठेविलीं. त्यांच्या पश्चात् उमर यांनीं तीं आपल्याजवळ ठेविलीं. उस्मान् जेव्हां खलिपा झाले, तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं, अरबस्थानांतील निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या भाषेंत कुराणांतील आयेत् प्रचलित आहेत. हजरतांनीं त्यांचें आपल्या संप्रदायाच्या कोरेश भाषेंत विवरण केलें आहे. व निरनिराळ्या भाषांत त्याचे अनुवाद झाले असून. कांहीं ठिकाणीं मुळांत व अनुवादांत फरक दिसून आला. याचा भविष्यत्कालीं अनिष्ट परिणाम होईल असें उस्मान् यास वाटलें; यासाठीं कोरेश भाषेंतील सर्व वचनें त्यांनीं पुनः एकत्र संग्रहित केलीं आणि तीं पूर्व संग्रहित वचनांशीं ताडून पाहतां असें आढळून आलें कीं, सर्व आयेत् लिपिबद्ध झालें आहेत; तेव्हां विभिन्न भाषेंतील लिखितांत जे आयेत् होते, ते सर्व अग्नीला अर्पण करण्यांत आले; आणि हजरत महंमदांनीं ज्यांचें कोरेश भाषेंत विवरण केलें होतें, ते निरनिराळ्या प्रकरणांत लिहून त्यांनीं त्याचा ग्रंथ तयार केला; आणि त्याच्या प्रती काढून त्या निरनिराळ्या ठिकाणीं पाठविल्या. अशा तऱ्हेनें त्या ग्रंथाचा जिकडे तिकडे प्रचार करून, पाठभेद व त्यापासून

उद्भवणारे वाद यांना कायमची तिलांजलि देण्यांत आली. त्यांच्या हुकमानें सर्व ठिकाणचे मुसलमान लोक त्यांनीं प्रचारित केलेल्या संस्करणाला अनुसरून सर्व कार्यांत वागूं लागले. वर्तमानकाळीं जगतांत सर्वत्र उस्मान् यांनीं संग्रहित केलेलें कुराणच प्रचलित आहे.

परंतु उस्मान्च्या पूर्वींचे खलिफा ज्याप्रमाणें सर्व सांप्रदायांची प्रीति व श्रद्धा संपादन करून शासनकार्य चालवीत, तसें उस्मान् यांना करितां आलें नाहीं. आपल्याला प्रथमच दिसून आलें आहे कीं, अल्लीला खलिफापद न मिळाल्यामुळें तो असंतुष्ट झालाच होता; अर्थात् जे अल्लींवर अनुरक्त होते, ते उस्मान्विषयीं उदासीन असत. दुसरें कारण असें होतें कीं, शासनप्रसंगीं निरनिराळ्या कामांवर आपलेच नातलग उस्मान् नेमीत असत आणि त्यामुळें बरेच लोक नाखुष होते. त्यांनीं कामें करण्याकरितां नेमिलेल्या अधिकाऱ्यांच्या त्रासानें व अत्याचारांनीं कंटाळलेले लोक त्यांच्याकडे आपलीं गाऱ्हाणीं घेऊन जात; परंतु उस्मान्कडून त्यांना योग्य तो न्याय मिळत नसे. या व इतर कारणांनीं त्यांच्या कारकीर्दींत देशांतील शांतता नाहींशी होऊन त्यांच्या विरुद्ध गुप्त कट होण्याला सुरवात झाली. याच वेळीं मदिना येथील आन्सार लोकांमध्येहि विशेष असंतोष पसरला होता. आजपर्यंत कोरेश वंशांतीलच एकसारखे खलिफा ह्मणून निवडिले जातात, हें त्यांना सहन न होऊन त्यांच्या मनांत ईर्ष्या उत्पन्न झाली. एवढेंच केवळ नव्हे; तर सर्व मोठमोठ्या हुद्यांवर फक्त कोरेश लोकच नेमिले जात व त्यामुळें कोरेश लोकांना एक प्रकारचा ताठा उत्पन्न झाला होता; व यामुळें आन्सार लोक कोरेश लोकांचा अतिशय द्वेष करूं लागले. अशातऱ्हेनें आस्ते आस्ते इस्लामच्या शान्तिपूर्ण राज्यांत अशान्तीचें बीज पेरलें जाऊन त्याचा परिणाम असा झाला कीं, ठिकठिकाणीं कट होऊन खलिफा उस्मान् यास पदच्युत करण्याचा विचार सुरू झाला.

अमीर उस्मान् यांच्या कारकीर्दींत इस्लामचा अधिकार जितका विस्तृत झाला, तितकेच युद्धप्रसंगहि वरचेवर येऊं लागले. अमीर उस्मान् खलिफा होऊन चार वर्षें झाल्यानंतर, इस्लामचें सैन्य पश्चिमेकडील देशांवर चाल करून गेलें होतें व तिकडे त्यांना कांहीं अंशीं यशहि मिळालें. त्यानंतर फ्रान्स देशांतील शहरें एका मागून एक त्यांच्या ताब्यांत येत गेलीं. अशा तऱ्हेची इस्लामची वाढती प्रतिष्ठा पाहून ती कमी करण्याचा रोमच्या बादशाहानें विचार केला, आणि इसवी सन ६५२ मध्यें मिसर देशांतील कांहीं शहरें

कांबोज करण्याच्या हेतूनें त्यांनें पांचशें घोडेस्वारांसह मोठें सैन्य तिकडे रवाना केलें. या सैन्याला प्रतिबंध करण्याकरितां अमीर उस्मानांनीं योग्य अशा सेनापतींच्या आधिपत्याखालीं सैन्य रवाना केलें. ''जाव्स सोया'' नांवाच्या ठिकाणीं उभय सैन्यांची गांठ पडली व तेथेंच घोरतर संग्रामाला प्रारंभ झाला. परंतु मुसलमान सैन्याच्या उज्वल पराक्रमामुळें थोडक्याच अवधींत रोमन सैन्याचा धीर सुटून त्यानें पाठ दाखविली; आणि त्यांचा सेनापति व रोमसम्राटपुत्र ''कोस्तान्तिन्'' ह्यानें प्राणभयानें भूमध्य समुद्रांतील एका बेटाकडे पलायन केलें. परंतु मुसलमान सैन्याच्या पाठलागाच्या भीतीमुळें त्या बेटांतील लोकांनीं त्याचा वध केला. यानंतर एक वर्षांत अमीर उस्मानांनीं 'खोरासान' प्रांतांतील मुख्य मुख्य ठाणीं आपल्या अमलाखालीं आणून तेथें इस्लामधर्माचा प्रसार केला.

अशा तऱ्हेनें इस्लामच्या राज्याची वाढ करून व देशोदेशीं अरबांच्या शौर्यवीर्याची कीर्ति वाढवून सुद्धां अमीर उस्मानांना आपल्या प्रजेची श्रद्धा व प्रेम हीं आकर्षण करितां आलीं नाहींत. मिसर देशाची व्यवस्था पहाण्याकरितां त्यांनीं 'साद'चा पुत्र 'अबदुल्ला' याला तेथील अधिकारी नेमिलें. परंतु त्याच्या अमलाखालीं मिसर देशांतील लोक अत्यंत असंतुष्ट झाले आणि त्याला पदच्युत करून त्याच्याऐवजीं दुसरा योग्य मनुष्य नेमण्याविषयीं त्यांनीं अमीर उस्मान्‌कडे विनंति केली. त्याचप्रमाणें कूफा, बसोरा इत्यादि ठिकाणच्या लोकांनींहि अशाच तऱ्हेच्या तक्रारी त्यांच्याकडे नेल्या. त्यांचें सांत्वन करण्याच्या हेतूनें उस्मानानीं, अबुबकरचा पुत्र महम्मद याला त्याच्या जाग्यावर नेमिलें व त्या आशयाचें पत्र अबदुल्लाकडे पाठविण्याकरितां लिहून तें एका सांडणी स्वाराबरोबर त्याचेकडे रवाना केलें. यामुळें संतुष्ट होऊन आपल्या नवाधिकारसंपन्न महम्मदाबरोबरच मिसर लोक आपल्या प्रांताकडे निघाले. कांहीं दिवसांनंतर वाटेंत त्यांची व खलिफांनीं पाठविलेल्या सांडणीस्वाराची गांठ पडली. तो कोण व कोठें जात आहे अशाविषयीं त्यांनीं त्या सांडणीस्वाराला पृच्छा केली; तेव्हां त्यानें सांगितलें कीं, खलिफांच्या हुकमावरून मिसराधिपति अबदुल्ला यांजकडे आपण जात आहों; तेव्हां, खलिफांनीं कांहीं पत्र वगैरे बरोबर दिलें आहे कीं काय? अशी त्यांनीं त्या दूताजवळ पृच्छा केली; परंतु त्यानें समाधानकारक उत्तर न दिल्यामुळें, त्यांनीं त्याचा झाडा घेतला; तेव्हां त्याच्या पाण्याच्या लोट्यांत एक पत्र सांपडलें. त्या पत्रांत लिहिलें होतें कीं,

"हे दुष्ट मिसरवासी लोक मदिनेकडून आपल्या प्रांतीं गेले ह्मणजे अबदल्लानें कांहींची गर्दन उडवावी व इतरांस सुळीं द्यावें; कारण असें केल्याशिवाय प्रजाशासन निर्विवाद चालवितां येणार नाहीं." हें वाचून मिसर लोकांचा राग भडकला व त्यांनीं लगेच आपला मोर्चा मदिनाकडे वळवून बंडाळी माजविण्यास सुरवात केली. कूफा व बसरा येथील लोकांच्या कानीं हें वृत्त गेल्यानंतर ते तिकडून निघून या लोकांना येऊन मिळाले. उस्मान्‌च्या या पत्रांतील मजकूर कोणालाहि माहित नव्हता. सदर पत्राचा शपथपूर्वक इन्कार केला गेला, तरीहि त्याच्यावर कोणाचा विश्वास बसेना व ते त्याच्या वधाविषयीं उत्सुक झाले; व यासाठीं त्यांनीं ४० दिवसपर्यंत मदिनेला वेढा दिला होता. महासंकटावस्था जाणून चार वीरश्रेष्ठांनीं शस्त्रास्त्रें ग्रहण करून नगर रक्षणाचें काम चालविलें. या चौघांमध्यें मुसलमान लोकांचे जगद्विख्यात व चिरस्मरणीय इमाम 'हसन' व 'हुसेन' हे होते. त्यांच्या कौशल्यामुळें शत्रुपक्षापैकीं कोणालाहि नगरांत प्रवेश करितां येईना. तेव्हां निरुपाय जाणून शत्रूंनीं शहराला आग लाविली व त्या गडबडींत त्यांनीं खलिफा उस्मान् यांचे वाड्यांत प्रवेश करण्याची खटपट केली. उस्मान्‌च्या अनुयायांनीं त्यांचें प्राणरक्षण करण्याकरितां शत्रूवर चाल केली, तेव्हां त्यांना स्वस्थ बसण्याविषयीं उस्मान् यांनीं हुकूम दिला. ते ह्मणाले, "आपला अन्तकाल समीप आला आहे, अर्थात् तुमच्या अनन्त उत्कट उपायांचाहि कांहीं उपयोग होणार नाहीं." त्यांना हें कसें समजलें अशाविषयीं लोकांनीं प्रश्न केल्यावरून स्थिरचित्तानें व गंभीरवाणीनें त्यांनीं उत्तर केलें, "गेल्या रात्रीं स्वप्नामध्यें हजरतांनीं भेट दिली, तेव्हां उस्मान्‌नीं निकटवर्ती लोकांचे आपण कसे अपराध केले आहेत हें विवरण केलें व त्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें; तेव्हां दुःखाचा निषेध करून हजरत ह्मणाले, "उद्यां तुह्मीं आमचेपाशीं याल." हें ऐकून त्यांच्या अनुयायांनीं सांगितलें कीं, जोंपर्यंत आमच्या देहामध्यें प्राण आहे, तोंपर्यंत कोणालाहि आपल्या शरीराला नुसता स्पर्शहि करतां येणार नाहीं; मग इजा करणें तर दूरच आहे. परंतु भवितव्यतेला विरोध करणें हें मनुष्याला अशक्य आहे. जें होणारें तें कितीहि विरोध केला तरी तसेंच होणार, त्यांत विकल्प उत्पन्न करणें केव्हांहि शक्य नाहीं. रक्षणार्थ ठेवलेल्या सैन्यानें शत्रुपक्षाचें दमन करण्याकरितां भयंकर युद्ध मांडलें; तरीहि त्यांच्या प्रयत्नाला यश न येतां, विरोधी लोक वाड्यासमोरील आंगणांत येऊन दाखल झाले. उभयपक्षी-

यांच्या तरवारीच्या आघातांनीं उभयपक्षांतील मंडळीचे देह छिन्नभिन्न झाले व आंगणांत जलप्रवाहाप्रमाणें रक्तप्रवाह सुरू झाला. आपला अन्तकाल अगदीं नजीक आला असें जाणून मोठ्या भक्तिभावानें खलिफा उस्मान् याणीं कुराणसरिफाचा पाठ करण्यास प्रारंभ केला. पवित्र पुस्तकाच्या, पवित्र वाणींत ते इतके तल्लीन झाले कीं, त्यांचें बाह्यज्ञान नष्ट होऊन त्यांची समाधी लागली. अशा स्थितींत त्यांना पाहून एक दुरात्मा हळूच त्यांच्या पाठीमागून येऊन त्यांजवर तरवारीचा आघात करिता झाला. त्यायोगें त्याच्या शरीरांतून रक्तस्राव होऊं लागला व कुराणांतील जो आयेत् ते वाचीत होते, त्या आयेतावर रक्त सांडून तो तांबडा झाला. पहिला आघात व्यर्थ गेलेला पाहून दुसऱ्या एका दुरात्म्यानें तरवार घेऊन आघात करण्याचा प्रयत्न केला; परंतु खलिफांची पत्नी 'नायला' देवी इनें हात पुढें करून त्याला विरोध केल्यामुळें तो आघात तिच्या हातावर झाला व त्यामुळें तिच्या हाताचा कांहीं भाग तुटून पडला. परंतु कृतांताचें आगमन झाल्यानंतर त्याला विरोध कोण करूं शकणार ? पहिल्या दुरात्म्याच्या जोडीला आणखीं एक जोडीदार येऊन त्यांनीं त्यांचा वध केला; परंतु नंतर ते स्वतःहि खलिफांच्या नोकरांकडून मारिले गेले. उस्मान्‌ची निधनवार्ता ऐकून महात्मा अल्लि त्याठिकाणीं आला, आणि खलिफा उस्मान्‌चें प्राणरक्षण करण्याला असमर्थ बनलेल्या इमाम हसन व हुसेन या पुत्रद्वयांची त्यानें निर्भत्सना केली; व इतरांनाहि दोष दिला. श ूपक्षाच्या बंडाळीमुळें तीन दिवसपर्यंत खलिफा उस्मानचा देह तशाच स्थितींत पडून राहिला. नंतर शत्रूपक्षाचें दमन करून आपल्या नातलगांच्या व शहरवासियांच्या साहाय्यानें अल्लींनीं उस्मान्‌च्या देहास मूठमाती देण्याची व्यवस्था केली. असें सांगतात कीं, जरूर ती (तिरडी) पालखी न मिळाल्यामुळें गृहद्वाराच्या चौकटींतील एक लांकूड काढून त्यावर त्यांचा मृतदेह बांधण्यांत आला, आणि एका अगदीं सामान्य स्मशानभूमींत त्यांच्या देहाला मूठमाती देण्यांत आली. उस्मानाचे विरोधी लोक त्यांजविषयीं इतके उद्विग्न झाले होते कीं, त्यांनीं नित्याच्या स्मशानभूमींत उस्मानचा देह पुरण्यास परवानगी दिली नाहीं. अशा तऱ्हेनें जवळ जवळ बारा वर्षेंपर्यंत खलिफापदाचा उपभोग घेऊन व राज्यविस्तार करून इस्लामचा दर्जा व गौरव वाढवून, आपल्या वयाच्या ८१ व्या वर्षी खलिफा उस्मान् आपली मानव-लीला संपूर्ण करिते झाले.

उस्मान्च्या मृत्युकालीं मक्केशिवाय तायेफ, येमन, बसरा, कूफा, दमास्कस, हमसे, पॅलेस्टाइन, आजाबिझम, इस्पहान, हमदान, खुरासान इत्यादि पुष्कळ ठिकाणीं इस्लामचें प्रभुत्व होतें. ते विनयी व नम्र स्वभावाचे होते. परंतु पुष्कळ वेळां त्यांचा विरुद्धपक्ष या त्यांच्या गुणांनां ढोंग असें मानीत. याचें उदाहरण ह्मणून एका प्रसंगाचें येथें थोडक्यांत वर्णन करितों:—

मदिना येथील नमाज मंदिरांत, उपदेश देण्याकरितां हजरत महम्मदांनीं एक लांकडी तीन पायऱ्यांची वेदी तयार केली होती. आपल्या ह्यातींत नेहमीं जुम्मा (शुक्रवार) दिवशीं ते या वेदीवरील अगदीं सर्वांत श्रेष्ठ अशा पहिल्या पायरीवर बसून दुसऱ्या पायरीवर पाय ठेवित असत. आणि नंतर उपदेश करीत असत. त्यांच्या पश्चात् खलिफा अबुबकर हे दुसऱ्या पायरीवर बसून तिसऱ्या पायरीवर पाय ठेवीत व नंतर उपदेशाचें काम चालवित. हजरतांविषयीं पूज्यबुद्धि प्रगट करण्याचे हेतूनें ते केव्हांहि पहिल्या पायरीवर बसत नसत. अबुबकरांनंतर उमर खलिफा झाले. त्यांनीं अबुबकर यांस मान देऊन दुसऱ्या पायरीवर बसण्याचें सोडून दिलें व तिसऱ्या (सर्वांत खालील) पायरीवर बसून व जमिनीवर पाय ठेवून उपदेश देण्याची पद्धत ठेविली. परंतु त्यांच्या पश्चात् जेव्हां उस्मान् खलिफा झाले, तेव्हां त्यांनीं हजरतांप्रमाणें वेदीच्या प्रथम पायरीवर बसून उपदेश करण्यास सुरवात केली; त्यामुळें सर्वांनां विस्मय वाटला. त्यांच्या पूर्वींच्या दोनहि खलिफांनीं असलें साहस कधीं कलें नाहीं तर पूर्वींच्या खलिफाच्या पायरीवरहि न बसण्याची त्यांनीं खबरदारी घेतली. ही गोष्ट लक्षांत आणून त्यांना कोणीं प्रश्न केला कीं, "हजरत महम्मद ज्या आसनावर बसून उपदेश करीत, त्याच आसनावर बसून आपणहि उपदेश करितां; अर्थांत तुह्मीं स्वतःला हजरतांच्या बरोबरीचे समजता कीं काय?" त्यावर उस्मान् ह्मणाले, "पहा, जर मीं अबुबकरच्या जाग्यावर बसलों असतों, तर आपण मला अबुबकरच्या तोडीचा समजतों ह्मणाल, आणि उमरच्या जाग्यावर बसलों तरीहि तुह्मीं तसेंच ह्मणणार. परंतु त्यांच्या पैकीं कोणाहि बरोबर माझी बसण्याची योग्यता नाहीं आणि ह्मणून मीं त्यांच्या जाग्यावर बसण्याचें साहस केलें नाहीं. अर्थात् वेदीला चौथी पायरी नसल्यामुळें आपण प्रथम पायरीवर बसतों. परंतु मीं केव्हांहि हजरतांची बरोबरी करूं शकणार नाहीं. अर्थात् त्यांच्या आसनावर बसलों तर लोकांना शंका वाटणें संभवनीय नाहीं असा विचार करून नंतरच

त्यांच्या जागेवर बसण्याचें साहस केलें." इतर बाबतींतहि उस्मान्च्या सहृदयतेचा व इतर सद्गुणांचा परिचय होतो. परंतु या सहृदयतेमुळेंच त्यांना प्रसंगोपात न्यायपरायणतेपासून पराङ्मुख व्हावें लागलें आणि यामुळेंच इतर शिष्टमंडळी त्यांच्याविषयीं उदासीन असे. खलिफा उमर यांचा पुत्र अबदुल्ला याला बऱ्याच लोकांनीं असें सांगितलें कीं, हरमोजान नांवाच्या इसमाच्या हुकुमावरून आबलुल नामक एका गुलामानें त्याच्या बापाचा खून केला. लोकांच्या ह्या सांगण्यावर विश्वास ठेऊन अबदुल्लानें हरमोजानला ठार मारिलें. तेव्हां मुसलमान लोकांनीं अमीर उस्मान् यांजकडे अबदुल्लाच्या विरुद्ध फिर्याद केली. याविषयीं धर्मशास्त्राचा हुकूम काय आहे असें त्यानें सर्व शास्त्रज्ञ मंडळीला विचारलें. परंतु कोणी अबदुल्लाच्या अनुकूल तर कोणी प्रतिकूल असे अभिप्राय दिले; तेव्हां अमीर उस्मान् यांनीं अबदुल्लाला दंड केला व दंडाची रक्कम स्वतः राष्ट्रीय खजिन्यांत जमा केली आणि अबदुल्लाला दोषारोपांतून मुक्त केलें. हा दयाभूतपणा, हें त्यांच्या दुर्बलतेचें लक्षण होतें. आपल्या नातलगांच्या अर्ज विनंत्यांची भीड न मोडवल्यामुळें त्यांना अधिकाऱ्यांच्या जागीं अयोग्य माणसांची नेमणूक बरेच वेळां करावी लागली. परंतु याचा परिणाम असा झाला कीं, देशबांधवांमध्यें त्यांच्याविषयीं अप्रीति उत्पन्न झाली. परंतु अमीर उस्मान् यांची योग्यता अवतारी पुरुष हजरत महम्मद यांच्या दृष्टीनें केवढी होती हें हजरतांच्या पुढील युक्तिवरून दिसून येणार आहे. "मीं धर्मप्रवर्तक असल्यामुळें इहलोकीं मला सर्व लोक जपतात; परंतु स्वर्गलोकांतहि मला जपणारा असा फक्त आमचा भाऊ उस्मान् हाच आहे." लोकांच्या हितार्थ ते बराच पैसा खर्च करीत असत. ते जात्याच दानशूर होते. एका कठीण प्रसंगीं उस्मान् यांनीं हजरतांना तीनशें उंट नजर केले, तेव्हां नमाज मंदिरांतील वेदीवरून उपदेश करित असतां त्यांनीं या विषयावर असें सांगितलें कीं, "उस्मान् यांनीं जें सत्कृत्य केलें आहे, त्यामुळें त्यांच्यावर आतां पापाचा पगडा बसणें शक्य नाहीं" हजरतांनंतर झालेल्या प्रथम तीन खलिफांबद्दल, हजरतांनीं स्वतः असे उद्गार काढिले आहेत कीं, "अवतारी पुरुषाशीं अबुबकर अभिन्न आहेत. उमर, अबुबकरशीं एकरूप आहेत आणि उस्मान् उमरचे गुण समुहांत तल्लीन झालेले आहेत." अवतारी पुरुषांची सहाय्यक माणसें त्यांच्या बरोबर अदृष्टसंबंधानें निगडित झालेलीं असतात हें सत्य आहे. आणि हा चिरस्नेह केव्हांहि विच्छिन्न होऊं शकत नाहीं.

प्रकरण पांचवें.

खलिफा अलि मूर्तुजा.

खलिफा उस्मान्च्या देहाला मूठमाती दिल्यानंतर त्यांच्या जाग्यावर कोणाला बसवावें याविषयीं प्रमुख मुसलमान लोकांनीं विचार करून हजरत महम्मदांचा जांवई व त्यांचा कोरेश लोकांतील प्रथमशिष्य अलि मूर्तुजा यांजकडे ते गेले; आणि त्यानां खलिफापद स्वीकारण्याविषयीं विनंति करण्यांत आली. त्यांना असें वाटलें होतें कीं, अलि याच्या ह्मणण्याला तावडतोब कबूल होतील, परंतु असली भानगडीची व जबाबदारीची जागा पत्करण्याविषयीं अल्लीनीं नाखुषी दर्शविली. नंतर जेव्हां त्या प्रमुख मंडळींनीं अल्लींचा अगदीं पिच्छा पुरविला, त्यावेळीं ते ह्मणाले, "तलहा व जोबेयार यांच्या संमत्तिवांचून आपण खलिफापदावर बसणार नाहीं." हजरत महम्मदांचे जे अत्यंत विश्वासु सहकारी ह्मणून प्रसिद्ध होते, त्यांतीलच, तलहा व जोबेयार हे होते. ते यावेळीं मदिना येथें नव्हते ह्मणूनच अल्लींनीं असें उत्तर दिलें. थोडक्याच अवधींत ते परत आल्यानंतर पुनः अल्लीनीं आपली नापसंती दर्शवून दुसऱ्या कोणाला तरी खलिफा नेमावा असें सुचविलें आणि आपण त्या मनुष्याशीं इमानानें राहूं असेंहि स्पष्टपणानें सांगितलें. परंतु त्यावेळीं अल्लीसारखा खलिफापदाला योग्य असा दुसरा मनुष्य मिळणें शक्य नसल्यामुळें, तलहा, जोबेयार प्रभृति पुढाऱ्यांनीं एकमतानें सांगितलें कीं, अलि हयात असतानां दुसरा कोणीहि खलिफापदावर बसण्याची इच्छा करणार नाहीं; त्यामुळें त्यानींच या पदाचा स्वीकार केला पाहिजे असा सर्वांनीं हट्ट धरिला. तेव्हां अल्लीनीं जास्त आढेवेढे न घेतां खलिफापदाचा स्वीकार केला. तात्काळ तलहा व जोबेयार यांनीं त्यांच्याशीं एकनिष्ठ रहाण्याचें कबूल केलें. नंतर एका मागून एक सर्व प्रमुख मुसलमान मंडळींनीं त्यांच्याशीं एकनिष्ठेच्या शपथा घेतल्या. परंतु खलिफा उस्मान्च्या वंशांतील मंडळींनीं किंवा त्यांच्या स्नेह्यांनीं याप्रमाणें करण्याचें नाकारिलें. सर्व शिष्यवर्गामध्यें अलि हेच हजरतांना जास्त प्रिय होते; याचें कारण असें कीं, हजरतांशीं अल्लींचा जास्त सहवास होता आणि हजरतपत्नि खतिजा देवी शिवाय करून प्रथम त्यानेंच हजरतांकडून इस्लामी धर्मा-

ची दीक्षा घेतली होती; हजरतांचा चुलता अबुतालब यांचा अलि हा पुत्र होय. हजरत लहानपणींच पितृमातृहीन झाले व त्यांचा भार सर्वस्वीं त्यांचे आजे अबदुल मुतालिब यांजवर पडला. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर हजरतांचें लालनपालन अबुतालब यानींच केलें. अशास्थितींत त्यांचा चुलतभाऊ अलि-यांजवर त्यांचें विशेष प्रेम जडलें यांत आश्चर्य कसलें? लहानपणापासूनच हजरतांवर अलिची श्रद्धा व प्रेम होतें. कालांतरानें अबुतालब वृद्ध होऊन त्यांना पहिल्यासारखा उद्योग करितां येईना; तेव्हां त्यांना प्रापंचिक अडचणी जास्त भासूं लागल्या; आणि सर्व कुटुंबाच्या भरण-पोषणाचा भार हजरतांनीं आपल्याकडे घेतला; त्यावेळेपासूनच अलिचें हजरतांवर प्रेम बसलें व उत्तरोत्तर प्रेमाचें, श्रद्धेंत रूपांतर होऊन त्याचा सर्व काल हजरतांच्या सान्निध्यांत जाऊं लागला.

हजरत जेव्हां ईश्वरादेशानुसार नवधर्माचा प्रसार करूं लागले व आपण प्रेरितपुरुष असल्याचें त्यांनीं जाहिर केलें, त्यावेळीं अलींचें वय १०।१२ वर्षांचें होतें; परंतु या अल्पवयांत सुद्धां हजरतांच्या नवधर्मावर त्याचा दृढविश्वास होता. एकदां त्याचा बाप अबुतालब यानें त्याला विचारिलें कीं, "तूं कोणत्या धर्माला मानतोस?" तेव्हां त्या वयांतहि अलीनीं शांतपणानें उत्तर केलें कीं, "फक्त एका निराकार परमेश्वरावर दृढविश्वास ठेवून आणि परमेश्वरानें प्रेरणा दिलेले हजरत महंमद यांना गुरुस्थानीं मानून त्यांच्या उपदेशानुसार आपण आपलें सर्व आयुष्य घालवूं." मुलाचा हा दृढविश्वास पाहून अबुतालबनीं त्याला त्याच्या मताप्रमाणें वागण्याचा उपदेश केला आणि नंतर केव्हांहि त्याला त्याच्या या मताविरुद्ध कोणतेंहि काम करण्यास त्यांनीं सांगितलें नाहीं. कोरेश लोकांनीं जेव्हां हजरतांचा छळ केला, तेव्हां अलीनें त्यांना सोडिलें नाहीं. एके दिवशीं कोरेश लोकांना एकत्र करून हजरतांनीं त्यांना नूतनधर्माचें रहस्य सांगून त्यांना विचारिलें कीं, "आमच्या या पवित्र धर्माच्या प्रचाराला सहाय्य करणार कीं नाहीं?" तेव्हां कोरेश पुढाऱ्यांच्या भीतीनें कोणींहि अनुकूल उत्तर देईना; परंतु अलीनें उभें राहून दृढविश्वासपूर्वक व निर्भय चित्तानें उत्तर केलें कीं, परमेश्वराच्या सत्यधर्मप्रचाराकरितां प्रेरितपुरुष हजरत महंमद यांचे चरणीं आपण तनु-मन-धन अर्पण करितों" तेव्हां हजरतांनीं अलीला आलिंगन दिलें, आणि जमलेल्या कोरेश लोकांना ह्मणाले, "हाच आमचा सल्लागार व प्रतिनिधि आहे." अलीचा धर्मविश्वास प्रेम व

इतर सद्गुण पाहून हजरतांनींच त्याला अलि हें नांव ठेविलें. यालाच दिलदारपणा ह्मणतात. अह्लीच्या आईनें ठेविलेलें त्याचें नांव "हैदर" असें होतें व त्याचें आडनांव 'मूर्तुजा' असें होतें. परंतु हजरतांनीं ठेविलेलें नांवच त्याला अधिक आवडत असे व त्यामुळें पहिल्या नांवानें ते कोणालाहि ओळख देत नसत.

हजरत महंमदांवर त्याची केवढी भक्ति व श्रद्धा होती, हें पुढील एकाच गोष्टीवरून दृष्टोत्पत्तीस येईल. रात्रीच्या वेळीं हजरतांना झोंप लागली ह्मणजे त्यांना पकडावें व नंतर दुसरे दिवशीं सकाळीं सर्वांसमक्ष त्यांचा शिरच्छेद करावा, असा एकदां कोरेश पुढाऱ्यांनीं विचार ठरविला. त्यांचा हा बेत हजरत महंमदांना कळला, तेव्हां रोजची जागा सोडून दुसऱ्या जागीं झोंपण्याची त्यांनीं व्यवस्था केली. परंतु अह्लीनें हजरतांच्या नित्याच्या शय्येवर झोंपून त्यांचें पांघरूण आंगावर लपेटून घेतलें. यथाकालीं त्या दुष्ट कोरेश लोकांनीं घरांत प्रवेश करून अह्लीला हजरत असें मानून गिरफदार केलें. परंतु दिव्याच्या उजेडांत आल्यावर जेव्हां त्यांना आपली चूक कळून आली, तेव्हां त्यांच्या रागाला पारावार राहिला नाहीं. अह्लीला शिवीगाळ करून "महंमद कोठें आहे" ह्मणून त्यांनीं विचारिलें; उत्तरादाखल अलि ह्मणाला, "आपण घरच्या पहारेकऱ्याचें काम करीत होतों, परंतु घरधनी हजरत महंमद कोठें गेले हें आपल्याला माहीत नाहीं." अह्लीच्या या उत्तरानें निराश होऊन व त्याला त्रास देण्यांत कांहीं निष्पन्न होणार नाहीं, हें जाणून त्यांनीं त्याला सोडून दिलें. धर्म-प्रचारकाकरितां स्वतःचे प्राण देण्यास सुद्धां अह्लीनें माघार घेतली नाहीं, ही गोष्ट कशाची साक्ष देते बरें ?

अह्लीचा धर्मविश्वास जितका दृढतर होता, तितकेंच त्याचें शरीरहि मजबूत व कांटक होतें. इस्लामधर्मप्रचाराकरितां कितीहि कष्ट पडले, तरी त्याचें त्याला कांहीं वाटत नसे. याकरितां अनेक धर्मयुद्धांत भाग घेऊन आपल्या धाडशी स्वभावाचा व पराक्रमाचा परिचय त्यानें सर्वांस करून दिला आहे. त्याचें निःसीम धाडस व अलौकिक शौर्य या गुणांनीं सर्व मुसलमान मंडळींत त्याला मान्यता होती. लढाईचे वेळीं त्याचें स्मरण केलें तर स्फुरण चढत असे, यामुळें अजून सुद्धां रणसंग्रामाचे वेळीं इस्लामी लोक 'अलि, अलि' असा शब्दघोष करितात. हजरत महंमद व त्यांचा शिष्यवर्ग हे जेव्हां मक्केहून मदिनेला आले व तेथें त्यांनीं आपलें धर्मप्रचाराचें काम शांततेनें

चालविलें; त्यावेळीं यहुदी व अन्यधर्मी लोकांबरोबर जीं त्यांचीं युद्धें झालीं, त्या सर्वांत अलि मूर्तुजानें आपला पराक्रम प्रकट करून हजरतांचा स्नेह व आदर संपादन केला. एकदां नेत्ररोगानें पीडित झाल्यामुळें एका विशिष्ट युद्धांत अलीला भाग घेतां न आल्यामुळें तो घरींच राहिला; आणि हजरत महंमदांचें डोकें दुखत असल्यामुळें ते स्वतः रणक्षेत्रावर हजर राहून सेनापतीचें काम करूं शकले नाहींत. अबुबकर, उमर इत्यादि प्रमुख शिष्यांनीं घनघोर युद्ध केलें; परंतु त्यांना शत्रूचा पराभव करितां आला नाहीं. तेव्हां कोणाला सेनापति नेमावा या विचारांत हजरत पडले; याच वेळीं बरेच दिवसांत हजरतांचें दर्शन न झाल्यामुळें अलीला चैन पडेनासें झालें व तो मदिनेहून हजरतांकडे आला, तेव्हां हजरतांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. ईश्वरावर भार ठेवून त्यांनीं विजय-पताका अलीच्या हातांत दिली, आणि लढाई चालविण्यास हुकूम दिला. पताका हातीं घेते वेळीं अलीनें विचारिलें कीं, "यहुदी लोकांनीं इस्लामधर्म स्वीकारण्याचें कबूल केलें, तर युद्ध पुढें चालवावयाचें कीं नाहीं?" महंमदांनीं उत्तर केलें कीं, "जरी केवळ एका यहुदी मनुष्याला सत्यधर्माची दीक्षा तुह्मीं देऊं शकाल, तरी ईश्वराच्या नांवानें पुढें रक्तपात करणें योग्य होणार नाहीं." हजरतांचा मनोभाव ओळखून अलीनें यहुदी लोकांवरोबर लढाईस प्रारंभ केला; परंतु त्याचा तेजस्वी चेहरा व त्याचा अलोट पराक्रम पाहून थोड्याच वेळांत यहुदी लोक घाबरून गेले व शेवटीं शरण आले. वास्तविक या युद्धांत अनेक संकटांना तोंड देऊन अलीनें जो पराक्रम केला, त्यमुळें त्याजवर हजरतमहंमद अतिशय संतुष्ट झाले व त्यांनीं त्याचा अतिशय गौरव केला; परंतु अलीला मात्र त्याचें कारण समजलें नाहीं; कारण हजरतांच्या इच्छेप्रमाणें वागणें हें त्याला कर्तव्य वाटत होतें.

हजरत महम्मदांची मुलगी फातिमा बिबी ही जशी असामान्य रूपवती होती, तशीच गुणवतीहि होती. तिच्या वयाच्या अठराव्या वर्षीं, तिचें रूप पाहून कोरेश मंडळींतील पुष्कळ तरुण तिजबरोबर विवाह करण्याची इच्छा करीत होते. परंतु ही सर्व तरुण मंडळी फातिमाच्या लायक नाहीं असें हजरत व त्यांचे संबंधी यांस वाटत असे. पुढें अलि मूर्तुजा यांची प्रापंचिक स्थिती जरा खालावल्यानंतर, हजरत व त्यांचा मुख्य शिष्य अबुबकर हे फातिमा बिबीचें अलिबरोबर लग्न करावें असा विचार करूं लागले. अली-

जवळ जेव्हां त्यानीं या गोष्टीचा उपक्रम केला, तेव्हां विनयपूर्वक अल्लीनें त्यांना सांगितलें कीं, ''माझी प्रापंचिक स्थिती ही अशा तऱ्हेची, तेव्हां लग्न करून परिवाराचें संगोपन करण्याचें सामर्थ्य मझ्याजवळ नाहीं. अर्थात् फातिमाबिबीसारख्या रमणीरत्नाचें पाणिग्रहण करणें ही जरी मोठ्या मानाची गोष्ट असली, तरी त्याला संमति देणें मला शक्य नाहीं.'' परंतु त्याचा हा आग्रह फार दिवस टिकला नाहीं. हजरतांच्या स्नेह्यांनीं त्याला द्रव्याची निरर्थकता पटवून देऊन त्या विवाहास संमति देण्यास उ‍ुक्त केलें. फातिमाच्या रूपगुणांमुळें अल्लीचें मन प्रथमपासूनच तिच्याकडे ओढत होतें, परंतु आपल्या गरिबीमुळें तो साशंक होता. परंतु स्वतः हजरत ज्यावेळीं त्याच्या दारिद्र्याकडे दुर्लक्ष करून आपली मुलगी मनापासून त्याला देण्यास तयार झाले, त्यावेळीं अल्लीला फारच आनंद झाला. संपत्तीपेक्षां चारित्र्य व रूपापेक्षां सद्‌गुण यानांच हजरत जास्त चाहतात, हें जेव्हां प्रत्यक्षच अल्लीच्या प्रत्ययास आलें, तेव्हां तर हजरतांविषयींची त्याची भक्ति व कृतज्ञता हीं जास्तच वृद्धिंगत झालीं. अबुबकरच्या उपदेशानुसार विवाहापूर्वीं अल्ली समक्ष हजरतांकडे गेला व त्यानें आपली दारिद्र्यकाहणी त्यांना सांगितली. परंतु त्याच्या हकीगतीबद्दल मुळींच न बोलतां हजरत अल्लीला ह्मणाले कीं, ''विवाहाला ज्या सामग्रीची जरूर असते, ती तर सर्व तुमच्याजवळ आहेना?'' मोकळ्या मनानें अल्लि ह्मणाला, ''एक तरवार, एक उंट आणि एक चिलखत याशिवाय मजजवळ कांहीं नाहीं.'' तेव्हां हजरत त्याला, ''तरवार आणि उंट हीं तर तुह्मांला पाहिजेतच; चिलखताच्या किंमतींत तुमच्या विवाहाचा खर्च भागेल.'' नंतर अल्लीला बरोबर घेऊन हजरत मशिदींत गेले, आणि तेथें आपले शिष्य व 'आन्सार' आणि 'मोहाज्जेर' या दोनही सांप्रदायाच्या मंडळींना त्यांनीं तेथें बोलावून सांगितलें कीं, ''या विवाहासंबंधीं ईश्वराची आज्ञा मिळाल्यानंतरच आपण अल्लीबरोबर फातिमाचा विवाह करून देत आहों. यावेळीं आपण जर आपली संमति जाहिरपणें दिली, तर हें शुभकार्य झालेंच असें मी समजेन.'' नंतर अल्लीनें आपलें चिलखत ४०० दिरेम ह्मणजे १७० रुपयांस उस्मान्‌ला विकून त्या पैशांत त्यानें लग्नाचा खर्च भागविला. परंतु तें चिलखत अल्लीखेरीज इतरांच्या आंगांत शोभणार नाहीं असें पाहून उस्मान्‌नें तें पुनः अल्लीला बक्षीस दिलें. या लग्नांत अल्लीनें जे रुपये हजरतांना दिले, त्यांतून त्यांनीं अल्लीला, मिसर देशांत तयार झालेली

एक मऊ लोंकरीची गादी, खुरासन येथें बनविलेली एक शालजोडी व एक रजई, एक कांबळें. कांहीं मातीचीं भांडीं, आणि एक रेशमी ओढणी असें सामान दिलें. भांडीं देतांना हजरत ह्मणाले कीं, " ज्याला मातीचीं भांडीं आवडतात, त्याच्यावर ईश्वराची कृपादृष्टी असते. " विवाहानंतर योग्य वेळीं फातिमा पतिगृहीं गेली; त्यावेळीं हजरत मुलीला ह्मणाले कीं, " फातिमे, तुझे नाथ अलि हे फार गुणवान् व फार योग्य आहेत. " आणि अलीला ह्मणाले कीं, " अलि, तुमची पत्नी फातिमा ही कुलवधु व पतिव्रता स्त्री होवो. " पतीच्या विपद्ग्रस्त स्थितीमुळें फातिमेनें केव्हांहि व कोठेंहि पतीची अवहेलना व हेळसांड केली नाहीं; उलट पक्षीं ती मनापासून पतीची सेवा करीत असे आणि सर्व गृहकृत्यें करीत असतांना ती कधींहि असंतुष्ट होत नसे. एकदां हजरतांनीं आपल्या मुलीला जांवयासंबंधानें प्रश्न केला असतां, फातिमा ह्मणाली कीं, " माझे स्वामी सर्वगुणसंपन्न आहेत, परंतु ते दरिद्री असल्यामुळें कोरेश-स्त्रिया माझी थट्टा करितात व त्यामुळें मला अतिशय दुःख होतें. " यावर हजरत तिला ह्मणाले कीं, " मुली, तुझा बाप दरिद्री नाहीं व तुझा पतीहि दरिद्री नाहीं. सांसारिक नश्वर संपत्तीपेक्षां अधिक योग्य अशा ईश्वरी संपत्तीचे ते भागीदार आहेत, हें तत्व जर तुझ्या लक्षांत आलें, तर पृथ्वीवरील सर्व संपत्ति तुला कवडीमोल वाटेल. आमच्या सर्व बांधवांत तुझा स्वामी श्रेष्ठ आहे. तूं हें पक्कें लक्षांत ठेव कीं, पृथ्वीवरील सर्व मनुष्यांपैकीं परमेश्वर फक्त दोघानांच हाताशीं धरील; त्यापैकीं एक तुझा बाप व दुसरा तुझा पति होय. " सर्व गृह-कृत्यें एकट्यालाच करावीं लागल्यामुळें फातिमाला कधीं कधीं त्रास होत असे, यामुळें आपल्याला एकादी दासी देण्याबद्दल तिनें हजरतांना सांगितलें; तेव्हां हजरत ह्मणाले कीं, " दासीपेक्षां दुसरीं चांगलीं साधनें मीं तुला देतों. " त्यावर फातिमेनें विचारलें, " तीं साधनें कोणतीं ? " हजरतांनीं उत्तर केलें, " नित्य जेव्हां तुझी झोंपण्याची वेळ असते, त्यावेळीं तेहेतीस वेळ साबान अल्ला, (पवित्र परमेश्वर) तेहेतीस वेळ ' अलहमदोलेल्लाई ' (संपूर्ण परमेश्वराचें स्तवन) आणि तेहेतीसवेळ ' अल्ला हो अकबर ' (ईश्वर सर्व श्रेष्ठ) असें ह्मणत जा. नोकरापेक्षां या योगानें तुझें ज्यास्त कल्याण होईल. असें सांगून त्यांनीं तिचा निरोप घेतला. जेणेंकरून मुलीच्या मनांत धनतृष्णा उत्पन्न होणार नाहीं अशा तऱ्हेनें ते वागत असत. असें सांगतात कीं, एकदां हजरत आपल्या

मुलीकडे गेल्यावेळीं, फातिमा त्यानां ह्मणाली कीं " तीन दिवस अन्न न मिळाल्यामुळें आह्मीं उपास करूनच वेळ काढीत आहों." हजरतांनीं उत्तर केलें, " मुली, तुझ्या पित्याच्या पोटांत आज चार दिवस अ.. नाहीं; भुके-च्या यातना कमी व्हाव्या ह्मणून पोटावर धोंडा बांधून ठेविला आहे." असें ह्मणून आंगांतील कपडे काढून हजरतांनीं तो धोंडा तिला दाखविला. अशा तऱ्हेच्या शिक्षणामुळें फातिमा बिबी ही आदर्शभूत पत्नी झाली. अल्लि मूर्तुजा स्वतः सांगत असत कीं, फातिमेनें आपल्या मृत्युकालपर्यंत त्यानां केव्हांहि कोठल्याहि कामांत विरोध केला नाहीं, किंवा उद्विग्नता प्राप्त होण्या-सारखें वर्तन केलें नाहीं, आणि रागाला तर तिनें अजिबातच फांटा दिला होता." फातिमेशीं अ.ीनींहि कधीं कठोर वर्तन केलें नाहीं. या सर्व हकी-गतीवरून अ.ीचें उदात्त चरित्र व त्यांच्याविषयीं हजरतांचें प्रेम व स्नेह किती होता हें नीट लक्षांत येण्यास अडचण पडणार नाहीं.

अमीर उस्मान्प्रमाणेंच अल्लि मूर्तुजांनीं खलिफापदावर बसल्याबरोबर कांहीं मोठ्या अधिकाऱ्यांनां कामावरून दूर केलें. त्यावेळीं पुष्कळ लोकांना, अमीर उस्मान्च्या खुनांत त्यांचा हात असल्याचा संशय आल्यामुळें ते उदास राहिले; आणि याच कारणामुळें त्यांच्या कांहीं हितेच्छु मंडळींनीं जुन्या अधि-काऱ्यांना दूर केल्याबद्दल त्यांचा निषेध केला; परंतु त्यांच्या त्या सदुपदेशाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें. यामुळें देशांत ठिकठिकाणीं असन्तोषाचीं चिन्हें दिसूं लागलीं. ज्यानीं अ.ीचें पुढारीपण नाकारिलें, त्यांना त्याबद्दल विचारलें तर ते स्पष्टपणें सांगत कीं, " अमीर उस्मान्चा खून करणाऱ्या लोकांना जोंपर्यंत योग्य शासन होणार नाहीं, तोंपर्यंत आपण अ.ीचें पुढारीपण केव्हांहि कबूल करणार नाहीं." कोणी कोणी असेंहि ह्मणत कीं, " अमीर उस्मा-न्च्या वधाचे बाबतींत अल्लींवर दोष येत असून त्याचें जोंपर्यंत परिमार्जन होणार नाहीं, तोंपर्यंत अल्लींनां त्रासांतच दिवस काढावे लागतील." या सर्व गोष्टी कानावर आल्यामुळें अ.ी अतिशय चिंताकुल झाले.

हजरत-पत्नी आयेषादेवी हिचें मन अल्लींविषयीं असंतुष्ट होतें. अमीर उस्मान्चा खून झाला, तेव्हां आयेषादेवी मक्केची यात्रा करण्याकरितां गेल्या असून त्यांचा मुक्काम तेथेंच होता. उस्मान्च्या पक्षांतील लोकांनीं त्वरित मक्केला जाऊन उस्मानच्या वधाची सविस्तर हकीकत आयेषा देवीला कळ-विली आणि या कामीं जे दोषी होते, त्यांना योग्य शासन करण्याविषयीं

त्यांना विनंति केली. त्यांची भीड न तुटल्यामुळें, ती त्यांच्या ह्मणण्याला कबूल झाली. नंतर तिच्या हुकुमावरून त्यांनीं १०।१२ हजार सैन्य बरोबर घेऊन बसरा शहरावर चाल केली आणि त्या शहरावरच्या अलींनीं नेमलेल्या शहरअधिकाऱ्याला पिटाळून लाविलें. हें वर्तमान ऐकून खलिफा अलि यांस अतिशय राग आला, आणि मदिना येथील आन्सार व मोहाज्जेर लोकांना बरोबर घेऊन ते बसऱ्याकडे गेले. बरोबर त्यांचे पुत्र इमाम हसन हे होते. त्यांनीं कूफा येथें जाऊन सुमारें दहा हजार लोक गोळा केले व त्यांसह ते आपल्या वडिलांना येऊन मिळाले. हें सर्व सैन्य बरोबर घेऊन खलिफा अलि जेव्हां बसऱ्याजवळ येऊन पोंचले, तेव्हां तलहा व जोबेयार यांच्या लोकांनीं त्यांच्या बरोबर युद्ध करण्याची तयारी केली. अलींबरोबर युद्ध करावें, अशी पहिल्यानें तलहा व जोबेयार यांची इच्छा नव्हती, तर उस्मानच्या खून करणाऱ्या लोकांना शासन व्हावें एवढेंच त्यांचें ह्मणणें होतें. अर्थात् त्यांनीं आपला हा अभिप्राय अलींच्या कानावर घातला. नंतर थोड्याच वेळांत उभयपक्षांमध्यें तह झाला, आणि तहांत ठरल्याप्रमाणें अलींच्या सैन्यांतील पांचशें लोकांना सैन्यांतून घालवून देण्यांत आलें. परंतु एवढ्यानें शांतता प्रस्थापित झाली नाहीं. अलींनीं ज्या लोकांना आपल्या सैन्यांतून बडतर्फ केलें होतें, त्या लोकांनीं गुप्तपणें एकत्र जमून तलहा व जोबेयार यांच्या सैन्यावर रात्रीच्या वेळीं छापा घातला व त्या लोकांना निद्रिस्थावस्थेंतच मारण्याचा सपाटा चालविला. या प्रकारामुळें तलहा व जोबेयार यांना असें वाटलें कीं, ज्याअर्थीं तहाच्या अटी मोडून खलिफांनीं आपल्या लोकांवर अकस्मात् चाल केली आहे त्याअर्थीं, आपण त्यांच्यावर चाल करून गेल्यास त्यांत आपल्याकडे मुळींच दोष येणार नाहीं; असा विचार करून त्यांनीं युद्धाची तयारी केली. युद्ध-क्षेत्रांतली ही बातमी ऐकून अलींनींहि स्वतः युद्धाची तयारी केली, आणि उभयपक्षांमध्यें भीषण युद्ध सुरू झालें. इकडे घोरसंग्राम सुरू असतांना जोबेयार याला अशी खात्रीलायक बातमी कळली कीं, ही सर्व कारवाई अलींनीं सैन्यांतून घालविलेल्या लोकांची आहे व यांत अलींकडे मुळींच दोष नाहीं. तेव्हां जोबेयार याला आपली चूक कळून आली व त्याला अतिशय दुःख झाल्यामुळें युद्धभूमि सोडून तो मक्केकडे चालता झाला. परंतु वाटेंतच एका दुरात्म्यानें अलींना प्रसन्न करण्याच्या इच्छेनें जोबेयारचा शिरच्छेद केला; नंतर ती रक्तानें भरलेली तलवार हातांत

घेऊन अलींकडे आला, आणि आपल्या दुष्कृतीचें वर्णन त्यानें त्यांच्यासमोर केलें. परतु यामुळें अल्लींना आनंद मुळींच झाला नाहीं. उलट अतिशय वाईट वाटलें. त्यांचे नेत्रांतून अश्रुप्रवाह सुरू झाला. शोकभरांत ते त्याला " तूं खात्रीनें नरकांत जाशील " असा शाप देते झाले. अल्लींचें हें वचन श्रवण करून त्या दुरात्म्याला इतकी उपरति झाली कीं, त्यानें आपल्याच तरवारीनें आपलें हृदय विदारण करून घेऊन प्राणत्याग केला. इकडे शत्रु-पक्षाकडील एका सैनिकाचा बाण लागून तलहा प्राणास मुकला; त्यामुळें बसऱ्याच्या लोकांचा उत्साह नष्ट होऊन ते पळूं लागले. नंतर पुनः बरेच दिवस युद्ध होऊन शेवटीं विजयलक्ष्मीनें अल्लींना माळ घातली. परंतु विजयानें धुंद होऊन अल्लि विवेकभ्रष्ट झाले नाहींत. पराजित झालेल्या बसऱ्याच्या लोकांना चांगल्या तऱ्हेनें वागविण्याविषयीं त्यांनीं आपल्या सैनिकांनां हुकूम केला आणि युद्धांतली लूट एकत्र करून लढाईंत पडलेल्या सैनिकांच्या वारसानां वांटून देण्याला संमति दिली. तलहा व जोबेयार यांच्या सांगण्यावरून आयेषादेवी उंटावर बसून समक्ष रणक्षेत्रांत आली होती; तिला पाहून अल्लीनीं तिला योग्य तो मान दिला आणि संरक्षणाला जरूर तितकें सैन्य बरोबर देऊन तिची मदिनेला रवानगी केली. या युद्धांत प्रतिपक्षीयांवर सूड उगविण्याची अल्लीनीं मुळींच इच्छा केली नाहीं. आपल्या सदाचरणानें त्यांनीं आपला परिचय सर्वांना करून दिला.

असें असून सुद्धां अल्लीला अजून शत्रु होतेच. खलिफा उस्मान्च्या मृत्यूमुळें बरेच लोक त्यांच्या विषयीं साशंक होते. त्यांना असें वाटत होतें कीं, अल्लीनीं आपल्याला खलिफापद मिळावें ह्मणून आपल्या हस्तकांकडून उस्मान्चा वध करविला. या व इतर अनेक तऱ्हेच्या बातम्या बहुजन समाजांत पसरून, अल्लींचा दुर्लौकिक करून, त्यांच्या विषयीं लोकांचीं मनें कलुषित करण्याचा प्रयत्न चालविला. तसेंच एका दुरात्म्यानें, उस्मान्च्या रक्तानें माखलेलें वस्त्र व त्यांच्या परिवारांतील एका माणसाचें बोट सुरियाचा अधिपति माविया याच्याकडे पाठविलें. हा माविया अल्लींचा कट्टा शत्रु होता. तें रक्तानें माखलेलें वस्त्र व तें तुटकें बोट मावियानें सुरिया येथील मशिदींत नेलें आणि तेथील जमलेल्या सर्व लोकांना तें दाखवून त्यांना असें सांगितलें कीं, उस्मानच्या वधाच्या मुळाशीं अल्लीच आहेत. या हकीकतीनें सुरिया येथील लोक अल्लींवर संतप्त झाले आणि त्याला खलिफा ह्मणून मान देण्याचें त्यांनीं

नाकारिलें. त्यांनीं मावियाला खलिफा नेमिलें, आणि तदनुसार मावियानें दमास्कस येथें खलिफाची गादी स्थापन करून तेथेंच सर्व खिलाफतीचीं कामें करण्याचें ठरविलें. ही बातमी अल्लींच्या कानावर गेली, तरी त्यांचा या गोष्टीवर विश्वास बसेना. त्यांनीं सदर हकीकतीचें पत्र मावियाकडे पाठविलें; परंतु मावियानें संतोषजनक उत्तर न पाठविल्यामुळें, त्याच्या विषयीं संशय वाटून अल्लींनीं ९० हजार सैन्य बरोबर घेऊन माविया विरुद्ध दमास्कसवर चाल केली. अल्लींच्या या सैन्यामध्यें निवडक योद्धे होते; यानींच हजरत महम्मदांच्या वेळीं इतिहासप्रसिद्ध अशा बेदरच्या रणभूमीवर युद्ध केलें होतें.* अल्लींच्या सैन्याची हालचाल ऐकून मावियानें १ लक्ष ६० हजार सैनिक जमविले, आणि त्यांना बरोबर घेऊन तो अल्लींच्या सैन्याची मार्गप्रतीक्षा करीत राहिला. सीफिज प्रांतांत परस्पर सैन्यांची गांठ पडली. परंतु अजूनहि लढाईला तोंड देण्याची अल्लींची इच्छा नव्हती. तह करण्याकरितां मावियाबरोबर पत्रव्यवहार सुरू होता. परंतु त्यांत जेव्हां कांहींच अर्थ दिसेना, तेव्हां लढाई करणें त्यांना प्राप्तच होतें. जवळजवळ एक वर्षभर हें महायुद्ध सुरू होतें आणि त्यांत अल्लींच्या बाजूचे २५ हजार व मावियाच्या बाजूचे २० हजार सैनिक मृत्युमुखीं पडले होते. या युद्धांत हजरतांच्या आवडत्या घोड्यावर बसून व त्यांचेंच लोंकरीचें चिलखत आंगांत चढवून अल्ली युद्धव्यवस्था पहात होते; आणि या युद्धांत त्यांनीं असें युद्धकौशल्य व पराक्रम प्रकट केला कीं, क्रमाक्रमानें मावियाचे सैनिक निरुत्साह व निराश होऊं लागले. युद्ध समाप्तीच्या पूर्व दिवशीं अल्लींच्या सैनिकांत असा उत्साह चढला कीं, ते रात्रीं सुद्धां स्वस्थ बसले नाहींत. पहांटेच्या वेळीं सूर्योदयाबरोबरच अल्लींच्या सैनिकांची जयाशा दुणावत जाऊन त्यांनीं पुनः दुप्पट जोरानें व उत्साहानें लढण्यास प्रारंभ केला. जेव्हां मावियाला पराजयाचीं चिन्हें दिसूं लागलीं, व पाय पाठीमागें पडूं लागला, तेव्हां माविया व उमर नांवाचा त्याचा एक नोकर यानीं एका युक्तीचा अवलंब केला. एकेका सैनिकाच्या संगिनीच्या टोंकाला एकएक

* **टीप**—इसवी सन ६२३ त बरोबर फक्त ३०८ सैनिक घेऊन हजरत महंमदानीं मक्केच्या कोरेश लोकांवर युद्ध केलें. हेंच बेदरचें युद्ध म्हणून प्रसिद्ध आहे. हजरताजवळ वाहन वगैरे सामुग्राहि अगदीं थोडी होती २६० उंट, २ घोडे, ६ चिलखतें आणि ८ तरवारी, एवढ्याच सामग्रीच्या जोरावर हजरतांनीं ९०० कोरेश लोकांचा पराभव केला. याच युद्धांत हजरतांच्याच उंटावर बसून (एका उंटावर दोघे) अल्ली लढाईवर गेले होते.

कुराण ग्रंथ बांधिला व संगिनी वर उंच धरण्याकरितां त्यांना हुकूम देऊन, तो मोठ्यानें गर्जना करूं लागला कीं, "हे मदिनावासी लोकहो! तरवारीच्या सहाय्यानें युद्धाचा निकाल करण्याची इच्छा करूं नका. ईश्वर-निर्मित-ग्रंथाच्या वचनांवर विश्वास ठेवून युद्धापासून परावृत्त व्हा." या युक्तीनें अल्लींचे सैनिक निरुत्साह होऊन परस्परांकडे चकित होऊन पाहूं लागले. डोळ्यांसमोर जिकडे तिकडे कुराणग्रंथ पाहून त्यांच्या हातांतील हत्यारें शिथिल होऊं लागलीं आणि क्रमानें त्यानीं युद्ध करण्याचेंहि सोडलें. कोणी कोणी अल्लींला माविया‌चें श्रेष्ठत्व कबूल करण्याविषयीं उपदेश करूं लागले. अल्लींनीं सर्वांना समजावून सांगितलें कीं, माविया व त्याचा भाऊ उमर यानीं आपसांत बेत करून अशा तऱ्हेनें लोकांना भीति घालण्याची युक्ति योजिली आहे; परंतु कांहीं केल्या सैनिकांची समजूत पडेना. यानंतर अल्लींच्या एका सरदारानें मावियाकडे जाऊन त्याचें पुढारीपण पत्करलें, आणि त्यानें मावियाला असें सांगितलें कीं, माविया जें करीत आहेत तें न्यायसंगत असून, सर्वांनीं मावियाबरोबर सख्य करावें हेंच श्रेयस्कर आहे. असें बोलून तो आपल्या सैनिकांसहवर्तमान मावियाच्या स्वाधीन झाला.* त्यामुळें मावियाबरोबर तह करण्याशिवाय अल्लींना दुसरा मार्गच राहिला नाहीं. अर्थात् तहाच्या अटी कायम करण्याकरितां उभयपक्षांकडून प्रतिनिधी नेमण्यांत आले. पुष्कळ वाटाघाट झाल्यानंतर असें ठरलें कीं, पवित्र कुराणग्रंथ व अवतारी पुरुष महंमद यांनीं घालून दिलेल्या व प्रस्थापित केलेल्या नियमांअन्वयें उभयपक्षांच्या वकिलांनीं एका विशिष्ट ठिकाणीं खलिफाची निवड करावी. ठरल्याप्रमाणें खलिफाच्या निवडणुकीची वेळ जेव्हां नजिक आली, तेव्हां सर्व एकत्र जमले. परंतु मावियाचा भाऊ उमर यानें कपट करण्याच्या बुद्धीनें सर्वांस मेजवानीला बोलाविलें. मेजवानी सुरू असतानांच त्यानें सर्वांस मावियाची निवड करण्याविषयीं आग्रह चालविला. परंतु उमरच्या या गैरवर्तनाबद्दल पुष्कळांना राग आला; तरीहि त्यावेळीं ते कांहीं बोलले नाहींत. परंतु अल्ली मात्र स्वस्थ बसले नाहींत. सुमारें ६५ हजार सैनिक बरोबर घेऊन अल्ली मावियावर चाल करून गेले. इकडे, अल्लींचे सैनिक हे धर्मद्रोही आहेत अशी अफवा खारजिया लोकांनीं

---

* **टीप**—अशा तऱ्हेनें अन्यायानें जे आपण होऊन मावियाच्या स्वाधीन झाले, त्यांना व त्यांच्या वंशजांना "खारजिया" असें नांव मिळालें. आणि अशा तऱ्हेनें अगदीं पहिल्यानेंच मुसलमान लोकांत एक नवीन संप्रदाय निर्माण झाला.

जिकडे तिकडे उठविली. त्यामुळें स्वाभाविकच त्यांचा अलीनां राग आला परंतु त्यांचें कोणतेंहि ह्मणणें ते ऐकत ना. त्यामुळें युद्ध करण्याची जरूर भासूं लागली. तरीहि विनाकारण रक्तपात करण्याची अलीनां इच्छा नसल्यामुळें त्यांनीं आपलें निशाण एका जाग्यावर कायम केलें आणि आपल्या पक्षांतली व परपक्षांतली मंडळी कोणती हें ठरविण्याकरितां ते ह्मणाले कीं, "जे या निशाणाखालीं जमा होतील, किंवा कूफा नगरांत जातील, त्यांना आह्मीं क्षमा करूं." त्यांचें हें भाषण ऐकून पुष्कळ लोक त्यांच्या निशाणाखालीं जमले व कांहीं कूफा नगरांत गेले; तरीहि विरुद्ध पक्षाकडे चार हजार सैनिक शिल्लक होतेच. त्यांजवर हल्ला करून त्यांतील पुष्कळ सैनिकांचा अलीनीं संहार केला, आणि जय संपादन करून आपल्या सैनिकांनां उत्साहित केलें; यामुळें जरी त्यांचें श्रेष्ठत्व कायम राहिलें, तरी मावियाचे सैनिक ठिकठिकाणीं जमून त्यांचें अनहित करण्याच्या उद्योगांत होते. इकडे मिसर वगैरे प्रांतांतील लोकांनीं आपल्या शासनकर्त्या लोकांना पदच्युत करून बंड उभारिलें. या संधीचा फायदा घेण्याचें ठरवून मावियानें युद्धाची तयारी चालविली. याचा परिणाम असा झाला कीं, मावियाकडील कांहीं लोक अलीकडे व अलींचे मावियाकडे जाऊन मिळाले. यामुळें अलींना अतिशय वाईट वाटलें. बरोबर याच वेळीं हेजाज व ईराक येथें युद्धाला सुरुवात झाली. या युद्धांत मावियानें मक्का व मदिना हीं शहरें आपल्या हस्तगत करून घेतलीं आणि तेथल्या रहिवाशांनीं आपले अनुगामी होण्याबद्दल खटपट चालविली; याचा परिणाम असा झाला कीं, अलींचा एक भाऊसुद्धां द्रव्यलोभानें मावियाच्या पक्षाला मिळाला. या सर्व प्रकारांमुळें अलींना भयंकर मनस्ताप होऊं लागला.

वर लिहिलेल्या बंडाला व युद्धाला अलि व माविया हेच कारणीभूत आहेत असें जाणून, इकडे कांहीं मंडळींनीं दोघांनाहि विरोध करण्याचें ठरविलें. त्यांच्या मनानें असें घेतलें कीं, अलि, माविया व मावियाचा भाऊ उमर या तिघांनाहि या जगांतून नाहींसें केल्याशिवाय हीं युद्धें, बंडाळ्या वगैरे थांबणार नाहींत व शांतता प्रस्थापित होऊं शकणार नाहीं. अर्थात् त्यांच्यांतील तीन धाडशी लोकांनीं या तिघांचा वध करण्याची प्रतिज्ञा केली. रमजान महिन्याच्या एका शुभ रात्रींत त्या तिघांचाहि वध करण्याचें त्यांनीं निश्चित केलें. त्यांच्यापैकीं एकजण मावियाचा वध करण्याकरितां दमास्कसकडे निघा-

ला. उमरचा वध करणारा मनुष्य मिसरकडे गेला, आणि तिसरा मनुष्य अल्लींचा वध करण्याकरितां कूफानगरीं गेला. परंतु पहिल्या दोघांचा हेतु तडीस गेला नाहीं. त्याची हकीकत थोडक्यांत सांगतों. त्या पुण्यमय रात्रीं सणानिमित्त सर्व लोक नमाज पढण्याकरितां मशिदींत जातील, हें जाणून माविंयाचा वध करणारा मनुष्य, आपल्या वस्त्राखालीं तरवार लपवून ठेऊन दमास्कस येथील मशिदींत गेला, आणि तेथें मावियावर घाला घालून त्याच्यावर तरवारीचा आघात केला. परंतु तो आघात जोराचा न बसल्यामुळें मावियाचा प्राणांत झाला नाहीं; परंतु त्या मारेकऱ्याला मात्र पळण्याला संधी सांपडली नाहीं आणि तो तेथेंच पकडला जाऊन त्याला त्याच्या कृतकर्माबद्दल देहान्त प्रायश्चित्त देण्यांत आलें. उमरचा मारेकरी आपला दुष्ट हेतु साधण्यासाठीं मिसरांत जाऊन तेथल्या मशिदींत लपून राहिला. परंतु शारीरिक अस्वास्थ्यामुळें उमरला त्या रात्रीं मशिदींत जातां आलें नाहीं. तो इमाम होता यामुळें उपासना चालविण्याचें काम त्याजकडेच होतें. तो न आल्यामुळें त्याचें काम करण्याकरितां दुसरा एक इसम त्याच्या जाग्यावर जाऊन उभा राहिला. तोच इसम उमर आहे, अशा समजुतीनें त्या मारेकऱ्यानें त्याच्यावर तरवारीचा वार करून त्याचा शिरच्छेद केला. परंतु पळण्याला योग्य संधि न मिळाल्यामुळें तो पकडला जाऊन त्याचा वध करण्यांत आला.

अल्लींचा वध करण्याकरितां जो इसम कूफा येथें गेला होता, तो तेथें गेल्यानंतर फातिमा नांवाच्या एका रूपवति तरुणीच्या प्रेमपाशांत अडकला, आणि तिच्याशीं विवाह करण्याविषयीं आतुर झाला. या फातिमेचा बाप युद्धांत अल्लींच्या हातून पूर्वी मरण पावला होता. त्यावेळीं तिनें अशी प्रतिज्ञा केली कीं, जो इसम अल्लींचा वध करील, त्याच्याबरोबरच आपण विवाह करूं आणि त्याला दहा हजार दिरेम नजराण्यादाखल देऊं. ही तिची प्रतिज्ञा त्या दुरात्म्याला जेव्हां कळली, तेव्हां तर तो अतिशय आनंदित झाला आणि आपण उपरिनिर्दिष्ट रात्रीं अल्लींचा वध करितों असें त्यानें तिला कळविलें. योग्य वेळीं फातिमेचे दोन नौकर बरोबर घेऊन तो मशिदींत गेला. यापूर्वी कित्येक दिवस अल्लींना मानसिक यातनांनीं फारच त्रास होत होता. असें सांगतात कीं, जेवणाचे वेळीं त्यांनीं तीन घांसांपेक्षां जास्त जेवण कधीं घेतलें नाहीं, आणि स्वतःच्या घरीं भोजन न करितां कधीं हसन, कधीं हुसेन, कधीं दुसरा एखादा मुलगा यांच्याकडे ते जेवणाला जात; आणि

त्यांना सांगत कीं, आपला अंतकाळ समीप आला आहे. अर्थात् थोडक्याच दिवस मी तुमच्या पाहुणचाराचा स्वीकार करीन. त्यांच्या वधाच्या दिवशीं त्यांचें चित्त अतिशय चंचल झालें, आणि मशिदींत जावें कीं नाहीं, याचा निर्णय बराच वेळ त्यांना करितां आला नाहीं. नंतर आपल्या मनाला स्थिर होण्याविषयीं त्यांनीं उपदेश केला. "मृत्यूच्या तडाक्यांतून कोणालाहि कोणत्याहि उपायानें सुटतां यावयाचें नाहीं;" असें वारंवार ह्मणून त्यांनीं गांभीर्य धारण केलें. नंतर ते जेव्हां मशिदींत गेले, तेव्हां निघतांना दारांतच हंसपक्षी आडवे आले, आणि आर्तस्वरानें ओरडूं लागले. त्यांना उगीच बसविण्याकरितां त्यांच्या नोकरांनीं काठ्या उगारिल्या, तेव्हां अल्लींनीं त्यांचें निवारण करून त्यांना सांगितलें कीं, "माझ्या भावि विरहामुळें ते शोकाकुल झाले आहेत. अर्थात् त्यांना मारणें बरें नाहीं." अल्लीनीं मशिदींत प्रवेश करण्यापूर्वींच तो दुरात्मा मशिदींत जाऊन बसला होता. अल्ली दरवाज्यांतून आंत येतांच फातिमाच्या एका नोकरानें अल्लींना अनुलक्षून आपली तरवार फेंकली, परंतु त्याचा नेम चुकल्यामुळें, मुख्य मारेकऱ्यानें अल्लींच्या मस्तकावर तरवारीचा आघात केला; त्यामुळें त्यांना भयंकर जखम झाली. तेव्हां मारेकरी प्राणभयानें मशिदींतून पळून गेला, परंतु थोड्याच वेळांत शहरच्या रस्त्यांत तो पकडला गेला. आपण जिवंत असेपर्यंत त्या मारेकऱ्याला शिक्षा करूं नको, असें अल्लीनीं आपल्या पुत्रांना निक्षुन बजाविलें होतें; आणि जोंपर्यंत आपल्या देहांत प्राण आहे, तोंपर्यंत त्या मारेकऱ्याचे अन्नपाण्याची व्यवस्था करण्यास सांगितलें. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर तावडतोब त्या मारेकऱ्याचा वध करण्यांत आला.

सुमारें पांच वर्षेपर्यंत खलिफापदाचा उपभोग घेऊन हिजरी सनाच्या ४० व्या वर्षी आणि इसवी सन ६६२ त, त्यांच्या वयाच्या ६३ व्या वर्षी अल्लि मूर्तुजांचा एका गुप्त मारेकऱ्याच्या तरवारीनें अंत झाला. ज्यांनीं अनेक युद्धांत निःसीम पराक्रम प्रकट करून हजरत महंमदांची स्तुति व प्रीति संपादन केली होती, त्यांना एका मारेकऱ्याच्या तरवारीनें मृत्यु आला, यांतील रहस्य काय असेल बरें ?

प्रकरण सहावें.

खलिफायेत् किंवा खिलाफत.

अलिमूर्तजा यांच्या मृत्यूनंतर इस्लामधर्मावलंबी लोकांच्या नेतृत्वाचा मान 'माविया'कडे आला. खलिफापदावर आरूढ झाल्यानंतर त्यांनीं खिलाफतीचें मुख्य पीठ मदिनाहून दमास्कस येथें नेलें. सुमारें शंभर वर्षेपर्यंत खलिफाचा अधिकार माविंयाच्या वंशजांकडे चालला. इतिहासांत "अम्मियादवंश" या संज्ञेनें त्याचा उल्लेख आहे. मुत्सद्दीपणा व बाहुबल यांच्या जोरावरच 'माविया'ला खलिफापदाचा लाभ करून घेतां आला. परंतु कांहीं मुख्य पुढाऱ्यांनीं जर त्याच्या नेतृत्वाला संमति दिली नसती, तर तो खलिफापदावर आरूढ झाला असता किंवा नाहीं याची शंकाच आहे. परंतु हें निश्चित आहे कीं, मावियाला खलिफापदावर नेमण्याला बहुजनसमाजाची संमति नव्हती. आणि यामुळेंच त्याच्या कारकीर्दींत खलिफापदाकरितां इस्लामी लोकांत परस्परांमध्यें भांडणास सुरवात झाली व अनेक युद्धप्रसंग होऊन पुष्कळ रक्तपातही झाला. परंतु तो इतिहास या ग्रंथांत वर्णन करण्याचा मानस नाहीं. खलिफापद निर्माण कसें झालें व त्यावर असणाऱ्या खलिफांविषयीं लोकमत काय होतें व त्यांच्या अंगचा साधेपणा, क्षमता इत्यादि गुणांनीं इस्लामियांकडून सन्मान व श्रद्धा त्यांना कशीं प्राप्त झालीं, हें दाखविण्याचा प्रस्तुत पुस्तकाचा हेतु आहे. आतां या सर्व गोष्टींचें थोडक्यांत विवरण करून या पुस्तकाचा उपसंहार करणार आहों.

हजरतमहंमदांनीं धर्मप्रचाराबरोबरच जरी राष्ट्र-संस्थापना केली, तरी त्या राष्ट्राचें आधिपत्य वंशानुसार चालावें, अशी केव्हांहि त्यांची मनीषा नव्हती. त्यांच्या परलोकयात्रेच्या वेळीं जी व्यवस्था झाली, त्यावरून हा बोध सहजच होतो.

आपल्या मृत्युसमयीं त्यांनीं पूर्ण विचार करून, शिष्यांचें कर्तव्य काय आहे याविषयीं मात्र शिष्यवर्गाला उपदेश केला; परंतु त्यांच्या पश्चात् खलिफाच्या गादीवर कोणी बसावें याविषयीं सर्वांनीं त्यांच्या जवळ पुनः पुनः पृच्छा केली असतांहि त्यांनीं या प्रश्नाला संतोषजनक उत्तर केव्हांहि दिलें नाहीं. सर्वांना ज्याच्याविषयीं पूज्यबुद्धि वाटेल व ज्याचें नेतृत्व एकमतानें

कबूल केलें जाईल त्यानेंच 'स्थलाभिषिक्त' किंवा 'खलिफा' व्हावें अशी जर त्यांची मनापासून इच्छा नसती, तर त्यांनीं आपल्या नातलगांपैकीं किंवा शिष्यवर्गापैकीं एकाद्याला आपल्या जाग्यावर अभिषेक करण्याविषयीं आज्ञा केली असती. प्रेरित महापुरुषांच्या (हजरतांच्या) आदर्शानुसार त्यांचे प्रमुख शिष्योत्तम अबुबकर किंवा उमर यांपैकीं कोणीहि आपल्या वंशजांनीं खलिफा व्हावें अशी इच्छा केली नाहीं. यावरून हें उघड आहे कीं, लोकमताला अनुसरूनच खलिफाची नेमणुक व्हावी, अशी इस्लाम-धर्म-प्रवर्तकांची व नेत्यांची इच्छा होती.

हजरत महम्मदांनीं जशी राष्ट्रस्थापना केली, तशीच सुरवातीपासून राष्ट्राला संरक्षक व पोषक अशी नियमव्यवस्थाही केली होती. त्यांनीं स्थापित केलेली नियमबद्ध व्यवस्था कालांतरानें विस्तारित होऊन नंतर दृढतर झाली. परंतु त्यांनीं केलेल्या व्यवस्थेचें केव्हांहि पूर्ण रूपांतर झालेलें नाहीं. सामाजिक, नैतिक किंवा इतर कोणतीहि बाब काय, किंवा शासनपद्धति काय, हीं सर्व धर्माच्या खंबीर पायावर उभारलीं असल्यामुळें, कोणीहि जरी पवित्र कुराणग्रंथाचें अध्ययन करून त्यांतील मर्म जाणलें, तर त्याला असेंच आढळून येईल कीं, सर्व गोष्टींचें नियंत्रण होण्याकरितां प्रथमपासूनच काळजी घेतली गेली होती. आद्य मुसलमानी धर्माच्या नेत्यांनीं व्याकरणशास्त्र व भाषाकोश (Dictionary) तयार करण्याकडे लक्ष पुरविलें; आणि तसेंच लोकांत मुखोद्गत व प्रचलित असलेल्या प्राचीन गद्यपद्यात्मक वचनांचा संग्रह करून तीं एकत्र लिहून काढिलीं. तेव्हांच धर्मतत्वाची व्याख्या करणारे अनेक ग्रंथ प्रकट झाले व इराक, बसोरा (बसरा) व कूफा इत्यादि ठिकाणीं धर्मवेत्त्यांनीं सदर ग्रंथांतील तत्वांचें विवेचन केलें. इस्लामधर्मप्रवर्तकांनीं प्रथमारंभीं केवळ युद्धें करूनच जुलमानें त्या धर्माचा प्रसार केला, असें पुष्कळांना वाटतें; परंतु ही समजूत केवळ भ्रांतिमूलक आहे. प्राचीनकालीं ज्यांनीं प्रजातंत्र-शासनपद्धति प्रचलित केली, ते स्वतः ज्ञान, नीति, शासनपद्धति, आणि विचार-व्यवस्था इत्यादि बाबतींत अनभिज्ञ किंवा उदासीन होते हें ह्मणणें केव्हांहि व्यवहार्य नाहीं.

प्रथमच्या खलिफांच्या नेतृत्वकालीं उपरिनिर्दिष्ट व्यवस्थासमूह बीजरूपानें प्रचलित असलेला दृष्टीस पडतो; परंतु कालांतरानें त्याचा इतका विकास झाला कीं, त्याच्या प्रभावानें इस्लामी-सुधारणा बऱ्याच कालपर्यंत

जगताला आदर्शभूत झाल्या. लोकप्रतिनिधींतील मुख्य मुख्य पुढाऱ्यांचे विचारानेंच खलिफांची निवडणूक होत असे, याचें विवेचन पूर्वीं झालेंच आहे. निवड झाल्यानंतर देशवासीयांनीं निवडलेल्या व्यक्तीचें अनुकरण करण्याचें कबूल करीपर्यंत निवडलेल्या इसमाला खलिफापदाचे अधिकार चालविण्यास परवानगी नसे. बहुजनसमाजाच्या या कबुली जबाबाला "बाईया" असें नांव असे. अशा तऱ्हेनें खलिफा गादीवर आरूढ झाल्यानंतर, सांसारिक किंवा आध्यात्मिक सर्व बाबतींतील सर्वाधिकार त्यांजकडे सोंपविले जात असत. प्रमुख धर्माध्यक्ष, प्रमुख सल्लागार व प्रमुख शासक अशा तीनहि अधिकारांची प्राप्ती एकसमयावच्छेदेंकरून खलिफांना होत असे. क्रमानें जसजसा इस्लामी राज्याचा विस्तार होत गेला, तसतशी खलिफांना आपले निरनिराळे ठिकाणीं प्रतिनिधि नेमण्याची जरूरी भासूं लागली. या सर्व प्रतिनिधींना "आमिल" किंवा बहुवचनानें "ओम्माल" अशी संज्ञा होती. राष्ट्राच्या सुव्यवस्थेकरितां जे कर वसूल केले जात, त्यांचे निरनिराळे प्रकार होते. प्रथमतः प्रत्येक मुसलमान आपल्या उत्पन्नाचा एकदशांश सार्वजनिक राष्ट्रीय कोशांत (यालाच "बायेत्-अल्-माल" असेंहि ह्मणत.) भरण्यास बांधलेला असे. या कराला "जाफत्" असें नांव होतें. या कराच्या रकमेपैकीं कांहीं भाग दारिद्र्यानें पीडिलेल्या लोकांचें भरणपोषण करण्याकडे खर्च केला जात असे. वर्तमानकालीं सुधारलेल्या देशांत Poor rate या नांवाचा जो कर अस्तित्वांत आहे, त्याच प्रकारचा हा "जाफत्" नांवाचा कर होता. मुसलमानी धर्माचें अवलंबन न करणारे असे जे यहुदी, ख्रिश्चन वगैरे प्रजाजन होते, त्यांजकडून "जिजिया" या नांवाचा व्यक्तिगत कर घेतला जात असे (यालाच भू-राजस्व ह्मणत). यालाच "खारज" असें ह्मणत. या शिवाय युद्धांत जी सम्पत्ति हस्तगत होई, त्याचा पंचमांश "बायेत्-अल्-माल्" (राष्ट्रीय धनभाण्डार) यांत जमा होत असे व बाकीची संपत्ति योद्ध्यांत व सैनिकांत समप्रमाणांत विभागिली जात असे. राजभाण्डारांतील अर्थव्ययाविषयींची अनियंत्रित सत्ता खलिफांना असे. युद्धकार्य, शासनकार्य किंवा लोकोपयोगी कार्यें या सर्व बाबतींत खलिफांच्या इच्छेनुसारच खर्च होत असे. प्रथमावस्थेंत मुसलमान लोकांना मात्र, राजभाण्डारांतून साहाय्य केलें जात असे. हें अर्थसहाय्य मिळविण्याच्या आशेनेंच पुष्कळ लोक त्यावेळीं इस्लामी धर्माची दीक्षा घेत; अशीं उदाहरणें बरींच होतीं. राज्यांतील जमिनींपैकीं कांहीं ठराविक भाग

सरकारी जमीन ह्मणून समजला जात असे. या सरकारी जमिनींपैकीं कांहीं ठराविक भाग घरीं पाळलेल्या गुरांच्या (उंटांच्या) चरणाकरितां राखून ठेवण्यांत आला होता. उमर खलिफापदावर असतांना, चाळीस हजार उंटांना पुरेशी सरकारी जमीन गुरचराई करितां राखून ठेवण्यांत आली होती. यावरून राज्यांत सरकारी जमीन किती होती याची बरीच कल्पना होणार आहे. विधर्मी लोकांकडून कर घेण्याच्या बाबतींतहि एक विशेष नियम होता. खलिफा उमर यांच्या कारकार्दीत श्रीमंत यहुदी व ख्रिश्चन लोकांना दर वर्षी चार 'दिनार' ह्मणजे सुमारें १६ रुपये कर द्यावा लागत असे. मध्यस्थितींतील लोकांना दोन दिनार व गरीब लोकांना दरसाल एक दिनार कर द्यावा लागे. याशिवाय वेळोवेळीं त्यांना सैन्याकरितां चारपेंढी व इतर खुराक यांची तजवीज ठेवावी लागत असे. सरकारी जमिनींचे 'लागवडीची' व 'ओसाड' (बिन लागवडीची) असे दोन भाग असत.

राज्यविस्ताराबरोबर उपरिनिर्दिष्टकरांचेंहि प्रमाण वाढत चाललें, त्यावेळीं एक कोशाध्यक्ष (Treasurer) पाहिजे असें वाटूं लागलें. खलिफा उमर यांनींच प्रथम कोशाध्यक्ष नेमण्यास सुरवात केली. पहिल्या पहिल्यानें अरब लोकांमध्यें लिहिण्या वाचण्याकडे विशेष प्रवृत्ति दिसून येत नव्हती; यामुळें कोशागारावरील अधिकारी व नोकर ग्रीक व पारशी लोकांतून निवडिले जात असत. हजरत महम्मदांच्या आप्तवर्गाला सर्वसाधारण भाण्डारांतून तनखा मिळण्याची व्यवस्था उमरांनीं सुरू केली. हजरत महम्मद यांची प्रियतम (पट्टराणी) पत्नी आयेषा हिला प्रतिवर्षी १२ हजार 'दिरेम्' ह्मणजे सुमारें ५००० पांच हजार रुपये मिळत असत, व त्यांच्या इतर बायकांना १०००० दहा हजार दिरेम् किंवा ४००० रुपये मिळत. हजरतांच्या परिवारवर्गापैकीं इतर मंडळींनांहि त्यांच्या त्यांच्या हजरतांशीं असलेल्या संबंधाचे मानानें मदत मिळत असे. मक्का व मदिना येथील ज्या लोकांनीं अगदीं प्रथम इस्लाम धर्माची दीक्षा घेतली, त्यांना सुद्धां वार्षिक सहाय्य दिलें जात असे. त्यांना प्रतिवर्षी पांच हजार दिरेम् किंवा दोन हजार रुपये देत असत. स्वतः उमर हेहि इतकीच वृत्ति घेत असत.

साधारणपणें कोरेशवंशांतील कोणीतरी खलिफाचे गादीवर बसविला जात असे. खलिफाचे जागीं ज्याची निवड प्रतिनिधि करीत, त्याला सर्व साधारण जन-समूहानें मान्यता द्यावयाची. दरम्यान त्यानें योग्यरीतीनें आपलें

कर्तव्य करीत रहावें लागत असे. व त्याचेबद्दल खात्री झाल्यानंतरच सर्व लोक अशा निवडलेल्या खलिफाशीं इमानी रहाण्याबद्दल प्रतिज्ञाबद्ध होत असत. धर्मरक्षण, मुसलमान राज्याचें संरक्षण, प्रत्येक बाबतींत निर्णायक सल्ला देण्याचा अधिकार, विधर्मी लोकांचें दमन करणें, व राष्ट्रीयधनभाण्डाराचें संरक्षण आणि त्यांतून यथानियमानें खर्च करणें हीं सर्व कामें खलिफांनीं करावयाचीं असत. खलिफा जर आपलें कर्तव्य करण्यास असमर्थ होईल, तर त्याला विरोध करणें हा मुसलमानांत दोष मानला जात नसून तें कर्तव्य आहे असें समजलें जातें. परंतु जोंपर्यंत ते आपलें स्वकर्तव्य करितील, तोंपर्यंत सर्वांनीं अवनत मस्तकानें त्यांची प्रत्येक कृति मान्य करून त्यांच्या आज्ञा शिरसावंद्य केल्या पाहिजेत असा नियम आहे.

प्रथमतः मदिना हें खलिफाचें मुख्य पीठ होतें. मावियानें स्थलांतर करून खिलाफतीची गादी दमास्कस येथें नेली. त्यानंतर निरनिराळ्या खलिफांच्या अमदानींत खिलाफतीची गादी बगदाद, मिसर देश, आणि तुर्कस्थानांतील कॉन्स्टँटिनोपल येथें नेण्यांत आली. परंतु त्यामुळें खलिफाच्या अधिकारांत कोणताहि व्यत्यय आला नाहीं. ज्या ठिकाणीं जो खलिफापदावर आरूढ असे, त्याला मुसलमान लोक आपला आध्यात्मिक व सांसारिक सर्वाधिकारी मानीत आणि त्यांचा हुकूम शिरसावंद्य करीत असत. खरोखर जेव्हां खलिफा कर्तव्यच्युत होतात, तेव्हां त्यांना विरोध करणें किंवा त्यांना पदच्युत करणें, हे अपराध आहेत असें केव्हांहि मानिलें जात नसे. यावरून हें निष्पन्न होतें कीं, महम्मदी लोक खलिफाला जो मान देत, तो व्यक्तिविषयक नसून खलिफापदाचा अधिकार, त्यांचें पावित्र्य, त्यांची कर्तव्यनिष्ठा इत्यादि सद्गुणांमुळेंच मुसलमान लोक त्यांना आपला नेता असें मानीत आणि त्यांच्याविषयीं पूज्यभाव प्रकट करीत. आपलें काम अतिशय वाढलें असून तें एकट्याला करितां येणार नाहीं, असें जेव्हां खलिफांना वाटत असे, त्यावेळीं त्यांना आपले मंत्री किंवा प्रतिनिधि यांजकडे आपल्यापैकीं कांहीं काम सोंपवितां येत असे. हे प्रतिनिधि खलिफांनीं नेमून दिलेलें काम करण्यास पूर्णाधिकारी असत. परंतु खलिफांच्या पश्चात् कोणी खलिफांच्या गादीवर बसावें हें ठरविण्याचा हक्क त्यांना नसे. एकंदरींत इस्लामाच्या एकंदर नियमव्यवस्थेंत असें आढळून येतेंकीं, प्रजासत्तेचें तत्व प्रत्येक बाबतींत बीजभूत अर्थात् आधारभूत होतें.

आह्मीं पूर्वी सांगितलेंच आहे कीं, खलिफा हे इस्लामीयांचे केवळ मुख्य पुरोहित आहेत एवढेंच नव्हे, तर ते एकसमयावच्छेदेंकरून त्यांचे सम्राट्, व धर्मगुरु होत. तसेंच ते इस्लामीयांच्या आध्यात्मिक व सांसारिक बाबतींत त्यांचे संरक्षणकर्ते सर्वाधिकारी होत. अर्थात् रोमन कॅथॉलिक ख्रिश्चन पोपांप्रमाणें (शंकराचार्यांप्रमाणें) लोकांच्या पापपुण्याचा विचार करावयाचा व इच्छेनुरूप त्यांना पापांतून मुक्त करावयाचें हें त्यांचें काम नव्हे. ते सर्वसाधारण इस्लाम राष्ट्रांचे राष्ट्र नायक होत. ते श्रद्धावान् धर्ममंडळींचे सेनापति होत. ते ईश्वरावर पूर्ण विश्वास ठेवणाऱ्या सर्व जनसमाजाचे पुढारी होत. समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर आपला ताबा ठेवून त्याला आपलें अनुकरण करण्यास लावण्याची त्यांच्यामध्यें योग्यता असे. यामुळें इस्लामधर्मानुसार खलिफांची गादी व खलिफाचा अधिकार हीं विभागणी करण्यासारखीं नाहींत व त्यांचें अतिक्रमण करणें हें अत्यंत अश्लाघ्य होय.

या ठिकाणीं एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे ती अशी कीं, ज्यावेळीं खलिफा अलि यांजबरोबर मावियानें तंटा केला, त्यावेळीं ज्या बारा हजार लोकांनीं खलिफाचा त्याग करून मावियाचा आश्रय केला, त्यांना 'खाजरिया' किंवा पथकभ्रष्ट असें नांव प्राप्त झालें. क्रमानें त्यांचें पुढें एका प्रबल सांप्रदायांत रूपांतर झालें. खलिफा किंवा खलिफांचे प्रतिनिधि 'इमाम' यांना कोणत्याहि तऱ्हेनें मान देणें आवश्यक आहे असें या 'खाजरिया' लोकांना वाटत नसे. तसेंच त्यांची निवड करणें जरूर आहे असेंहि त्यांना वाटत नसे. खलिफाविषयीं त्यांना अश्रद्धा वाटण्याचें कारण फक्त एकच होतें, तें असें कीं, फक्त कोरेश वंशापैकींच मनुष्य खलिफापदाला अधिकारी आहे, हें त्यांना कबूल नव्हतें. त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, 'मनुष्याच्या गुणांचा व लायकीचा विचार करूनच जर खलिफा नेमावयाचा, तर मग वंशाचा विचार करण्याचें कारण नाहीं. जो त्या कार्याकरितां योग्य ठरेल, त्यालाच खलिफा होण्याचा अधिकार आहे.' या खाजरिया सांप्रदायांतील लोकांनीं माविया व त्यानंतरचे खलिफा यांना अतिशय त्रास दिला. परंतु शेवटीं त्यांना एशिया खंडांतून पिटाळून लावण्यांत आलें. नंतर ते आफ्रिकेंत गेले व तेथें त्यांनीं आपला सांप्रदाय वाढविण्याची विशेष खटपट केली.

खाजरिया लोकांच्या पलायनानंतर, इस्लामधर्मीयांत 'राफेजिया,' 'कदरिया' प्रभृति अनेक सांप्रदाय निर्माण झाले. जे प्रथम, द्वितीय व तृतीय (खलिफा,

अबुबकर, उमर व उस्मान्) यांच्या मतानें चालत, त्यांना सुनी (सोन्नी) असें नांव होतें; आणि पहिले तीन खलिफा व हजरतांचे इतर शिष्य यांपेक्षां फक्त अल्लि मूर्तुजा व त्यांचे वंशज यांना जे मान देणारे व त्यांच्या पूर्ण तंत्रानें चालणारे होते, त्यांना 'शिया' हें नांव प्राप्त झालें; या शिया सांप्रदायामध्येंहि नंतर अनेक लहान पंथ निर्माण होऊन, त्या प्रत्येक पंथाच्या नेतृस्थानीं निरनिराळ्या इमामांची (खलिफांचे प्रतिनिधि) योजना झाली. व या प्रत्येक इमामावर त्यात्या पंथांतील लोक पवित्रपणाचे व अवतारित्वाचे आरोप करीत असत. एकेकाळीं या शियासांप्रदायाची वृद्धि सर्व पारसिक (Persia) देशांत झाली होती. या शियासांप्रदायाचें मत असें होतें कीं, 'खलिफा अल्लि (मूर्तुजा) व त्यांचे वंशज यानां मात्र खलिफाचे गादीवर बसण्याचा अधिकार आहे.' एकदां तर यांच्यांत 'अवतारवाद' 'द्वैतवाद', आणि 'ज्ञानवाद' इत्यादि धर्ममतांचा विशेष पगडा बसला होता, असें आढळून येतें. व एकदांतर, खलिफा अल्लि (मूर्तुजा) हयात असतानांच, अबदल्ला नांवाच्या एका इस्लामधर्म ग्रहण केलेल्या यहुद्यानें, अल्लि हे ईश्वरावतार आहेत, या मताचा प्रसार करण्यास सुरवात केली. परंतु जेव्हां ही गोष्ट अल्लींच्या कानांवर गेली, तेव्हां त्यांना अत्यंत वाईट वाटून त्यांनीं या मताचें दमन करण्याविषयीं बरीच खटपट केली; तरीहि या 'अवतारवादाचें' समूळ उच्चाटण करण्यास ते समर्थ झाले नाहींत. शियासांप्रदायांतील एका पंथाचे लोक फार पूर्वींपासून अल्लिच्या वंशजानां ईश्वरावतारी मानतात.

आतां सुनी (शोन्नि) सांप्रदायाचें म्हणणें असें कीं, 'हजरत व त्यांचे शिष्य यांच्या वंशांतील प्रत्येक जण मोठा, व त्यांच्या हातून चूक होणें शक्य नाहीं व ते निष्पाप होत,' हें म्हणणें त्यांना मान्य नाहीं. त्यांच्या मताप्रमाणें इस्लामधर्मांत जाति किंवा वर्णवैषम्य असणें शक्य नाहीं. हजरत महम्मदांच्या उपदेशानुसार जो भगवन्ताची भक्ति करितो, व भगवन्तांचें भय बाळगून वागत असतो, तोच श्रेष्ठ व तोच बड्या अधिकाराला योग्य; व तोच खरा कुलीन होय. हा नूतन आभिजात्य वाद (कुलीनत्वाचा) स्थापन करण्याकरतांच जगांत इस्लामांचा अवतार झाला. अर्थात् खिलापतीचा अधिकार कोणत्याही विशिष्ट देशांत असणें अनवश्यक होय. हजरतांच्या वेळीं अरब लोकांतील कोरेश वंशांत प्रभुशक्ति उत्पन्न झाली; या कारणानें त्यावेळीं खलिफापद त्या वंशाकडे चाललें. या कोरेश लोकांनीं जेव्हां इस्लाम धर्माची दीक्षा घेतली, तेव्हां

त्यांच्यांत हजरत महम्मद हेच श्रेष्ठ पुरुष होते; यामुळें राष्ट्र व धर्म यांचा सर्वाधिकार त्यांच्या हातांत होता. त्यांचे स्थलाभिषिक्त पुरुष त्यांच्या दृष्टांताप्रमाणें वागत व त्यामुळें ते श्रेष्ठ होते आणि ह्मणूनच त्यांना खलिफापदाचा अधिकार प्राप्त झाला. परंतु कोरेश वंशीयांपेक्षां इतर आरबवंशीय लोक कमी दर्जाचे आहेत असें हजरतांनीं केव्हांहि दिग्दर्शित केलेलें नाहीं. यासाठीं कोरेशवंशीयच जास्त श्रेष्ठ हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. ते सर्वांना समदृष्टीनें लेखीत होते, हें हजरतांच्या स्वतःच्या उद्गारांवरूनच समजून येणार आहे. मक्केची शेवटची यात्रा करून मदिनेला परत आल्यानंतर, एकदां नमाज मंदिरांत जमलेल्या मंडळीला हजरतांनीं हृदयस्पर्शी व सत्यपूर्ण उपदेश केला तो असा:—

"विश्वासु (फक्त एक ईश्वराला मानणारे) मंडळीहो! तुमचा ईश्वर एकच व पिताहि एकच होय. तुह्मी सर्व आदमच्या वंशापासून उत्पन्न झालां आहां, आणि आदमला या पृथ्वीच्या मृत्तिकेंतून जन्म मिळाला आहे. लक्षांत ठेवा, तुमच्यामध्यें जो अत्यंत ईश्वरपरायण असेल, तोच परमेश्वराच्या दृष्टीनेंहि सर्वांत श्रेष्ठ पुरुष समजला जातो. आरबवंशीय नसून सुद्धां जर कोणी त्यांच्यापेक्षां जास्त ईश्वरपरायण असेल, तर तोच मनुष्य आरबवंशियांपेक्षां जास्त श्रेष्ठ समजला जाईल." अन्यत्रहि त्यांनीं असे उद्गार काढिले आहेत कीं, "जोंपर्यंत कोरेश लोक विचारासनावर बसून न्यायविचारानें वर्ततील, आपल्या प्रतिज्ञा पालन करितील, आणि त्यांच्याजवळ कोणींहि दयेची याचना केली असतां त्याजवर दया करितील, तोंपर्यंतच त्यांच्यामधून खलिफा किंवा इमाम निवडिले जातील." हजरतांच्या या सर्व उक्ति आणि पवित्र कुराणग्रंथाचा पुढील आयेत् "पृथिवी परमेश्वराची व धर्मात्मे हेच त्याचे वारस",— स्पष्टरूपानें साक्ष देत आहेत कीं, खलिफा-पद ही कोणत्याहि जातीची किंवा वंशाची अनियंत्रितपणानें उपभोगण्याची मिळकत नव्हे.

प्रथम खलिफा अबुबकर यांच्या वेळेपासून आज मितीपर्यंत खिलाफत् किंवा खलिफांचें शासनकेंद्र कोणकोणत्या ठिकाणीं अधिष्ठित होतें, आणि शेवटीं कोणत्या कारणानें त्याचें तुर्कस्थानांत स्थलांतर झालें, याचें पुढें विवरण करून आह्मी या पुस्तकाचा उपसंहार करणार आहों.

ॐ

उपसंहार.

प्रथम खलिफा अबुबकर यांच्या वेळेपासून तृतीय खलिफा उस्मान् यांच्या मृत्युकालापर्यंत, इसवी सन ६३२ पासून ६६१ पर्यंत, तीस वर्षें खलिफांचें शासनकेंद्र मदिना हें होतें. हजरतमहंमद मक्का येथील कोरेशवंशीय होते; परंतु त्यांनीं मदिनाचा आश्रय केल्यामुळें, त्याचस्थानाला धर्मप्रचार व राज्यशासन यांच्या प्रधान केंद्रस्थानाचा मान पटकावितां आला. या कालीं सर्वसाधारण व प्रजाशासन पद्धतींचा इस्लाम हा आदर्श होता. चतुर्थ खलिफा अलि यांचें जेव्हां मावियाबरोबर युद्ध झालें, आणि नंतर उभयतांत संधि झाला, तेव्हां मेसापोटेमियांतील 'कूफा' शहरीं खिलाफतीचें स्थानांतर झालें. त्यांच्या मृत्यूनंतर कोरेशवंशीय ओम्मिय शाखेंत जन्म पावलेले माविया खलिफा-पदावर आरूढ झाल्यानंतर 'सुरिया' प्रांतांतील मुख्य शहर दमास्कस येथें त्यांनीं खिलाफतीचें केंद्रस्थान स्थापन केलें. सुरियाचा शासनकर्ता ह्मणून दमास्कस येथें राहून पुष्कळ लोकांना आपलें अनुकरण करण्यास ते भाग पाडित असत. यामुळेंच खिलाफतीचेंहि स्थानांतर तेथेंच करण्यांत आलें. इसवी सन ६६१ पासून ७५० पर्यंत दमास्कस येथें खिलाफतीची गादी होती. मावि-याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र 'आजिद' यानें खलिफाची जागा मिळविली—परंतु अबुबकर, उमर, उस्मान् व अलि यांच्या वंशजांनीं त्यांचें अनुकरण केलें नाहीं. खलिफाची गादी वंशपरंपरा चालावी ह्मणून त्यानें खटपट केली, आणि आपल्याला मुसलमानांचा राजा ह्मटला जावें असाहि त्यानें उद्योग केला. परंतु हजरत महम्मदाचा नातू (मुलीचा मुलगा) व खलिफा अलि यांचा पुत्र होसयन (हुसेन) यानें त्याला विरोध करण्यांत पुढाकार घेतला. प्रजानुवर्ती खिलाफत् राजतंत्राधीन होऊंनये, या सदिच्छेनें प्रेरित होऊन (ईश्वराचे ठिकाणीं) विश्वासू पराक्रमी आणि दुर्धर्ष अशा फक्त १२ जणांना बरोबर घेऊन हुसेन (होसयेन) आजिदच्या विशाल सैन्याबरोबर-युद्ध करण्यास प्रवृत्त झाला. अशा युद्धांत परा-भव खात्रीनें होणार हें जाणून सुद्धां केवळ कर्तव्यानुसार, आणि खिलाफत बिनधोक प्रजानुवर्ती रहावी ह्मणून ' हुसेन ' ' कारबाला ' येथील रणक्षेत्रावर प्राणविसर्जन करून इहलोकीं अक्षय कीर्ति व परलोकीं अक्षय स्वर्गसुख

मिळविता झाला. हुसेनच्या या अमानुषी (दिव्य) कृत्याचे स्मरणार्थ शिया-सांप्रदायी लोक अद्यापिहि मोहरमच्या सणांत शोक करितात. जरि हुसेनला युद्धांत जय मिळाला नाहीं, तथापि खलिफाची निवड होतांना एकदांसुद्धां जनमताची उपेक्षा झाली नाहीं. वास्तविक प्रथमारंभीं ज्या रीतीनें खलिफाची निवड केली जात असे, त्या रीतींत अजिदच्या वेळीं फरक झाला होता. निवड करण्याचा मुख्य हेतु व प्रकार बाजूला राहून, निवड करणें हा एक रिवाज आहे अशादृष्टीनें ही वहिवाट अस्तित्वांत राहिली. परंतु नंतरचे सर्व खलिफा समग्र मुसलमान सांप्रदायांतील धर्म व स्वार्थ यांचें संरक्षण करण्याविषयीं दक्ष असत, व स्वधर्मीयांची श्रद्धा व सन्मान हीं ते प्राप्त करून घेत. ओम्मिय-वंशानंतर (नष्टझाल्यावर) खलिफाचा अधिकार 'आब्बासीवंशीया' कडे गेला. हे आब्बासीवंशीय मूळचे अलींच्या वंशांतील होत. हजरतांच्यावंशा-कडे पुनः खलिफापदाचा अधिकार येईल, अशा विषयीं हजरतांची भविष्य-वाणी होती असें ह्मणतात. या आब्बास वंशांतील मंडळीकडे इसवी सन ७५० पासून १२५८ पर्यंत सु० ५०० वर्षे खलिफाचा अधिकार चालत होता. त्यांनीं खिलाफतीचें मुख्य पीठ बगदाद येथें नेलें. या आब्बासी वंशांतील शेवटचे खलिफा 'मोस्तासिन्' यांच्या कारकीर्दींत तार्तार लोकांनीं पश्चिम आशिया (खंडांतील मुलूख) जिंकण्याची विशेष खटपट केली. चेंगीस् (जंगीस) यांचा वारस हुलाण्ड ससैन्य बगदादवर चाल करून आला आणि तेथें विजय संपादन करून आपली जयपताका बगदादवर फडकाविली आणि मोस्ता-सिन्चा वध करून मिसर आणि भारतवर्ष खेरीज करून बाकी समस्त इस्लामीयांचा अधिकार त्यानें नामशेष केला. आब्बासी वंशाच्या या पराजया-नंतर कांहीं दिवसपर्यंत खिलाफतीची अवस्था फारच शोचनीय झाली होती. तार्तारांच्या विजयानंतर तीन वर्षांनीं, आब्बास वंशांतील एका पुरुषानें खिला-फतीचा पुनरुद्धार करण्याची खटपट केली. तार्तारांच्या स्वारीच्या प्रसंगीं यानें मिसर देशांत पलायन केलें होतें. परंतु या प्रयत्नांत त्याला यश आलें नाहीं. पुढें त्याच वंशांतील दुसऱ्या एका पुरुषानें प्रयत्न करून मिसर देशाचा सुल-तान बयबर (बाबर) याच्या सहाय्यानें 'हाकिम-बई-आमिर-उल्ला' हें नांव धारण करून कायरो शहरीं स्वतःला खलिफाच्या जागीं अभिषेक करून घेतला. याचे वंशजांकडे इसवी सन १२५८ पासून १५१७ पर्यंत अडीचशें-पेक्षां कांहीं जास्त वर्षे मुसलमानांच्या नेतृपदाचा मान चालत होता. या

२५० वर्षांत मिसर देशांतील कायरो (केरो) शहरीं खिलाफतीचें केंद्र होतें; त्या दरम्यान कोठेंहि स्थानांतर झालें नाहीं. परंतु ज्या मिसराधिपतीच्या सहाय्यानें कायरो येथील खलिफा याला आपल्या श्रेष्ठ पदाला उचित अशा सन्मानाचें रक्षण करतां आलें, तोच मिसरचा सुलतान कालांतरानें हीनबल झाला; या संधीचा फायदा घेऊन 'सेलिम' नांवाच्या तुर्की सुलतानानें मिसरदेश जिंकून तो मुलुख आपल्या तुर्की साम्राज्यांत सामील केला. या वेळीं तुर्कसम्राटाची अमर्याद सत्ता व उज्ज्वल कीर्ति ऐकून अरबस्थानांतील प्रमुख मुसलमान लोकांनीं, बिकट परिस्थिति ओळखून व अनन्योपाय जाणून, तुर्कसम्राटाचें आधिपत्य स्वीकारणें श्रेयस्कर आहे असें ठरविलें; आणि थोड्याच अवधींत मक्केचे 'सरिफ' यांजकडे (तुर्कसम्राटाकडे) गेले आणि काबामंदिराची चावी (किल्ली) त्यांचे हातीं समर्पण करिते झाले. तेव्हांपासून आजपर्यंत तुर्कीसुलतान हा समस्त इस्लामीयांचा एकच्याएक (प्रतिस्पर्धीरहित) खलिफा असें मानिलें जातें, आणि त्याप्रमाणें त्यांचा गौरव केला जात आहे. हे तुर्कीसुलतान कोरेशवंशांतील नव्हेत ह्मणून त्यांच्याविषयीं खलिफा या नात्यानें सन्मान प्रदर्शित करण्यांत कोणत्याही मुसलमानाकडून केव्हांही हरकत झाली नाहीं. कारण, अबूबकरच्या काळीं ज्या कारणासाठीं कोरेशवंशांतूनच खलिफा निवडणें आवश्यक होतें, त्याच कारणासाठीं सोळाव्या शतकापासून ऑटोमान् (Automan तुर्की) सुलतानांना खलिफा समजून त्यांचें अनुकरण करणें व त्यांचा पुरस्कार करणें हें अत्यंत अवश्य आहे.

समाप्त.

ॐ

दारूचें व्यसन सुटण्यास काय करावें ?

अपूर्व शोध ! | एकच उपाय | खरें देशहित ! !

सुरारि-सुधा.

आपल्या अत्यंत जिव्हलग मित्रांना व नातेवाइकांना या व्यसनापासून मुक्त करण्याचें श्रेय घ्या. मद्यपानाचें व्यसन सुटल्यापासून आर्थिक हानि न होतां शरीर-संपत्ति सुधारते. कुटुंबांत आनंदाचें साम्राज्य पसरतें. दारूचे व्यसनाला आळा बसण्याकरितां पिकेटिंगची जरूर नाहीं. सरकारच्या रोषास पात्र न होतां खरें देशहित साधितां येतें. सतत तीस वर्षें परिश्रम करून व आयुर्वेदमहोदधीचें मंथन करून या दिव्य पेयाचा शोध लाविला आहे. अनुभवानेंच या पेयाचे गुणांची यथार्थता पटेल. या पेयानें मद्यपानाचें व्यसन सुटतें. एवढेंच नव्हे, तर अति कष्ट झालेले, जागरण झालेले व अत्यंत तीव्र काळजी असलेले रोगी यांना याचा फारच चांगला उपयोग होतो. मज्जातंतु बळकट होऊन उत्साह द्विगुणित होतो. पाठीच्या कण्यांतील दुःख नाहींसें होतें. नळाश्रित वायूचा जोर कमी होऊन मलमूत्र साफ होतें. पचनक्रिया हळू हळू सुधारून क्षुधा वाढते. हें घेतल्यानें दारूची तलफ भागते. हें अत्यंत निर्दोष असून शास्त्रीय पद्धतीनें तयार केलें आहे. यांत एकहि निषिद्ध पदार्थ नाहीं. सविस्तर माहितीचें पुस्तक पाहिजे असल्यास टपालखर्चाकरितां वगैरे एक आण्याचीं तिकिटें पाठवावीं. तिकिटें आल्याशिवाय उत्तर किंवा माहितीचें पुस्तक पाठविलें जाणार नाहीं. पत्ता सुवाच्य व समग्र असावा. पत्रव्यवहार फक्त पुढील पत्त्यावर करावा.

पत्ता:—मॅनेजर

हितवर्धक कंपनी

राजापूर, जिल्हा रत्नागिरी.

ॐ

रत्नागिरी जिल्ह्यांतील महत्त्वाचीं स्थळें.

सदरहू नांवाचें अत्यंत उपयुक्त व मनोरंजक पुस्तक तयार होत आहे. ज्यांनां सदरहू पुस्तक पाहिजे असेल, त्यांनीं आगाऊ नांवें नोंदवावीं. पुस्तकाची किंमत सुमारें १॥ ते २ रुपये होईल. यापेक्षां जास्त होणार नाहीं. आगाऊ ५०० ग्राहकांनीं नांवें नोंदविल्यानंतरच पुस्तक छापण्याचें काम सुरू करण्यांत येईल. सदरहू पुस्तकांत उपयुक्त नकाशेही देण्यांत येतील. आगाऊ नांवें नोंदविणारांस पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल.

नांवें नोंदविण्याचा पत्ता:-

रामचंद्र माधव फडके

मुक्काम पोष्ट—राजापूर, जिल्हा रत्नागिरी

